CMYK




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २१ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ५६ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



राष्ट्रासाठी त्याग करणे हा काही त्याग नाही. जेव्हा एखादी माता आपल्या मुलाला स्तनपान करते तेव्हा तिच्या अंत:करणातही तोच भाव असतो. शाश्वत आनंदाची ही अनुभूती आहे. हे सत्य लक्षात ठेवून ज्याप्रमाणे माता आपल्या पुत्रासाठी आत्मीयतेची व्याप्ती वाढवून ज्या प्रकारच्या आनंदाची अनुभूती घेते त्याचप्रमाणे आपल्या अहंकाराला आपल्या राष्ट्राच्या व्याप्तीपर्यंत वाढवणे हे आपल्या सर्वांचे ध्येय असले पाहिजे.

**- भाऊसाहेब भुस्कुटे**
रा. स्व. संघाचे माजी मध्य क्षेत्र प्रचारक

## महत्त्वाचे

### शिवसेना पक्षावर आज अंतिम सुनावणी

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात बुधवारी अंतिम सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर तीन वर्षांपासून प्रलंबित प्रकरणाचा निकाल येणार आहे. या निकालावर शिवसेना पक्षातील नगरसेवक, आमदार आणि खासदार यांचे भवितव्य आणि सत्तेची पुढची गणिते अवलंबून असेल. उबाठा गटाने दाखल केलेल्या याचिकेवरील खटला तीन वर्षांपासून प्रलंबित आहे. २१ जानेवारीला अंतिम सुनावणी होईल, असे मागील सुनावणीत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी सांगितले होते.

# पहिल्याच दिवशी १४.५ लाख कोटींची गुंतवणूक

### उद्योगांसाठी 'गेटवे ऑफ इंडिया' ठरतोय महाराष्ट्र

### राज्यात १५ लाख रोजगार

### १९ सामंजस्य करारांतून आयटी, हरित ऊर्जा व डाटा सेंटर क्षेत्रात विक्रमी गुंतवणूक

**◆ दावोस, २० जानेवारी**

'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वार्षिक परिषदेत पहिल्याच दिवशी महाराष्ट्राने तब्बल १४.५० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे १९ सामंजस्य करार करीत उद्योगांसाठी महाराष्ट्र 'गेटवे ऑफ इंडिया' ठरतोय हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या गुंतवणुकीमुळे राज्यात सुमारे १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार असून, आयटी, डाटा सेंटर, हरित ऊर्जा, अन्न प्रक्रिया, पोलाद निर्मिती, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर आदी विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात विकास होणार आहेत.

दावोस येथे महाराष्ट्र पॅव्हेलियनचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र हा विश्वासार्ह, दीर्घकालीन भागीदार असून, भारताच्या भविष्याचे 'पॉवर हाऊस' म्हणून राज्य जगभरातील उद्योगांना साद घालत असल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. पहिल्याच दिवसापासून जागतिक उद्योग समूहांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी उत्सुकता दर्शवल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

(तभा वृत्तसेवा)



देवेंद्र फडणवीस अर्बन ट्रान्सफॉर्मेशनचे प्रमुख जेफ मेरिट यांच्यासोबत चर्चा करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दावोस येथे महाराष्ट्राच्या जागतिक भागीदारीची नवी झेप**

(शेवटच्या पानावर)

### गडचिरोलीत २० हजार कोटींची गुंतवणूक

महाराष्ट्र सरकार आणि सुरजागड इस्पात यांच्यात गडचिरोली येथे स्टील क्षेत्रात २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा सामंजस्य करार झाला असून, या प्रकल्पातून सुमारे आठ हजार रोजगार संधी निर्माण होणार आहेत. या गुंतवणुकीमुळे गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

**महाराष्ट्र सरकार-काल्सबर्ग**
क्षेत्र : अन्न प्रक्रिया आणि कृषी
गुंतवणूक : ५०० कोटी
रोजगार : ७५०

**महाराष्ट्र सरकार-योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि.**
क्षेत्र : नविनिकरणीय ऊर्जा
गुंतवणूक : ४ हजार कोटी
रोजगार : ६ हजार

**महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स**
क्षेत्र : स्टील
गुंतवणूक : ५६५ कोटी
रोजगार : ८४७

### सामंजस्य करार पुढीलप्रमाणे

**एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी**
गुंतवणूक: ८ अब्ज डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**एमएमआरडीए-के. रहेजा**
गुंतवणूक : १० अब्ज डॉलर्स
रोजगार : एक लाख.

**एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील**
गुंतवणूक : २५ अब्ज डॉलर्स
रोजगार : २.५० लाख

**एमएमआरडीए-एसबीजी समूह**
क्षेत्र : लॉजिस्टिक्स
गुंतवणूक : २० अब्ज डॉलर्स
रोजगार : ४.५० लाख

**एमएमआरडीए-आयआयएसएम ग्लोबल**
गुंतवणूक : ८ बिलियन डॉलर्स
रोजगार : ८० हजार.

**एमएमआरडीए-जायका**
धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर

**एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर**
एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर

**एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी**
शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

**महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स**
क्षेत्र : आयटी, डेटा सेंटर्स
गुंतवणूक : १ लाख कोटी
रोजगार : १ लाख ५० हजार.

# मी पक्षाचा कार्यकर्ता, संघटनेत नितीन नबीन माझे बॉस

### नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

**◆ नवी दिल्ली, २० जानेवारी**

भाजपा असा पक्ष आहे, ज्यात पद नाही, तर प्रक्रिया महत्त्वाची असते. मी तीन कार्यकाळापासून पंतप्रधान असलो, तरी पक्षाचा कार्यकर्ता असणे ही अभिमानाची बाब आहे. त्यामुळे जेव्हा पक्षाचा विषय येतो, तेव्हा मी एक कार्यकर्ता असतो आणि पक्षाचे नवे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन हेच माझे बॉस आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले.

नितीन नबीन यांच्या भाजपा मुख्यालयात आयोजित पदग्रहण समारंभात मोदी उपस्थित नेते आणि कार्यकर्त्यांना संबोधित होते. नितीन नबीन तरुण आणि ऊर्जेने परिपूर्ण असे नेते आहेत, असे गौरवोद्गार काढत मोदी म्हणाले की, नबीन अशा पिढीचे प्रतिनिधी आहेत, ज्यांनी भारतात मोठ्या प्रमाणात आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक बदल होताना पाहिले.

(तभा वृत्तसेवा)



राजधानी दिल्लीतील भाजपाच्या मुख्यालयात भाजपाचे नवीन अध्यक्ष नितीन नबीन यांना मिठाई भरवताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

# इंदूर येथील विजयाने आत्मविश्वास वाढला

**◆ नागपूर, २० जानेवारी**

इंदूर येथील सामन्यात मिळालेल्या विजयामुळे आमच्या संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे नागपुरातील जामठा स्टेडियमवर होणाऱ्या पहिल्या टी-२० सामन्यातही संघ चांगली कामगिरी करेल, असा विश्वास येथे आयोजित पत्रपरिषदेत न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने व्यक्त केला.



तुल्यबळ भारतीय संघासोबत खेळायला आम्हाला आवडते. आम्ही वेगवेगळ्या फॉरमॅटमध्ये यश मिळविले आहे. त्यामुळे संघातील खेळाडूंचे मनोबल उंच आहे. येणाऱ्या स्पर्धा जिंकण्यासाठी आमचा संघ उत्सुक आहे. विश्वचषक जिंकण्यासाठी आम्ही तयारी करीत आहोत, असेही सँटनर म्हणाला.

आमचा संघ १० वर्षांपूर्वी नागपूर येथे सामना खेळला होता. त्यावेळी खेळपट्टीने दिलेली साथ यावेळीही मिळेल, याबद्दल मात्र खात्री देता येत नाही. त्यामुळे कठोर परिश्रम करावेच लागतील, असेही तो म्हणाला. (तभा वृत्तसेवा)

# भारताच्या विजयाबद्दल सूर्यकुमारला खात्री

**◆ नागपूर, २० जानेवारी**

टी-२० वर्ल्ड कप स्पर्धेपूर्वी भारतीय संघ न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. पहिला टी-२० सामना नागपूर येथे बुधवारी खेळला जाणार आहे. इंदूर येथील एकदिवसीय सामन्यात पराभव पत्करावा लागला असला तरी टी-२० सामन्यात भारत चांगली कामगिरी करेल, असा विश्वास भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने पत्रपरिषदेत व्यक्त केला.



तिसऱ्या क्रमांकावर कोण खेळणार, याबद्दलही त्याने सांगितले. पहिल्या टी-२० सामन्यात ईशान किशनला पहिली पसंती दिली जाणार आहे.

**तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यर**

भारत-न्यूझीलंड यांच्यातील टी-२० मालिकेसाठी तिलक वर्माच्या जागी श्रेयस अय्यरची संघात वर्णी लागली आहे. पण, ११ खेळाडूंमध्ये त्याला संधी मिळते का, ते पाहावे लागेल.

(तभा वृत्तसेवा)





10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | SHRIRAM Finance | IDFC FIRST Bank ALWAYS YOU FIRST | BAJAJ AUTO CREDIT | L&T Finance | TATA CAPITAL Two Wheeler Loans

*नियम आणि अटी लागू. बचत 31 जानेवारी 2026 पर्यंत उपलब्ध. दाखवलेली एकूण बचत ही कॅशबॅकची बचत, शून्य प्रोसेसिंग फी आणि 5 मोफत सर्व्हिसेस (3 स्टँडर्ड मोफत सर्व्हिसेस आणि 2 अतिरिक्त मोफत सर्व्हिसेस) यांची बेरिज आहे. मोफत सर्व्हिसेसची बचत शेड्यूल्ड लेबर शुल्कानुसार. लागू ऑफर्स मॉडेल्स/राज्यानुसार बदलू शकतात. शून्य पीएफवरील बचत फायनान्सर आधारावर स्थानांनुसार बदलू शकते. अर्थपुरवठा पूर्णपणे फायनान्सरच्या विवेकानुसार. साहसी दृश्ये एक्सपर्ट्सकडून, प्रोफेशनल सुपरवीजन अंतर्गत, नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून दूर जागेत केली आहेत. या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नये आणि नेहमी वाहतूक व सुरक्षिततेचे नियम पाळावे. पल्सर 125 ऑफर ही निऑन आणि कार्बन फायबर मॉडेल्सवर.

Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Solapur • Station Road AHERKAR BAJAJ 9689899840 • Hotgi Road AHERKAR BAJAJ 8956 069 355 • Akkalkot Road AHERKAR BAJAJ 8956 320 060 • Pandharpur PANDURANG BAJAJ 8600024805 • Jeur SHIVRATNA BAJAJ 9922044676 • Barshi AHERKAR BAJAJ 8308004007.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### राजुरीतील महाआरोग्य शिबीरात १ हजार १०० रुग्णांची तपासणी

**करमाळा, दि. २० जानेवारी-**

डॉ. दुरंदे हॉस्पिटल (करमाळा), मेडीकोज गिल्ड आणि परिवर्तन प्रतिष्ठान (राजुरी) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १८) जिल्हा परिषद शाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या 'विनामूल्य महाआरोग्य शिबिरास' राजुरीसह पंचक्रोशीतील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या शिबिरात ११०० रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना औषधांचे वितरण करण्यात आले. परिवर्तन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अमोल दादासाहेब दुरंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील महागडे उपचार आणि औषधे गावातच विनामूल्य मिळाल्याबद्दल ग्रामस्थांनी डॉ. अमोल दुरंदे, डॉ विद्या दुरंदे, डॉ. प्रदीप तुपेरे, डॉ. विठ्ठल पवार, डॉ. रोहित साळुंखे, डॉ. नायकुडे, डॉ. जिनेंद्र दोभाड़ा, डॉ. पापा मनेरी, डॉ. संकेत फाळके आणि आयोजक टीमचे विशेष आभार मानले. आरोग्य सुविधेच्या अभावी अनेकदा ग्रामीण रुग्ण उपचारांकडे दुर्लक्ष करतात, मात्र अशा शिबिरांमुळे आरोग्याप्रती जागृती निर्माण होत आहे.



### मराठी भाषा आपली सांस्कृतिक ओळख : डॉ. चौधरी

**जेऊर दि. २० जानेवारी-**

मराठी भाषा ही केवळ संवादाची भाषा नसून ती संतांची, पंतांची, कष्टकऱ्यांची व सामान्य जनतेची भाषा आहे. समाजाला विचार, संस्कार आणि सर्वार्थाने परिपूर्ण करण्याचे महान कार्य मराठी भाषेने केले आहे. त्यामुळेच मराठी ही अभिजात भाषा तर आहेच पण त्याचबरोबर ती आपली सांस्कृतिक ओळख, वैचारिक बैठक आणि सामाजिक बांधिलकी आहे. असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक प्रा.डॉ. संजय चौधरी यांनी केले. करमाळा येथील न्यायालयात तालुका विधीसेवा समिती व वकील संघ करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधवाड्या निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. चौधरी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस.पी.कुलकर्णी होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष वरिष्ठ न्यायाधीश संजय घुगे, न्यायाधीश अमित शर्मा तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. राम नीळ उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण न्यायाधीश श्रीमती एस.पी. कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन वरिष्ठ लिपिक एस.एल. जाधव यांनी केले तर वरिष्ठ लिपीक राम खराडे यांनी आभार मानले.



### महापालिकेतर्फे सहाय्यक उपनिरीक्षक अजितसिंह देशमुख यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एक खिडकी कक्षामध्ये उत्कृष्ट काम केल्याने महापालिका सहायक आयुक्त मनीषा मगर यांच्या हस्ते सहाय्यक उपनिरीक्षक अजितसिंह देशमुख यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सोलापूर महानगरपालिका येथे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीमध्ये त्यांनी चांगले योगदान दिले आहे.

### फिनिक्स स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**मोहोळ, दि. २० जानेवारी-**

फिनिक्स इंग्लिश मिडीयम स्कूल मोहोळ २०२५-२६ यावर्षीचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. यावेळी अध्यक्षस्थानी मोहोळच्या माजी नगरसेविकाअर्चना वायचळ होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून विराज प्री प्रायमरी स्कूल नंदुरचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार नागणे, डॉ. आयेशा तांडुरे, राणी नागणे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत पुजारी तसेच बाळासाहेब जाधव, अश्वमेध ड्रायव्हिंग स्कूल मोहोळचे कांबळे,सामाजिक कार्यकर्ते दिनेश माने, कैलास जाधव उपस्थित होते. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सर्व शिक्षक स्टाफ यांचेही योगदान लाभले. यामध्ये मुख्याध्यापक प्रशांत मदने सर व यशोदा मदने, सारिका नाईकनवरे,ज्योती केवळे, शितल मेटकरी, समीना तांबोळी, सोनाली जाधव यांचेही सहकार्य लाभले. सूत्रसंचालन प्रमोद कोरे यांनी केले. तसेच आभार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कृष्णदेव मदने सर यांनी मानले. मुख्याध्यापक प्रशांत मदने, यशोदा मदने यांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला.

### टाटा मोटर्सकडून नेक्स्ट-जनरेशन ट्रक्स लॉंच

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतातील ट्रकिंग क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलत टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक व गतीशीलता सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आज आपल्या १७ ट्रक्सचा नेक्स्ट-जनरेशन पोर्टफोलिओ लॉंच केला. हे ट्रक्स ७ टन ते ५५ टन कन्फिग्युरेशन्समध्ये उपलब्ध आहेत. यासह सुरक्षितता, नफा व प्रगतीमध्ये नवीन मापदंड स्थापित केले आहे. या सर्वसमावेशक लॉंचमध्ये ऑल-न्यू अझुरा सिरीज, अत्याधुनिक टाटा ट्रक्स. ईव्ही श्रेणी आणि प्रस्थापित प्राइमा, सिग्ना व अल्ट्रा प्लॅटफॉर्म्समधील मोठ्या अपग्रेड्सचा समावेश आहे. गिरीश वाघ म्हणाले,भारतातील ट्रकिंग क्षेत्रात झपाट्याने परिवर्तन होत आहे.


# 'दक्षिण'मध्ये अर्ज दाखल करण्यासाठी इच्छुकांची गर्दी

### जिल्हा परिषदेसाठी २३ तर पंचायत समितीसाठी ४६ अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २० जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून दक्षिणमध्ये इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. अर्ज भरण्यासाठी मंगळवारी इच्छुकांनी गर्दी केल्याचे दिसून आले . भाजपाकडून उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुकांची धावपळ सुरू आहे. मात्र यावेळी कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी निश्चित नसल्यामुळे एका जागेसाठी पाच पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे. मंगळवारी २० जानेवारी रोजी जिल्हा परिषदेसाठी २३ तर पंचायत समिती गणासाठी ४६६९ उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीची रंगत वाढल्याचे दिसून येत आहे.

१६ जानेवारीपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून सोमवारपासून इच्छुकांकडून अर्ज भरण्यात येत आहे. २१ जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याचा कालावधी असून २० जानेवारी रोजी अनेक दिग्गजांकडून उमेदवारी दाखल करण्यात आले. सर्वच पक्ष उमेदवारी निश्चित न करता अर्ज दाखल करण्यास सांगितले आहेत. त्यामुळे एका गटात एकाच पक्षाकडून चार ते पाच इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरली आहेत. कार्यकर्त्यांमध्ये व इच्छुकांमध्ये नाराजी निर्माण होऊ नये, यासाठी सर्वच पक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर एबी फॉर्म शेवटच्या क्षणाला देणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांची धाकधूक वाढली आहे. मंगळवारी दक्षिण तहसील कार्यालयात अर्ज भरण्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी होती.



#### दक्षिणमधील उमेदवारी दाखल संख्या

**जिल्हा परिषद गट :** बोरामणी - ४, कुंभारी - ८, वळसंग - १, हत्तूर - ३, मंद्रूप - ४ व भंडारकवठे - ३, एकूण - २३

**पंचायत समिती गण :** कासेगाव - १ , बोरामणी - ४, कुंभारी - ८, धोत्री - १ , वळसंग - ४, होटगी - ४ , हत्तूर - ७, औराद - ३, मंद्रूप - ४, कंदलगाव - ३, भंडारकवठे - १ व निंबर्गी - ६, एकूण - ४६

#### यांनी भरला अर्ज

सत्ताधारी पक्षाकडून उमेदवारी मागणी अधिक असल्याने उमेदवारी अनिश्चितता आहे. मात्र मंगळवारी सुरेश हसापुरे, इंदुमती अलगोंडा पाटील, सोनाली कडते, धनशे अचलारे, उज्वला हविनाळे, सविता मेंडगुदले, मळसिध्द मुगळे, शितल राठोड, रामप्पा चिवडशेट्टी, संदिप टेळे यांच्यासह अनेकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आज बुधवार दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्यासाठी मुदत आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी मंगळवार अखेर ५० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२० जानेवारी -**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी दि.१६ जानेवारी पासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी सुरुवात झाली असून दि.२० जानेवारी पर्यंत एकूण ६५४ अर्जाची विक्री झाली असून त्यापैकी ५० नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली.



जिल्हा परिषद गटासाठी महुद बु- ५, एखतपुर- २, जवळा- ६, कडलास- १, चोपडी- ५, कोळा- ४, घेरडी- ४ असे एकूण २८ अर्जांचे नामनिर्देशन झाले आहे. तसेच पंचायत समिती साठी घेरडी- ४, हातीद- ५, चोपडी- २, कडलास- ५, जवळा- १, वाकी शिवणे- ३, चिकमहुद- २, महुद- १ असे एकूण २२ गणातून नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली. मंगळवार दि.२० जानेवारी जिल्हा परिषद गटासाठी २३ व पंचायत समिती गणासाठी २२ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली.

## अक्कलकोट तालुक्यातील जि.प.साठी पाच तर पंचायत समितीसाठी सात उमेदवारी अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत जिल्हा परिषद गटातून पाच तर पंचायत समिती गणातून सात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती तहसीलदार विनायक मगर यांनी दिली.

यामध्ये जिल्हा परिषद जेऊर गटातून दोन मंगरूळ जि प गटातून तीन असे एकूण पाच उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले .शिरवळ पंचायत पंचायत समिती गणातून एक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. तर जेऊर पंचायत समिती गणातून दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केला. सुलेर जवळगे गणातून एक मंगरूळ गणातून एक नागणसूर गणातून एक सलगर गणातून एक असे सात उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले..

जेऊर जिल्हा परिषद गटातून अश्वघोष बाबुराव बनसोडे (इंडियन नॅशनल कॉंग्रेस ) लालचंद रेवप्पा नडगम ( इंडियन नॅशनल कॉंग्रेस ) मंगरूळ जिल्हा परिषद गटातून लक्ष्मीबाई श्रीमंत देसाई (भारतीय जनता पार्टी ) लक्ष्मीबाई श्रीमंत देसाई (अपक्ष)विष्णू शेटप्पा शिवशरण (भारतीय जनता पार्टी) ., शिरवळ पंचायत समिती गणातून गणेश शंकर मोरे (शिवसेना) ,जेऊर पंचायत समिती गण श्रुती काशिनाथ पाटील (इंडियन नॅशनल कॉंग्रेस) विमल विलास गव्हाणे (भारतीय जनता पार्टी ) सुलेरजवळगे पंचायत समिती गण सुशेकांत जगदेव कांबळे ( अपक्ष )मंगरूळ पंचायत समिती गण पार्वती परमेश्वर यादवाड (भारतीय जनता पार्टी) नागणसूर पंचायत समिती गणातून अनिता सखाराम राठोड (भारतीय जनता पार्टी)सलगर पंचायत समिती गण इंद्रजीत चंद्रशेखर गड्डी (शिवसेना).




## कासारवाडी येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे कासारवाडी येथे सुरु असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी 'शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका' या विषयावर प्रभावी मार्गदर्शनपर व्याख्यान संपन्न झाले. शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमीन विकास या संकल्पनेवर आधारित हे शिबीर दि. १७ ते २३ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. व्याख्यानासाठी सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महादेव डिसले हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. डॉ. डिसले यांनी पर्यावरणसंरक्षण, स्वच्छता, वृक्षारोपण, पाणी संवर्धन यांसारख्या उपक्रमांमधून समाजाच्या विकासाला योग्य दिशा देता येते, असे सांगितले. शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या बळावर सकारात्मक परिवर्तन शक्य असून शाश्वत विकास साध्य करण्यासाठी युवकांनी जबाबदारीने पुढे येणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. बी. डी. लांडे हे होते. प्रास्ताविक कुणाल कसबे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ज्योती काळे हिने करुन दिला. कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. ए. ढगे, प्रा. के. एम. माळी, प्रा. एम. एन. मोरे, प्राध्यापिका जे. आर. यादव, राजू जाधव, ज्ञानेश्वर गायकवाड तसेच सुमारे १०० स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. सूत्रसंचालन सृष्टी गुंडगीरे हिने केले. अजय चव्हाण यांनी आभार मानले.

## समतादुतांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे वाहक व्हावे : डॉ. हर्षदीप कांबळे



### महाड येथे समतादुतांची दोन दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

समतादूत हे शासन, सामाजिक न्याय विभाग व बार्टीच्या विविध योजनांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचविणारे महत्त्वाचे दुवे आहेत. त्यांनी शासनाच्या विकास प्रक्रियेचे प्रभावी वाहक म्हणून काम करावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या वतीने दि. १९ व २० जानेवारी २०२६ रोजी क्रांतीभूमी महाड, रायगड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात समतादूत व प्रकल्प अधिकाऱ्यांची दोनदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन दूरदृश्य प्रणालीद्वारे डॉ. कांबळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड, लेखाधिकारी नितीन चव्हाण आदी उपस्थित होते. समतादूत पच्या माध्यमातून शासनाच्या योजनांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावी होईल, असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले.

महासंचालक सुनील वारे यांनी महाडच्या क्रांतिकारी परंपरेचा उल्लेख करत समतादुतांनी नवे ज्ञान व कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन केले. कार्यशाळेत राज्यभरातील ३०० समतादूत व प्रकल्प अधिकारी सहभागी झाले असून, उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी समतादूत विभागाच्या प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्वी सोनवणे, राजश्री कांबळे, डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाडचे व्यवस्थापक प्रकाश जमदाडे, माहिती जनसंपर्क अधिकारी लिना कांबळे, यांनी मेहनत घेतली.सूत्रसंचालन प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात यांनी केले. आभार रामदास लोखंडे यांनी मानले.

## संशोधन प्रकल्पांचा उपयोग समाजासाठी व्हावा

### उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार; 'स्वेरी'त बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनीचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**

'आज विज्ञान हा दैनंदिन जीवनशैलीचा एक भाग बनलेला आहे. आपल्या ज्ञानात विज्ञानामुळे अधिक भर पडत असते. विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जर बदलला तर जीवनात सकारात्मक येते आणि चिकित्सक वृत्ती, जिज्ञासू वृत्ती वाढीस लागते आणि मग आपल्यामधूनच शास्त्रज्ञ, उद्योजक घडत असतात. आपल्या संशोधन प्रकल्पांचा समाजासाठी उपयोग व्हावा तरच आपल्याला त्यातून आनंद घेता येईल, असे प्रतिपादन स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअयरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांनी केले.

राज्य विज्ञान संस्था, रविनगर, नागपूर व शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या संयुक्त स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये आयोजिलेल्या '५३ व्या सोलापूर जिल्हा स्तरीय बालवैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनी २०२५-२६'च्या समारोप प्रसंगी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार या मार्गदर्शन करत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्ह्याचे उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रकाश नांगरे हे होते. महाराष्ट्र राज्य विज्ञान महामंडळाचे संचालक लक्ष्मीप्रसाद मोहिते यांनी प्रास्ताविकात 'स्वेरीमध्ये आयोजिलेल्या विज्ञान व गणित प्रदर्शनासंबंधी माहिती दिली.



#### १३२ प्रकल्पांचे सादरीकरण

प्राथमिक, माध्यमिक व शिक्षक गटातून तब्बल १३२ प्रकल्पांचे सादरीकरण केले गेले. यामध्ये बालवैज्ञानिकांमधून अद्भुत, बौद्धिक कल्पनांचे विशेष संशोधन आढळले तर हे प्रदर्शन पाहण्यासाठी प्रचंड गर्दी झाली होती.प्रा.शितल पाटील, प्रा. एस.डी. माळी, प्रा. एस.एस.गायकवाड, प्रा. पी.बी. लोखंडे, डॉ. एस.डी. भोसले, आदींनी परीक्षकांचे काम पहिले.

या प्रदर्शनातून प्राथमिक गटात प्रथम- बसवराज रविकांत तोळनुरे (प्रकल्प-सौर कृषी पंप), द्वितीय-विरोचंद सिद्धेश्वर कराळे (हॅन्ड डेस्टर कार), तृतीय- प्रेमराज आण्णासाहेब शेळके (ट्रान्समिशन लाईन), माध्यमिक व उच्च माध्यमिक गटातून प्रथम -महेश श्रीमंत टेंगळे (स्मार्ट ॲग्रिकल्चर), द्वितीय- आयुब चारुदत्त लाड (स्मार्ट स्कूल) व तृतीय- जुनेद बाग्दावर शेख (ऊमन सेफ्टी अँड मल्टीपर्पज सेफ्टी), दिव्यांग गटातून प्राथमिक गटात प्रथम- सुप्री गजेंद्र शिंदे (जल, संधी, व्यवस्थापन), दिव्यांग गटातून माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात प्रथम- गणेश महादेव निकम (अंडी उबवणे मशीन), प्राथमिक शिक्षक गटात प्रथम- विशाल विष्णुदास रेपाळ (माझी गणित शाळा), माध्यमिक शिक्षक गटात प्रथम- मंगेश अरविंद सोनटक्के (खेळातून जीएसटी आणि कृतीयुक्त आराखडा), योगशाळा व परिचर गटात प्रथम- शशिकांत हनुमंत शेंडे (निर्मिती वैज्ञानिक संकल्पना स्पष्टीकरण पूरक वैज्ञानिक व शैक्षणिक सहल) हे विद्यार्थी व शिक्षक विजेते ठरले असून त्यांची निवड राज्य पातळीवर झाली आहे.

अध्यक्षस्थानावरून उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गणेश लटके यांनी केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# चीन सीमेजवळ १७ संरक्षण प्रकल्प उभारणार

**केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची मंजुरी** | **वनविभागाच्या परिसरात लष्करी तळ, दारुगोळा निर्मिती होणार**

**प्रकल्पांमध्ये काय विशेष?** ● लष्करासाठी नवीन चौक्या बांधल्या जातील ● ब्रिगेड मुख्यालयाचे बांधकाम करणार ● वायुतळासाठी धावपट्टी तयार करणार ● दारुगोळा निर्मिती आणि साठवणूक केंद्र ● प्रशिक्षण सुविधा बांधल्या जातील



◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने चीन सीमेजवळील वनविभागाच्या परिसरात लडाख आणि सिक्कीममध्ये १७ संरक्षण पायाभूत सुविधा प्रकल्प उभारण्यास मंगळवारी मंजुरी दिली.

राष्ट्रीय सुरक्षा लक्षात घेऊन, या प्रकल्पांमध्ये लष्करी तळ व मुख्यालय, वायुदलाचे तळ, दारुगोळा निर्मिती कारखाना आणि शस्त्रे साठवण्याच्या ठिकाणांचा समावेश आहे. प्रकल्पांना मंजुरी देण्यावेळी वन्यजीव संवर्धनाला प्राधान्य देण्यात आले.

पर्यावरण मंत्रालयाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले की, लडाख आणि सिक्कीममधील संरक्षण प्रकल्प वनविभागाच्या परिसरात असल्याने यासाठी समिती गठित करण्यात आली. या समितीत विविध विषयांतील १२ तज्ज्ञांचा समावेश होता. त्यांनी प्रकल्पस्थळी प्रत्यक्ष पाहणी करीत अहवाल तयार केला. वन्यजीव संवर्धनाला बाधा पोहोचणार नाही, अशा पद्धतीने, प्रकल्प उभारण्यासाठी सूचना केली आणि अटी-शर्तीसह चीन सीमेजवळील लडाख आणि सिक्कीम यासारख्या उंचावरील भागांत १७ संरक्षण पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजुरी दिली. (वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय सुरक्षा विचारात घेऊन मंजुरी



संरक्षणाशी संबंधित या प्रकल्पांच्या मंजुरीबाबत, केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी 'एक्स'वर म्हटले की, हे प्रकल्प राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक आवश्यकता लक्षात घेऊन मंजूर करण्यात आले. वन्यजीव संवर्धन उपाय आणि पर्यावरण संरक्षण पूर्णपणे विचारात घेतले गेले आहे. हे सर्व लागू कायद्यांनुसार केले गेले. प्रकल्पांमध्ये नवीन सीमा चौक्या, ब्रिगेड मुख्यालय, दारुगोळा साठवणूक आणि प्रशिक्षण सुविधांचे बांधकाम समाविष्ट आहे.

### बैठकीत ७० प्रस्तावांवर चर्चा

बैठकीत, समितीने संरक्षित क्षेत्रे, वन्यजीव अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प आणि पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रांभोवती सार्वजनिक उपयुक्तता सेवा आणि पायाभूत सुविधा विकासाशी संबंधित ७० प्रस्तावांवर चर्चा केली. पर्यावरणीय संवेदनशीलता, वैधानिक आवश्यकता आणि स्थानिक समुदायांसाठी आवश्यक सेवा सुनिश्चित करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन या प्रस्तावांवर चर्चा करण्यात आली.

## ओमानमध्ये परदेशी नागरिकांना नोकरी नाही

◆ **मस्कत, २० जानेवारी**

ओमानमधील नागरिकांना नोकरीसाठी प्राधान्य मिळावे यासाठी तेथील सरकारने २०० प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये परदेशी नागरिकांना बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. ओमानने देशातील खाजगी क्षेत्रातील नोकऱ्यांसंदर्भात नवे धोरण लागू करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार ओमानमध्ये बाहेरील देशांतील स्थलांतरितांसाठी नियम लागू केले. नव्या नियमांनुसार विदेशांमधील नागरिकांना २०० प्रकारच्या नोकऱ्या करण्यास बंदी घातली आहे. यापुढे ओमानने बंदी घातलेल्या कामांसाठी बाहेरील देशातील व्यक्तीला नोकरी मिळणार नाही तसेच त्यांना व्हिसा नाकारण्यात येणार असल्याची माहिती ओमानच्या परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे. निर्णयाचा परिणाम तिथे नोकरीसाठी जाणाऱ्यांवर होणार आहे. ओमानमध्ये मोठ्या संख्येने काम करणाऱ्या भारतीयांना याचा फटका बसेल. (वृत्तसंस्था)



दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ चाललेल्या 'मंडला-मकरविलक्कू तीर्थयात्रा हंगामाची सांगता झाल्यानंतर केरळच्या पतमथिट्टा जिल्ह्यातील शबरीमाला मंदिराचे द्वार बंद करून मंगळवारी बाहेर पडताना पुजारी


# अजमेर दर्ग्यात शिवमंदिराचा दावा

### न्यायालयाने स्वीकारली याचिका

◆ **अजमेर, २० जानेवारी**

महाराणा प्रताप सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजवर्धन सिंह परमार यांनी असा दावा केला आहे की, अजमेरला सुफी संत ख्वाजा मोइनुद्दीन हसन चिश्ती यांच्या दर्ग्यात शिवमंदिर आहे.

सुप्रीम कोर्टाचे वकील एपी सिंग यांच्यामार्फत दिवाणी न्यायालयात दाखल केलेली ही याचिका नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान स्वीकारण्यात आली. परमार आणि एपी सिंग यांनी सांगितले की, न्यायालयाने राजस्थान सरकारच्या पुरातत्त्व विभाग, केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि पर्यटन मंत्रालयाला नोटीस बजावली आणि पुढील सुनावणी २१ फेब्रुवारी रोजी निश्चित केली.



या याचिकेत दर्ग्यात शिवमंदिराच्या दाव्याला समर्थन देणारे महसूल दस्तऐवज सादर केले आहेत. त्यांचा असा दावा आहे की, अयोध्या, काशी, संभल आणि सोमनाथप्रमाणेच, आक्रमणकर्त्यांनी पृथ्वीराज चौहान यांच्या अजमेर शहरातील महादेव मंदिर उद्ध्वस्त केले आणि तेथे दर्गा बांधला. (वृत्तसंस्था)

# शबरीमाला सोने घोटाळा प्रकरणी ईडीची तीन राज्यांत छापेमारी

### २१ ठिकाणी कारवाई

◆ **बंगळुरू, २० जानेवारी**

शबरीमाला सोने चोरी प्रकरणातील मनी लॉण्ड्रिंग चौकशीचा भाग म्हणून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मंगळवारी तीन राज्यांमध्ये छापे टाकले. अधिकृत सूत्रांनी सांगितले की, केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडूमधील जवळपास २१ ठिकाणी बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींनुसार हे छापे टाकले आहेत. संघीय तपास संस्था बंगळुरूमधील मुख्य आरोपी उन्नीकृष्णन पॉटी आणि त्रावणकोर देवस्वम बोर्डाचे (टीडीबी) माजी अध्यक्ष ए. पद्मकुमार यांच्याशी संबंधित परिसरांची झडती घेत असल्याचे समजते.

केरळ पोलिसांच्या एफआयआरची दखल घेत ईडीने अलिकडेच पीएमएलएअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या या प्रकरणाची केरळ उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली राज्याच्या विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) आधीच चौकशी केली जात आहे. ही चौकशी अनेक अनियमिततांशी संबंधित आहे, ज्यात अधिकृत गैरवर्तन, प्रशासकीय त्रुटी आणि भगवान अयप्पा मंदिरातील विविध कलाकृतींमधून सोने चोरण्याचा गुन्हेगारी कट रचण्यात आला आहे.

**मुख्य पुजाऱ्याला ताब्यात घेऊन चौकशी**

शबरीमला येथील भगवान अय्यप्पा मंदिरातील सोन्याच्या अपहाराची चौकशी करणाऱ्या एसआयटीने काही दिवसांपूर्वी मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याला ताब्यात घेतले. (वृत्तसंस्था)

### हे संपूर्ण प्रकरण काय आहे?

हे प्रकरण २०१९ मध्ये गर्भगृह, दाराच्या चौकटी आणि द्वारपालकाच्या मूर्तींमधून सोन्याचा मुलामा देण्यासाठी काढलेले सोन्याचे पत्रे आणि दागिने पूर्णपणे परत न केल्याच्या आरोपावर केंद्रित आहे. सोन्याचा काही भाग तांबे किंवा इतर निकृष्ट धातू म्हणून गहाळ झाला असावा, असे सांगून अपहार झाला. विविध टप्प्यांवर तयार केलेल्या कागदपत्रे, इन्व्हेंटरी लिस्ट आणि पडताळणी अहवालांमध्ये ही माहिती समोर आली आहे. केरळ उच्च न्यायालय या प्रकरणाचे बारकाईने निरीक्षण करत आहे आणि पवित्र मंदिराच्या मालमत्तेशी संबंधित प्रकरणांमध्ये जबाबदारी नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

# अक्षयकुमारच्या वाहनाचा अपघात, एक जखमी



अभिनेता अक्षयकुमारच्या सुरक्षा ताफ्यातील अपघातग्रस्त झालेली कार

◆ **मुंबई, २० जानेवारी**

मुंबईतील जुहू परिसरात बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमारच्या सुरक्षा ताफ्यातील एका कारने ऑटोरिक्षाला धडक दिली. यानंतर तीन चाकी वाहन दुसऱ्या वाहनाला धडकले. यामध्ये एक जण जखमी झाला, असे पोलिसांनी सांगितले.

सोमवारी रात्री जुहूमधील मुक्तेश्वर रोडजवळ ही घटना घडली. विमानतळावरून पत्नी ट्विंकल खन्नासोबत घरी परतणाऱ्या कुमारची कार अपघातात सहभागी नव्हती. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, ऑटोरिक्षाला एका वेगाने येणाऱ्या मर्सिडीज कारने धडक दिली. यामुळे कुमारच्या सुरक्षा ताफ्यातील वाहन त्याला धडकले.

अपघातात ऑटोरिक्षा चालक जखमी झाला आणि त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. जुहू पोलिसांनी मर्सिडीज चालकाविरुद्ध बेदरकारपणे आणि निष्काळजीपणे गाडी चालवल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे. (वृत्तसंस्था)

# नऊ राज्यांत वादळ, पावसाचा अलर्ट

◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

उत्तर भारतात थंडी कमी झाल्यानंतर, भारतीय हवामान विभागाने नऊ राज्यांसाठी वादळ आणि मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. २२ ते २५ जानेवारी दरम्यान उत्तरप्रदेश, हिमाचलप्रदेश, हरयाणा, उत्तराखंड, राजस्थान, पंजाब, दिल्ली, बिहार आणि लडाखमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, या काळात ४० किलोमीटर प्रती तास वेगाने वारे वाहू शकतात. हिमाचल प्रदेशात विजांसह पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये २२ ते २५ जानेवारी दरम्यान हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये २० आणि २१ जानेवारी रोजी मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टी होऊ शकते. दिल्लीमध्ये मंगळवारी सकाळी तापमान सुमारे ८ अंश सेल्सिअसवर होते, तर दुपारी तेजस्वी सूर्यप्रकाश राहिला.

हवामान खात्याने २३ जानेवारीपासून राजधानीत हलक्या ते मध्यम पावसाचा इशारा दिला आहे. पुढील तीन-चार दिवस सकाळी दाट धुके पडण्याची शक्यता आहे. यामुळे थंड हवेपासून दिलासा मिळेल. उत्तरप्रदेशातील हवामान वेगाने बदलत आहे. बाराबंकी, कानपूर, रायबरेली आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये धुके कमी झाले आहे, तरीही ग्रामीण भागात हलके ते मध्यम धुके दिसून येत आहे. दिवसाचे तापमान आता २० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त आहे. वाराणसीमध्ये दिवसभर स्वच्छ हवामान राहील आणि सूर्यप्रकाश पडेल. पश्चिम उत्तरप्रदेशात सकाळी धुके होते. (वृत्तसंस्था)

## कोट्यवधीची चांदी जप्त, एकाला अटक

◆ **रांची, २० जानेवारी**

झारखंडच्या गिरीडीह जिल्ह्यातून एका व्यक्तीकडून १.७८ कोटी रुपये किमतीची चांदी जप्त केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली.

पोलिसांनी सोमवारी राजधनवार पोलिस ठाण्याच्या हद्दीत वाहन तपासणी मोहिमेदरम्यान त्याला पकडले. एक गुन्हेगारी टोळी चांदीचा मोठा साठा विकण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती मिळाली होती. वाहन तपासणी मोहिमेदरम्यान, पोलिसांनी हजरत अन्सारीला अटक केली तसेच साठा जप्त केला. (वृत्तसंस्था)

# कर्नाटकचे 'डीजीपी' रामचंद्र राव निलंबित

### अश्लील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर कारवाई

◆ **बंगळुरू, २० जानेवारी**

कर्नाटकचे पोलिस महासंचालक (डीजीपी) (नागरिक हक्क अंमलबजावणी) यांना निलंबित करण्यात आले आहे. सोमवार त्यांचा एक अश्लील व्हिडीओ समोर आला होता, त्यानंतर सरकारने त्यांच्यावर कारवाई केली आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये के. रामचंद्र राव अनेक महिलांसोबत आक्षेपार्ह अवस्थेत दिसत होते. व्हिडीओ समोर आल्यानंतर मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सांगितले होते की, के. रामचंद्र राव दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल.



व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर रामचंद्र राव गृहमंत्री जी. परमेश्वर यांना भेटायला पोहोचले, परंतु त्यांची भेट होऊ शकली नाही. गृहमंत्र्यांच्या घरातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी पत्रकारांना सांगितले होते की, व्हिडीओ खोटा आणि मॉर्फ केलेला आहे. पुढील कारवाईबाबत वकिलांशी बोलणार आहेत.

**आरोप फेटाळले**

मंत्र्यांच्या घराबाहेर पत्रकारांशी बोलताना के. रामचंद्र राव म्हणाले की, मी पण विचार करत आहे की हे कसे आणि कधी झाले आणि कोणी केले. या काळात काहीही होऊ शकते. मला याबद्दल कोणतीही माहिती नाही. पत्रकारांनी विचारले की, हा जुना व्हिडीओ आहे का, तेव्हा ते म्हणाले- जुना म्हणजे, आठ वर्षांपूर्वी जेव्हा मी बेळगावीमध्ये होतो. ते गृहमंत्र्यांना समजावून सांगतील की चुकीची माहिती पसरवली जात आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### प्रसाद ओक आता होणार सासरेबुवा



**मुंबई** : मनोरंजन जगतात सध्या लग्नसराईचा हंगाम दिसतो आहे. अनेक कलाकारांच्या घरी सनई चौघडे वाजताहेत. नुकतेच आंदेश बांदेकरांच्या लेकाचे लग्न झाले. आता मराठीतील प्रसिद्ध जोडी प्रसाद ओक आणि मंजिरी यांचा मुलगा लवकरच बोहल्यावर चढणार आहे. प्रसादचा मोठा मुलगा सार्थकचा साखरपुडा पार पडला. याचे फोटो समाज माध्यमांवर व्हायरल होत आहेत. सार्थकच्या होणाऱ्या बायकोचे नाव रितू असे आहे. या साखरपुड्याला कलाजगतातील मंडळींनीही हजेरी लावली. त्यात अमृता खानविलकर, स्वप्नील जोशी यांचाही समावेश होता. अमृतानेच साखरपुड्याचे फोटो शेअर करीत ही माहिती जगजाहीर केली आहे. प्रसाद आणि मंजिरी यांना दोन मुले आहेत. मोठ्याचे नाव सार्थक तर, धाकट्याचे मयंक असे आहे. सार्थकने जर्मनीतून त्याचे शिक्षण पूर्ण केले आहे.


### रश्मिकाचा 'सिकंदर'बाबत धक्कादायक खुलासा



**मुंबई** : सलमान खान आणि रश्मिका मंदाना अभिनीत सिकंदर हा चित्रपट २०२५ मधील सर्वांत मोठा फ्लॉप ठरला. चित्रपटाचा खर्चही वसूल होऊ शकला नाही. आता चित्रपटाची नायिका रश्मिका मंदानाने चित्रपटाच्या अपयशावर भाष्य केले आहे. ती म्हणाली, आधी जी पटकथा आम्हाला ऐकवण्यात आली ती नंतर वेगळीच निघाली. चित्रपटांमध्ये असे अनेकदा घडते. जेव्हा तुम्ही ऐकता, तेव्हा ती एक वेगळी कथा असते. पण चित्रपट बनवताना, अभिनय, संपादन आणि प्रदर्शनाच्या वेळेनुसार गोष्टी बदलतात. एरवी ही खूप सामान्य गोष्ट आहे. सिकंदरसोबतही असेच घडले. अख्खी स्क्रिप्ट बदलल्यानेच कदाचित चित्रपटाचा अपेक्षित प्रभाव दिसला नाही.

### अक्षयच्या हातातून निसटला 'रेस-४'

**मुंबई** : 'धुरंधर' चित्रपटातील रहमान डकैतची भूमिका गाजवणारा अक्षय खन्ना अनेकांच्या आवडत्या कलाकारांच्या यादीत अव्वल स्थानी जाऊन बसला आहे. या भूमिकेनंतर त्याने स्वत:च्या बाबतीत काही धोरणात्मक बदल केले. त्याच्या अटीवर तो चित्रपट निवडू लागला आहे. मात्र, त्याचा त्याला फटकाही बसतो आहे.



'दृश्यम-३'मधून त्याचा पत्ता कट झाल्यानंतर आता 'रेस-४'ही त्याच्या हातातून निसटल्याचे बोलले जात आहे. खुद्द निर्माते रमेश तौरानी यांनी अक्षय खन्ना यात दिसणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्याच्यासाठी आम्ही चित्रपटाचे कथानक बदलू शकत नाही. त्यामुळे आम्ही त्याला विचारणाही केली नाही, असे तौरानी यांनी सांगितले. आता अक्षयच्या अटी निर्माता, दिग्दर्शकांना डोईजड वाटताहेत, अशी जोरदार चर्चा आहे. असे असले तरी अक्षय नेहमीप्रमाणे शांत असून, अतिशय वेचक पद्धतीने चित्रपटांची निवड करतोय.

# आठवणींचे क्षण कॅमेराबंद करणारी 'कोडॅक' कंपनी बंद होण्याच्या मार्गावर




◆ **नवी दिल्ली, २० जानेवारी**

एकेकाळी कोडॅक कॅमेऱ्याने आपल्या विश्वसनीयतेने संपूर्ण बाजार व्यापला होता. पण, आता कोडॅक अनेकांसाठी फक्त एक आठवण बनून राहिली आहे. जगातील पहिल्या डिजिटल कॅमेऱ्याचा शोध लावणाऱ्या कोडॅकचे अस्तित्व याच डिजिटल कॅमेरामुळे संपुष्टात आले. आता कंपनी आर्थिक संकटाच्या फेऱ्यात अडकली असून, तब्बल ५०० लाखांचे कर्ज फेडण्यास असमर्थ आहे.

जॉर्ज ईस्टमन नावाच्या व्यक्तीने कोडॅकचा पाया घातला होता. त्यांना फोटोग्राफी इतकी सोपी करायची होती की, प्रत्येक सामान्य व्यक्तीला वापरता येता येईल आणि त्यांनी आपले स्वप्न पूर्णही केले. १८८८ मध्ये त्यांनी 'तुम्ही फक्त क्लिक करा, बाकी सगळे आम्ही करू' टॅगलाईनसह पहिला कॅमेरा सादर केला. कोडॅक लवकरच एक जागतिक ब्रँड बनला. १९९० च्या दशकापर्यंत कोडॅकचे वर्चस्व इतके वाढले होते की त्यांनी अमेरिकेतील ९० टक्के चित्रपट बाजारावर नियंत्रण मिळवले होते.

कोडॅकच्या प्रयोगशाळेत काम करणाऱ्या अभियंत्या स्टिव्ह सॅसनने १९७५ मध्ये क्रांती घडवणारी एक विचित्र मशीन तयार केली. टोस्टरच्या आकाराचे एक विचित्र मशीन बनवले, ज्यामध्ये असंख्य तारा होत्या आणि खूप जड होते. हा जगातील पहिला डिजिटल कॅमेरा होता ज्याने ब्लॅक अॅण्ड व्हाईट फोटो काढले आणि कॅसेट टेपमध्ये सेव्ह केले जायचे. पण, डिजिटल कॅमेरा नाकारणे ही कोडॅकची सर्वांत मोठी आणि ऐतिहासिक चूक होती. (वृत्तसंस्था)




### कोडॅकला उशिरा लक्षात आली चूक

कोडॅकने आपली चूक खूप उशिरा सुधारण्याचा प्रयत्न केला. डिजिटल मार्केटमध्ये प्रवेश करण्यासाठी लाखो डॉलर्स खर्च केले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. आज कोडॅक पूर्णपणे नाहीसे झालेले नाही, पण आता पूर्वीसारखे राहिलेले नाही. कोडॅक आता एक छोटी कंपनी आहे जी औषधे, छपाई आणि काही विशेष रसायने बनवते.

## तस्करी केलेले १८० टन डिझेल जप्त; दोघांना अटक

◆ **मुंबई, २० जानेवारी**

मुंबई कस्टम्सने समुद्रात एका मालवाहू बार्ज पकडून पाण्याच्या टाक्यांमध्ये लपवून ठेवलेले १८० टनांपेक्षा जास्त तस्करीचे डिझेल जप्त केले, अशी माहिती मंगळवारी अधिकाऱ्यांनी दिली. जहाज मालकाला आणि त्याच्या मुलाला अटक करण्यात आली आहे.

गुप्त माहितीच्या आधारे, कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी रविवारी एमव्ही टीना-४ या मालवाहू जहाजावर छापा टाकला. या बार्जमध्ये विदेशी जहाजांमधून तस्करी केलेले हाय-स्पीड डिझेल आढळून आले. ते सीमाशुल्क चुकवण्यासाठी स्थानिक किनारी बोटी आणि कारखान्यांना पुरवले जाणार होते. मास्टर, अभियंता आणि शिपिंग लाइनच्या अधिकृत प्रतिनिधीकडून नोंदवलेल्या जबाबांवरून कार्यपद्धती स्पष्ट झाली. एक पाण्याची टाकी इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंगने मंजूर केलेल्या डिझाईनचा भाग नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# फडणवीसांच्या 'ब्रॅण्ड महाराष्ट्र'चा डंका!

नेतृत्वाविषयीच्या अनेकांच्या कल्पना फार भाबड्या असतात. व्यासपीठावरून उच्चरवाने बोलणे, कार्यकर्त्यांना उपदेश करीत फिरणे, टोमणे मारणे, विरोधकांवर सतत टीकेचा भडिमार करणे यालाही अनेक लोक नेतृत्व समजतात. तसे अनेक नेते महाराष्ट्रात आहेत आणि देशातही. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मात्र अशा पठडीत बसणारे नाही. ते सुशिक्षित आणि अनुभवी आहेत. शिवाय, शासन-प्रशासनात मुरलेले आहेत. राजकारण करताना ते खटाला खट आहेतच; पण कामातही वाघ आहेत. एखाद्या राज्याचा विकास कसा करायचा असतो, हे त्यांनी अनेक प्रकल्पांतून दाखवून दिले. मोजकी उदाहरणे द्यायची तर समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू, कोस्टल रोड इत्यादी. फडणवीसांचा भर २०१४ मध्ये ते मुख्यमंत्री झाल्यापासून महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर राहिला. त्यांच्या काळात केवळ मुंबई-पुणे नव्हे तर नागपूर-गडचिरोलीपर्यंतही भरभक्कम गुंतवणूक आली. अनेक उद्योग सुरू झाले. रोजगार निर्माण झाले. आता त्यांच्या ताज्या दावोस दौऱ्यानंतर गुंतवणुकीतून होणाऱ्या रोजगार निर्मितीला अधिक बळ मिळणार आहे. लाखो कोटींचे करार झाले आहेत. त्यांचे फायदे नजीकच्या भविष्यात दिसतील.

नेतृत्व म्हणजे संधी ओळखणे, योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आणि संपूर्ण यंत्रणेला एकाच दिशेने कार्यरत करणे. ते फडणवीसांनी करून दाखविले. महाराष्ट्र आज ज्या टप्प्यावर उभा झालेला आहे, ते पाहिले तर एक गोष्ट निर्विवादपणे सिद्ध होते की, प्रशासकीय शिस्त, नियोजन व दूरदृष्टीतून फडणवीसांनी महाराष्ट्राच्या विकासात फार मोठे योगदान दिले आहे. कधी नव्हे तो ब्रॅण्ड महाराष्ट्र त्यांनी तयार केला आहे आणि तो देखील जागतिक पटलावर! भारतामध्ये अनेक राज्ये गुंतवणुकीसाठी स्पर्धा करीत आहेत. प्रत्येकाकडे आकर्षक सवलती, जमिनीचे दर, कर-सवलती यांची यादी आहे. या साऱ्यांत महाराष्ट्र एका वेगळ्याच पातळीवर उभा आहे. ते वेगळेपण आहे महाराष्ट्राच्या विश्वासार्हतेत. ही विश्वासार्हता अचानक निर्माण झालेली नाही. ती फडणवीसांच्या निर्णयक्षमतेतून, दूरदृष्टीतून निर्माण झालेली आहे. उद्योगविश्वाला सर्वांत जास्त भीती असते ती अनिश्चिततेची. आज मंजुरी, उद्या आडकाठी; आज स्वागत, उद्या नियमांत बदल असे घडत राहिले तर उद्योजक त्यापासून दूर राहतात. राजकारण आणि प्रशासन यांच्यातील सीमारेषा स्पष्ट ठरवलेल्या असल्यामुळे फडणवीसांच्या धोरणात सातत्य राहिले. भारताच्या औद्योगिक नकाशावर महाराष्ट्र नेहमीच अग्रस्थानी राहिला आहे. पण फडणवीस मुख्यमंत्री होईपर्यंत साराच कारभार संथ गती होता हे वास्तव. फडणवीसांनी देशी आणि विदेशी गुंतवणुकीचे महत्त्व ओळखले आणि ते कामाला लागले. दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारख्या जागतिक व्यासपीठावर महाराष्ट्राची जी प्रतिमा फडणवीसांनी गेल्या काही वर्षांत निर्माण केली, ती भारतातील कोणत्याही राज्याला हेवा वाटेल अशीच आहे. एकेका दौऱ्यात लाखो कोटींच्या गुंतवणूक करारांवर शिक्कामोर्तब होणे हा योगायोग नसतो. त्यासाठी भरपूर तयारी लागते. अभ्यास लागतो. शिवाय, त्या राज्याच्या नेत्याबद्दल विश्वास वाटावा लागतो. हाच विश्वास फडणवीस यांच्या नेतृत्वाचा गाभा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात येत असलेली गुंतवणूक मोजक्या क्षेत्रांपुरती नाही. हरित ऊर्जा, अन्नप्रक्रिया, पोलादनिर्मिती, आयटी-आयटीईएस, डेटा सेंटर्स, ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाजबांधणी, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर अशी ही यादी फार मोठी होईल. पारंपरिक उद्योगांना बळ देतानाच नव्या तंत्रज्ञानावर आधारित उद्यमांना खुले आमंत्रण देणारी ही दृष्टी राज्याला भविष्यातील विकासासाठी सज्ज करणारी आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे फडणवीसांच्या नेतृत्वातील विकासाचा हा प्रवास मुंबई-पुण्यापुरता मर्यादित नाही. पालघर, रत्नागिरी, गडचिरोली, अहिल्यानगरसारख्या भागांपर्यंत उद्योग पोहोचत आहेत. ही फक्त आर्थिक विकेंद्रीकरणाची प्रक्रिया आहेच. शिवाय, तो विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे. उद्योग जिथे जातात, तिथे रोजगार निर्मिती होते आणि रोजगार जिथे निर्माण होतात, तिथे स्थलांतर थांबते. कुणीही आपली गुंतवणूक बेभरवशाच्या ठिकाणी करीत नाही. प्रत्येक गुंतवणूकदाराला परतावा आणि नफा हवा असतो. गुंतवणुकीच्या ठिकाणी राजकीय, सामाजिक शांतता व स्थैर्य असावे लागते. राज्याचे अर्थकारण शिस्तीत असावे लागते. शिवाय, नेतृत्वही विश्वासार्ह आणि नव्या काळातील नव्या गरजांशी जुळवून घेणारे असावे लागते. या साऱ्या अटी-शर्ती फडणवीस पूर्ण करतात. सरकार हा आपल्यासाठी अडथळा नव्हे तर भागीदार आहे, असे आश्वासन त्यांच्या नेतृत्वातून गुंतवणूकदारांना मिळते. यातून गतिमान होणाऱ्या विकासाच्या प्रक्रियेचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम असतो रोजगारनिर्मिती. लाखो कोटींच्या गुंतवणुकीसोबत लाखो नोकऱ्या निर्माण होतात तेव्हा समाजाचे अर्थकारण बळकट होते. त्यातून क्रयशक्ती वाढते, बाजारपेठ सशक्त होते, गुंतवणूक वाढते, बचतही वाढते. यातून समाजात आर्थिक स्थैर्य निर्माण होते. विशेषतः दुर्गम आणि मागास भागांत उद्योग जातात, तेव्हा त्यातून केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक व मानसिक बदल मोठ्या प्रमाणात घडतो. जागतिक अर्थकारणातील सध्याचा काळ बराच अस्थिरतेचा आहे. जागतिक स्तरावर आर्थिक अनिश्चितता, युद्धे, पुरवठा साखळीवरील ताण, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल अशा साऱ्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्र हे एक स्थिर, विश्वासार्ह आणि भविष्याभिमुख राज्य म्हणून उभे राहते. कारण निर्णय घेताना केवळ आजचा विचार न करता भविष्याचा वेध घेतला जातो. जागतिक अर्थकारणातील अनिश्चिततेच्या काळातही महाराष्ट्र हे राज्य गुंतवणुकीसाठी सुरक्षित, स्थिर आणि आकर्षक पर्याय म्हणून उभे राहिले आहे. याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे धोरणात्मक स्पष्टता आणि निर्णायक नेतृत्व. उद्योगविश्वाला आज जे काही हवे आहे, सोयी-सवलतींसह स्थैर्य, वेग आणि विश्वास, ते सारे महाराष्ट्रात मिळते. रिअल इस्टेट, लॉजिस्टिक्स, आयटी, डेटा सेंटर्स आणि नागरी पायाभूत सुविधांमध्ये होत असलेली अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक ही एखाद्या सेक्टरची भरभराट नव्हे. संपूर्ण शहरी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना त्यामुळे होणार आहे. रोजगारनिर्मिती केवळ नोकऱ्यांपुरती मर्यादित राहत नाही. सेवा क्षेत्र, लघुउद्योग, स्टार्टअप्स आणि कौशल्याधारित रोजगारांची साखळी तयार होते. हे 'मल्टिप्लायर इफेक्ट'चे अर्थशास्त्र फडणवीस सरकारने अचूक ओळखलेले आहे आणि दावोसमध्ये ब्रॅण्ड महाराष्ट्रला मिळालेला प्रतिसाद हा त्याचा परिणाम आहे. महाराष्ट्राच्या एका टोकाला असलेल्या गडचिरोलीसारख्या भागात मोठे पोलाद प्रकल्प आले, येताहेत. या भागात दशकानुदशके विकासाचा अर्थ केवळ घोषणांपुरता मर्यादित होता. आता तिथे प्रत्यक्ष उद्योग सुरू झाले. हे वातावरण आत्मविश्वास निर्माण करणारे आहे. ''आपल्याही भागात संधी आहे'', ही भावना त्या परिसराची मानसिकता बदलणारी आहे. निर्णय प्रक्रिया वेगवान, उत्तरदायी आणि पारदर्शक असावी, हा आग्रह फडणवीस नेहमीच धरतात. ''कोणाकडे जायचं?'' हा प्रश्न गुंतवणूकदाराला पडू नये याची ते काळजी घेतात आणि त्यासाठी 'मैत्री' (महाराष्ट्र इंडस्ट्री, ट्रेड ॲण्ड इन्व्हेस्टमेंट फॅसिलिटेशन) सारखी यंत्रणा तयार करतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर ज्याचा डंका वाजतोय, त्या ब्रॅण्ड महाराष्ट्रचा हा महत्त्वाचा घटक. यातील आणखी एक मुद्दा असा की, फडणवीस यांचे नेतृत्व उद्योगकेंद्री असले तरी ते मानवी घटक विसरत नाहीत. चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, कौशल्य विकास, स्थानिक युवकांना संधी या सगळ्यांवर त्यांचा भर असतो. दावोसमध्येही त्यांनी तेच दाखविले. उद्योग वाढले, पण त्याचा फायदा स्थानिक समाजाला झाला नाही तर तो विकास टिकाऊ ठरत नाही ही जाणीव त्यांच्या धोरणांत स्पष्टपणे दिसते. दीर्घकालीन परिणाम करणारे निर्णय घेणे ही त्यांची शैली आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, शहरी नियोजन या क्षेत्रांत घेतलेले निर्णय वर्तमानासाठी तर महत्त्वाचे आहेत. पुढच्या पिढ्यांना त्यांचा फायदा होणार आहे. त्यामुळेच फडणवीसांचे नेतृत्व हे वर्तमानापुरते न राहता ते भविष्यवेधी ठरते. फडणवीसांच्या ब्रॅण्ड महाराष्ट्रचा आज जो डंका वाजतोय तो त्यामुळेच!

## विशेष

**प्रा. सुखदेव बखळे**

# विमानतळ बाजारपेठेला नवे धुमारे

भारतातील विमानतळांसाठी सीट अपग्रेड आणि लाऊंजसह पूरक उत्पन्न आता नफ्याचे एक प्रमुख साधन बनले आहे. ते विमानतळांना चैतन्यपूर्ण ग्राहक केंद्रांमध्ये रूपांतरित करत आहे आणि हवाई प्रवासाचे भविष्य नव्याने परिभाषित करत आहे. आता तुम्ही दिल्ली विमानतळाच्या टर्मिनल तीनवर असाल, तर उशीर होण्याचे कारण कदाचित डिपार्चर गेट नसेल, तर नवीन शनेल बुटीक असेल. हैदराबादमध्ये विमानात चढण्यापूर्वी गॉर्डन रॅमसे बर्गर खाण्याचा मोह होऊ शकतो. संपूर्ण भारतात याच पद्धतीने विमानप्रवासाची नव्याने आखणी केली जात आहे. आता विमानप्रवास केवळ गंतव्यस्थानी पोहोचण्यापुरता मर्यादित नाही; तर प्रवासी मधल्या वेळेत तास कसे घालवतात, यालाही महत्त्व आले आहे आणि याच ठिकाणी एअरलाईन्स कंपन्या आणि विमानतळ प्रशासन कमाईच्या नव्या संधी शोधत आहेत. भारताच्या विमान वाहतूक उद्योगासाठी आता आकाशात नाही, तर जमिनीवर सर्वांत महत्त्वपूर्ण वाढ होत आहे. नॉन-तिकीट आणि गैर-विमानचालन महसूल प्रवाह हे या क्षेत्राचे सर्वांत मजबूत वाढीचे इंजिन बनले आहेत. तिकीट विक्रीमुळे प्रवासी येतात; परंतु सीट अपग्रेड, लाऊंज, प्रीमियम जेवण, जाहिरात, ब्रॅण्डेड किरकोळ विक्री आणि विशेष अनुभव यासारख्या अतिरिक्त सेवांमुळे नफ्याचे प्रमाण वाढत आहे. एअरलाईन्स आणि विमानतळ चालक या उच्च-नफ्याच्या प्रवाहावर मोठी खेळी करत आहेत. महसूल निर्मितीच्या पद्धतीत ही खेळी एक स्पष्ट बदल दर्शवत आहे. जागतिक स्तरावर विमान वाहतूक उद्योगाच्या नफ्यासाठी पूरक महसूल दीर्घकाळापासून महत्त्वाचा मानला जात आहे.

आजघडीला हिथ्रो, चांगी आणि दुबईसारख्या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर ४० ते ५० टक्के महसूल नॉन-तिकीट स्रोतांमधून येतो. भारतही यात मागे नाही. विमानतळ आणि एअरलाईनच्या उत्पन्नात पूरक सेवांचे योगदान २५ ते ३५ टक्के आहे. उद्योग अंदाजांनुसार, डिजिटायझेशन आणि प्रीमियम अनुभवांची वाढती मागणी या बदलाला गती देत आहे. प्रवाशांची संख्या वाढत असतानाही भाड्याचे मार्जिन मोठ्या प्रमाणात स्थिर राहिल्याने विमान कंपन्या सीट विक्रीपलीकडे जाऊन नवनवीन प्रयोग करत आहेत. सोयी, निवड आणि अनुभवाचे मुद्रीकरण पुढील दशकाची व्याख्या करेल. ॲप्स, डायनॅमिक प्राईसिंग आणि ऑफर्समुळे एअरलाईन्स आणि विमानतळांना प्रवाशांच्या खर्चाचा मोठा वाटा मिळवणे शक्य होते. त्याच वेळी त्यांना वैयक्तिककृत सेवाही देता येतात. भारतात हा बदल दोन पातळ्यांवर होत आहे. विविध एअरलाईन्स तिकीट विक्रीपलीकडे जाऊन आपल्या सेवांचे जाळे सर्व्हिस इकोसिस्टिममध्ये रूपांतरित करत असून विमानतळे रिटेल विक्री, खानपान सेवा आणि मीडिया यांचे हब बनत आहेत. 'एअर इंडिया'मध्ये टाटा समूह करत असलेला कायापालट नवी विमाने आणि नवीन ब्रॅण्डिंगपुरता मर्यादित नाही. ही एअरलाईन कंपनी प्रवाशांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यातून कमाई करण्यासाठी एक मजबूत पूरक सेवा पोर्टफोलिओ तयार करत आहे. पूरक महसूल आर्थिक वर्ष २०२४ मधील १,७०० कोटी रुपयांवरून आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २,५०० कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

२०२७ पर्यंत ही विमान कंपनी 'अपग्रेड प्लस,' 'सीट अपग्रेड', अतिरिक्त सामान, भाडे लॉक, प्रवास विमा, गिफ्ट कार्ड्स आणि 'व्हीएफएस ग्लोबल'च्या 'वनवास्को व्हिसा कॉन्सियरज'सारख्या सेवांद्वारे हा महसूल तिप्पट करण्याचे लक्ष्य ठेवत आहे. प्रवाशांना 'फ्लाय प्रायर' सारख्या सेवा आवडत आहेत. त्यामुळे जादा शुल्क देऊन त्याच दिवशी फ्लाईट बदलता येते. 'झिपअहेड'द्वारे प्राधान्य चेक-इन, टॅक्सी बुकिंगसाठी टाय-अप आणि टाटा एआयजी प्रवास विमा यांसारख्या इतर सेवा सोयीचे रूपांतर महसुलात करण्यासाठी डिझाईन केल्या आहेत. 'सीट निवडण्यापासून टॅक्सी बुकिंगपर्यंत प्रत्येक उत्पादन, ब्रॅण्डला प्रवाशांच्या निर्णय प्रक्रियेत टिकवून ठेवते', असे एका एअरलाईन अधिकाऱ्याने सांगितले. 'इंडिगो'चा मोठ्या प्रमाणावरील फायदा दर्शवतो की पूरक महसूल वाढ किती दूर जाऊ शकते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये मालवाहतूक, अतिरिक्त सामान आणि सीट निवडीमुळे त्याचा पूरक महसूल २०.७ टक्क्यांनी वाढून सात हजार ९४४ कोटी रुपयांवर पोहोचला. आर्थिक वर्ष २०२५ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये 'इंडिगो'ने २१ हजार ४११ कोटी रुपयांचे पूरक उत्पन्न नोंदवले. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ १४.२ टक्के इतकी होती आणि ती तिकीट महसूलवाढीपेक्षा जास्त होती. 'लाऊंज ॲक्सेस', प्राधान्य बोर्डिंग, प्रवास विमा आणि ६ई रिवार्ड्स रिडिम्प्शन हे 'इंडिगो'च्या कमी किमतीच्या विमान कंपनीकडून जीवनशैली ब्रॅण्डमध्ये होणारा बदल अधोरेखित करतात. पूरक सेवा आता दुय्यम व्यवसाय राहिलेल्या नाहीत. त्या नफ्याचे मुख्य इंजिन आहेत.

सध्या खाजगी विमानतळे एअरलाईन्सच्या धोरणाचे अनुकरण करत आहेत. गैर-विमानचालन महसूल आता त्यांच्या व्यवसाय मॉडेलचा केंद्रबिंदू बनला आहे. दिल्ली आणि हैदराबाद विमानतळांचे संचालन करणाऱ्या जीएमआर एअरपोर्ट्समध्ये गैरविमान वाहतूक (नॉन-एरो) उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील ४३ टक्क्यांवरून आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ४७ टक्क्यांपर्यंत वाढले आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी वाढले. किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री, खाद्य आणि पेय (एफ ॲण्ड बी) आणि इतर सेवा या वाढीमध्ये आघाडीवर आहेत. 'भारताचे विमान वाहतूक क्षेत्र विस्ताराच्या नवीन टप्प्यात प्रवेश करत असताना आम्हाला प्रवासी वाढ आणि खर्च या दोन्हीला चालना देणारे मजबूत अनुकूल घटक दिसत आहेत,' असे 'जीएमआर एअरपोर्ट्स'चे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (वाणिज्य आणि विकास) राजेश अरोरा यांनी सांगितले. आम्ही केवळ पायाभूत सुविधांचे संचालक या भूमिकेतून विकसित होऊन एक वैविध्यपूर्ण ग्राहक मंच बनलो आहोत आणि विमानतळांना मूल्य प्रदान करणाऱ्या गंतव्यस्थानांमध्ये रूपांतरित केले आहे, असे ते म्हणाले. आठ विमानतळांचे संचालन करणाऱ्या 'अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड'ने (एएएचएल) आर्थिक वर्ष २०२५ मध्ये गैरविमान वाहतूक महसुलातून चार हजार ९२६ कोटी कमावले. हे उत्पन्न 'अदानी एअरपोर्ट्स'च्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास निम्मे आहे.

एप्रिल मून रिटेल आणि मुंबई ट्रॅव्हल रिटेलसारख्या उपकंपन्या विस्तारणाऱ्या इन-हाऊस किरकोळ विक्री मॉडेलला चालना देत आहेत. अदानी समूह विविध टप्प्यांमधील शहरस्तरीय प्रकल्पांमध्ये चार अब्ज डॉलर्सची (सुमारे ३३ हजार कोटी रुपये) गुंतवणूक करत आहे. त्यापैकी जवळपास ७० टक्के रक्कम मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी राखून ठेवण्यात आली आहे. यामध्ये प्रवासी, कर्मचारी आणि शहरातील ग्राहकांना सेवा देणाऱ्या वैयक्तिककृत, डेटा-आधारित किरकोळ व्यवसायावर भर दिला जात आहे. 'आम्ही संपूर्ण विमानतळ व्यवसायाचा ताबा घेण्याची आणि सर्व किरकोळ व्यवसाय स्वतःच चालवण्याची योजना आखत आहोत', असे 'अदानी एअरपोर्ट'चे सीईओ गौरव सिंग यांनी सांगितले. ही कंपनी पुढील वर्षापर्यंत आपल्या सर्व विमानतळांवरील स्वतःच्या ब्रॅण्डच्या ५० स्टोअर्सवरून ३०० हून अधिक स्टोअर्सपर्यंत विस्तार करत आहे. त्यात २७० किरकोळ आणि ४० फूड ॲण्ड बेव्हरेज आऊटलेट्सचा समावेश आहे. बंगळुरूचे केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळ चालवणाऱ्या 'बंगळुरू इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड' (बीआयएएल)साठी महसुलाच्या ३५ टक्के वाटा 'नॉन-एरो' व्यवसायातून येतो. त्यात 'एफ ॲण्ड बी' लाऊंज, किरकोळ विक्री, ड्युटी-फ्री उत्पादनांची विक्री आणि जाहिरातींचा समावेश आहे. कंपनी पुढील पाच वर्षांमध्ये आपल्या किरकोळ व्यवसायाचा विस्तार ४० हजार चौरस मीटरवरून एक लाख चौरस मीटरपर्यंत वाढवण्याची आणि ५०० हून अधिक ब्रॅंड्स जोडण्याची योजना आखत आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# 'नकार'ग्रस्त प्रशासन!

वेगवेगळ्या आजारांनी त्रस्त असलेल्यांना आपण व्याधिग्रस्त म्हणतो. अशा 'ग्रस्त' लोकांच्या मांदियाळीत कायमच चर्चेत राहणारे दोन 'ग्रस्त' म्हणजे प्रकल्पग्रस्त आणि पूरग्रस्त! दोघेही बाधित, मात्र दोघांच्या व्याख्या वेगळ्या, त्यामुळे त्यांच्या समाधानाचे मार्गही वेगळे! खरं तर यांना न्याय देण्याची जबाबदारी प्रशासन, शासनाची! पण सध्या हेच जबाबदारी झटकण्याच्या व्याधीने ग्रस्त झाले आहेत. प्रकल्पग्रस्त की पूरग्रस्त या दुविधेत प्रशासन असले तरी शेकडो ग्रामस्थ मात्र मरणयातनेत जगत आहेत.

तोडगा काढला तर सर्वच समस्यांवर निघू शकतो. त्यासाठी तशी मानसिकता असायला हवी. विशेष करून प्रशासनातील अधिकारी कोणत्या मानसिकतेने आपल्या जबाबदारीचे निर्वहन करतात, त्यावर बरेच काही अवलंबून असते. ते माझे काम नाही किंवा ती जबाबदारी माझी नाही, अशी भावना जेथे आली, तेथे बट्ट्याबोळ झाल्याशिवाय राहत नाही. सध्या अशाच प्रशासकीय जबाबदारीच्या दायित्वाच्या फेऱ्यात गोसीखुर्द प्रकल्पाच्या बॅकवॉटरमुळे बाधित कारधा गावातील लोक अडकले आहेत. नदी काठावर त्यांचं गाव आहे. अनेक वर्षांपासून त्यांचे वास्तव्य तेथे आहे. आधी हीच नदी त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन होती. पण गोसीखुर्द प्रकल्प झाला आणि त्याच्या बॅकवॉटरचा फटका गावातील घरांना बसू लागला. कायम तुडुंब भरून राहत असलेल्या नदीमुळे गावातील घरांना ओल येऊ लागली. भिंती ओल्या, जमीन ओली, भिंतीला पाण्यामुळे जाणारे तडे ही स्थिती कायम राहत असताना वर्षातून एक दोनदा येणारा पूर यात भर घालणारा असाच आहे. पूर ही नैसर्गिक आपत्ती ठरावीक काळापुरती



असल्याने त्यावर तोडगा काढून स्थानिक प्रशासन मोकळे होते. पण कायम पाचवीला पुजलेला बॅकवॉटरच्या पाण्याचा त्रास तर जगणे कठीण करणारा आहे. सततच्या या त्रासाला कंटाळून ग्रामस्थांनी पुनर्वसनाची मागणी केली, तीही प्रकल्पग्रस्त म्हणून! तांत्रिकदृष्ट्या हीच मागणी योग्य असल्याचे प्रशासनातील काही जण मानत असले तरी ज्यांना यासाठी पुढाकार घ्यावयाचा आहे, त्यांना या बाधितांना प्रकल्पग्रस्त म्हणून घेण्याचे धाडस दाखविण्याची इच्छा नाही!

नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीने विस्थापित होत असलेल्यांना प्रकल्पग्रस्त संबोधले जाते. कारधा गावातील ३५६ घरांवर ओढवलेले संकट हे प्रकल्पग्रस्तांच्याच व्याख्येत मोडते. कारण पूर एकदा येतो, पण प्रकल्पाचे पाणी बाराही महिने साठून राहत असल्याने त्रास सहन करावा लागतो. अशावेळी यांचे विस्थापन होणे गरजेचे आहे. पूरग्रस्त आणि प्रकल्पग्रस्त यांना मिळणारे लाभही वेगवेगळे आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या व्याख्येत कारधावासी मोडले तर त्यांची जबाबदारी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला म्हणजे पर्यायाने जलसंपदा विभागाला घ्यावी लागणार आहे. आज हीच जबाबदारी घेण्यास संबंधित विभाग तयार नाहीत. कित्येक वर्षांपासून प्रकल्पग्रस्त की पूरग्रस्त या गोंधळात हे ग्रामस्थ जगत आहेत. पण त्यांना नेमके ते कशात मोडतात, हे सांगण्यास प्रशासन असमर्थ ठरत आहे. ते आंदोलने करतात, रस्त्यावर उतरतात पण प्रशासनातील अधिकारी बिनधास्त आहेत. प्रकल्पग्रस्त म्हणणे म्हणजे गेलेल्या घरांचा मोबदला देणे, एकाला शासकीय नोकरी देणे आणि मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करणे अशा शासनाच्या बाजूचा विचार जर पाटबंधारे विभागाचे अधिकारी करणार असतील तर अशांनी एकदा त्या 'पाणीग्रस्त' लोकांची अवस्था पाहून आलेच पाहिजे. पूरग्रस्त की प्रकल्पग्रस्त याच गोंधळात वर्षोन्वर्षे त्यांना खितपत ठेवून दिवस काढण्याची ही वृत्ती शासकीय लालफीतशाहीचे दर्शन घडविणारी आहे. अधिकारी या नात्याने लोकांप्रति असलेल्या कर्तव्याची गांभीर्याने जाणीव झाली तरच ती माझी जबाबदारी नाही या व्याधीने ग्रस्त अधिकारी काम करू शकतील, नाहीतर घरे पाण्यात गडप झाली तरी हा वाद मिटणार नाही, हे तेवढेच खरे! आज गोसीखुर्द प्रकल्पाने पाण्याची अंतिम पातळी गाठली असताना, ग्रामस्थांची झालेली अवस्था बघूनही जर शासनाचे दोन विभाग पूरग्रस्त की प्रकल्पग्रस्त याच गोंधळलेल्या मानसिकतेत राहणार असतील तर चांगल्या हेतूने उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पांनाही बदनामीची किनार लागलेली असेल!

९७६३७१३४१७

# 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिबजी : त्याग, शौर्य आणि मानवतेचा संदेश

भारताच्या इतिहासात अनेक व्यक्तिमत्त्वांनी आपल्या कार्यातून समाजाला दिशा दिली आहे. त्यात शौर्य, त्याग आणि मानवतेचा संदेश देणारे शीखांचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे स्थान विशेष आहे. त्यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या औचित्याने महाराष्ट्र शासनाने राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केले आहे. नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमांद्वारे त्यांच्या कार्याचा परिचय जनतेला करून देण्यात येणार आहे. नागपूर मध्ये हा कार्यक्रम झालेला असून नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हा कार्यक्रम होत आहे. त्या अनुषंगाने...

### ✻ ऐतिहासिक पार्श्वभूमी:-

गुरु तेगबहादुर साहिबजी हे सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे पुत्र आणि दहावे गुरू गोविंदसिंह यांचे पिता होते. त्यांचा जन्म अमृतसर येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना वैराग्याची ओढ होती. पुढे १६६४ मध्ये त्यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी शिवालिक पर्वतराजीत आनंदपूर नगर वसवून धर्मप्रचारासाठी यात्रांना प्रारंभ केला. आसामपासून काश्मीरपर्यंत त्यांनी समाजात सहिष्णुता, सत्य आणि अहिंसेचा संदेश पोचविला. त्यांनी ११६ पद्यांची रचना केली असून त्यात वैराग्य, क्षमा आणि मानवतेचा उत्कृष्ट आविष्कार दिसतो. ही पद्ये पुढे गुरु ग्रंथसाहिबात समाविष्ट झाली.

### ✻ त्याग आणि शौर्याची परंपरा:-

१७ व्या शतकात समाजावर अन्याय आणि अत्याचारांचे सावट होते. अशा काळात गुरु तेगबहादुर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी आपले जीवन अर्पण केले. दिल्लीतील चांदणी चौकात त्यांनी बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळे भारतीय समाजात एकतेची भावना दृढ झाली. त्यांच्या शहिदीनंतर दिल्लीतील सीसगंज गुरुद्वारा आणि रकाबगंज गुरुद्वारा हे स्मारक स्थळे उभी राहिली. ही स्थळे आजही त्याग, शौर्य आणि श्रद्धेची प्रेरणा देतात.



### ✻ समाजाचे योगदान:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या संघर्षात सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाज यांसारख्या अनेक घटकांनी मोलाची भूमिका बजावली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल यांनी गुरुजींसाठी प्राणार्पण केले. या समाजांनी सेवाभाव, साहस आणि श्रद्धेची परंपरा पुढे नेली.

### ✻ महाराष्ट्रातील कार्यक्रम:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या शहिदीच्या ३५० व्या वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने राज्यस्तरीय समिती स्थापन केली आहे. नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी सुरेश चंद्र सुरी मैदानावर सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या शस्त्रांची प्रदर्शनी लावण्यात आली. विविध समाज घटक एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम साजरा करण्यात आला.

नागपूरनंतर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत माहे फेब्रुवारी २०२६ मध्ये मुंबई येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### ✻ संदेश आणि प्रेरणा:-

गुरु तेगबहादुर साहिबजी यांनी दिलेला संदेश हा धार्मिकतेपलीकडे जाऊन मानवतेचा आहे. त्यांनी समाजात सहिष्णुता, एकता आणि स्वातंत्र्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या बलिदानाने भारतीयांना स्वधर्म आचरण्याचा आणि मानवी मूल्ये जपण्याचा आदर्श दिला. आजच्या काळात त्यांच्या विचारांची आठवण समाजाला एकत्र आणते. विविध प्रबोधनपर उपक्रमांद्वारे त्यांच्या त्यागाची शिकवण घराघरांत पोहोचविणे हेच या कार्यक्रमांचे उद्दिष्ट आहे.

'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे जीवन हे त्याग, शौर्य आणि मानवतेचे प्रतीक आहे. त्यांच्या शहिदीच्या ३५० व्या वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने आखलेले कार्यक्रम समाजात एकतेचा, सहिष्णुतेचा आणि मानवतेचा संदेश पोहोचविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. नागपूर, नवी मुंबई आणि नांदेड येथील कार्यक्रमांमधून त्यांच्या कार्याचा परिचय जनतेला होणार असून भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

**- सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर**

## वाचक पत्रे

### मुलं परदेशात, वृद्ध पालक भारतात

आज नागपुरात अनेक घरांमध्ये वृद्ध पालक एकटेच राहत आहेत. अशा पालकांना अकस्मात वैद्यकीय मदत लागल्यास त्याची फार कुचंबणा होते. अशा प्रसंगी ते आपल्या जवळच्या नातेवाईकांना दूरध्वनी करून बोलावतात अथवा शेजारी राहणाऱ्या तरुणांना मदतीला बोलावतात. एकदा ही तातडीची व्यवस्था झाली की मग या वृद्ध पालकांपैकी कोणीतरी परदेशातील मुलांना वैद्यकीय त्रासाबद्दल कळवतात. ही परदेशातील मुले पण जबाबदारीने भारतात येऊन आपल्या वृद्ध पालकांची व्यवस्थित काळजी घेतात. आकस्मिक वैद्यकीय उपचारांसाठी अशा वृद्ध पालकांसाठी प्रत्येक वॉर्डात काही तरुण स्वयंसेवकांची चमू उपलब्ध असावी, अशी सामाजिक कार्यकर्त्यांना विनंती आहे. हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना दिसत आहे. सबब, प्रशासनाने सुद्धा या प्रश्नावर तात्काळ उपाययोजना करावी असे वाटते.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### वाहतूक नियम मोडणाऱ्यांना शिक्षा आवश्यक

''वाहतूक नियम न पाळण्यात नागपूरकर अव्वल'' ही तरुण भारतात आलेली बातमी वाचली. तसेही पुण्या-मुंबईकडे ''नागपूरकर भारी'' म्हणून ओळखले जातात. वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी सामाजिक संस्था, पोलिसांतर्फे अनेकदा जनजागृती अभियान राबवले जातात. परंतु विशेषतः युवा वर्ग दुचाकी बेदरकार वाहनचालकांवर त्याचा काही चांगला परिणाम होत असल्याचे चित्र नाही. ट्रॅफिक सिग्नल मोडणारे अजूनही चौकाचौकात दिसतात. बातमीनुसार यात तरुणीही आघाडीवर आहेत. नियम मोडल्यावर ई-चालान जरी आले तरी त्याबद्दल खंत वाटण्याऐवजी दंडाचे पैसे सहज भरून टाकण्याची मानसिकता युवा वर्गात दिसते हे खरोखरच चिंताजनक आहे. वाहतुकीचे नियम अनेक असले तरी ट्रॅफिक सिग्नलचे उल्लंघन हे अतिशय घातक आहे. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. स्वत:बरोबर अन्य निष्पाप व्यक्तीलाही गंभीर इजा होऊ शकते ही देखील चिंता युवांमध्ये दिसत नाही. त्यामुळे वाहतूक नियम उल्लंघन केल्यानंतर आर्थिक दंडासोबत आणखी काय कठोर कारवाई करता येईल जेणेकरून वचक निर्माण होईल यावर सक्षम यंत्रणेने लवकर विचार करावा.

**राम राजे**/९४२१७७९९४५

### पराभूत उमेदवारांनो, जनसेवेचे व्रत सुरू ठेवा

महानगर पालिकेच्या निवडणुका झाल्या आणि निकालही लागले. या स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतुन एक गोष्ट प्रकर्षाने निदर्शनास आली, ती म्हणजे पराभूत झालेले उमेदवार जनसेवेचे घेतलेले व्रत अर्धवट सोडून देतात आणि पाच वर्ष गप्प बसतात. असे न करता हे व्रत अखंडपणे सुरू ठेवायला हवे अन्यथा आपल्या देशाला योग्य दिशा देणारे, भारतमातेचा गौरव वाढवणारे व समाजसेवा हाच जीवनाचा उद्देश असणाऱ्या समाजसेवकांपासून देश वंचित राहील.

समाजसेवा हाच आपल्या जीवनाचा प्रमुख उद्देश समजून जनसेवेकरिता आम्हास रामाने धाडीयले. हा आध्यात्मिक भाव सदैव मनात ठेवून पराभूत उमेदवारांनी, अधिक उत्साहाने समाजसेवेला पुनश्च प्रारंभ करायला हवा कारण जनसेवा करायला जनतेतून निवडून यायलाच हवे असा काही नियम नाही. निवडणुकीत पराभव झाल्यामुळे उगीच पराभवाची कारणमीमांसा करताना, जात, धर्म, पंथ, पैसा, पक्षनेता आणि कार्यकर्ते यांना दोष न देता, उद्यापासून सरळ समाजसेवेला प्रारंभ करायला हवा. कारण सुदृढ लोकशाहीत समाजसेवा करण्यापासून तुम्हाला कुणीही अडवू शकत नाही. समाजसेवेची सुरुवात लगेच व्हायला हवी. आपल्या प्रभागातील समस्या शोधून काढा, त्यावर विचारमंथन करा. त्या कोण सोडवू शकतो, त्याला किती अवधी लागेल या सर्व गोष्टींचा मन लावून अभ्यास करा आणि नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवकाकडे जा. समस्यांचे गांभीर्य लक्षात आणून द्या व किती कालावधीत सोडवू शकता याबाबत विचारपूस करा, समस्या सोडविण्याबाबतच वचन घ्या व समस्या सोडवायला बाध्य करा. दिलेल्या कालावधीत त्या समस्या सुटल्या नाही तर प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून सोडवून घ्या व जनतेला न्याय द्या. हे समाजसेवेचे व्रत अखंडपणे सुरू राहिले तर पुढच्या पाचव्या वर्षी राजकीय पक्ष तुमच्या पाठीमागे पक्षाचे तिकीट घेऊन धावतील कारण त्यांना सुद्धा तुमच्यासारख्या सेवाभावी वृत्तीच्या उमेदवारांची गरज असते. असे घडले तर, पक्षाच्या तिकिटासाठी तुम्हाला घालीन लोटांगण वंदीन चरण हा प्रकार करावा लागणार नाही, तसेच मतदारांच्या पायाची धूळ माथी धारण करून संपूर्ण मतदारसंघात फिरावं लागणार नाही. इच्छा नसताना उगीच हात जोडत पायपीट करावी लागणार नाही. तुम्ही प्रामाणिकपणे केलेल्या समाजसेवेच्या माध्यमातून सहज निवडून येऊ शकता. एवढे करून सुद्धा जर तिकीट मिळाले नाही किंवा निवडून आले नाही तरी काही फरक पडणार नाही कारण समाजसेवा हेच तुमच्या आयुष्याचे प्रमुख ध्येय आहे. जनसेवा करत राहायची आणि मानव जीवनाचं सार्थक करायचं.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती बडनेरा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### जैन सोशल ग्रुपच्या वतीने नि:शुल्क इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात शिबिर एक फेब्रवारीला

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील दिव्यांग ज्यांना हाताच्या कोपऱ्यापासून हात अपघातात गमावले अश्यांसाठी जैन सोशल ग्रुपच्या वतीने निशुल्क इलेक्ट्रॉनिक कुत्रिम हात तपासणी व स्पॉटवर वितरण शिबिराचे आयोजन रविवार, १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी. १ वाजेपर्यंत केले आहे. जैन सोशल ग्रुप इंटरनेशनल फेडरेशन महाराष्ट्र रिजन, इनाली फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पूर्णतः नि:शुल्क हे शिबिर आयोजित केले आहे. इच्छुकांनी नाव, आधार कार्ड, मोबाईल नंबर, हाताचा फोटो टेक्निशियन अभिषेक खंगारे (मोबाईल : ८६६८७२४००१), अमित दोशी (९८५००५५२२९), गौरव फडे( ९८२२२४८८०१) अथवा डॉ. निलेश फडे (९८२२४४५०८०) यांच्याकडे २५ जानेवारी २०२६ पर्यंत नोंदणी करावी.



### पद्मविभूषण महानायक डॉ. अमिताभ बच्चन सेवाभावी संस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महानायक दिनदर्शिका २०२६ चे अठरा वर्षे पूर्ण झाले असून विडी घरकुल सागर येथे महानायक दिनदर्शिका २०२६ चे प्रकाशन सोहळा संपन्न झाला व तसेच महानायक दिनदर्शिका चाहत्यांना मोफत देण्यात आल्या यावेळी पद्मविभूषण महानायक डॉ.अमिताभ बच्चन सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विजय इप्पाकायल, संजय वाघमारे, रमेश सुंचू , राजु पानगंटी,यावेळी उपस्थित होते तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देविदास इप्पाकायल ,आनंद कनकी ,राज मणियार, रमेश शेट्टी, श्रीकांत म्हेत्रे व तसेच महानायक प्रेमी उपस्थित होते.

### धर्मण्णा सादूल प्रशालेचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेचा १०० टक्के निकाल

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नीलमनगर भाग ३ व ४ मधील धर्मण्णा सादूल प्रशालेचा शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेतील एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. एलिमेंटरीमध्ये १५ पैकी ६ विद्यार्थी अ श्रेणी, ३ ब श्रेणी व ६ क श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांना कला शिक्षक संतोष धारेराव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष नाबिखा पठाण, मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण व सय्यद आफरीन यांनी अभिनंदन केले.

# बाळीवेस व अक्कलकोट रोड परिसरात अतिक्रमणविरोधी कारवाई

### ५ खोके जागेवरच केले निष्काशीत; ५ चारचाकी हात गाड्या जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने आज शहरातील दोन ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. आज सकाळच्या सत्रात महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने बाळीवेस परिसरातील रस्त्यावर वाहतुकीस अडथळा ठरणारे पाच खोके जागेवरच निष्काषित केले. अक्कलकोट रोडवरही कारवाई केली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसारर नियंत्रण अधिकारी तपन



डंके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. रस्त्यावर अतिक्रमण झाल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना होत असलेला त्रास लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

बाळीवेस येथील भिंती लगत रस्त्याच्या कडेला असलेले पाच खोके जेसीबीच्या साह्याने जागेवरच निष्काशीत करण्यात आली. सायंकाळी अक्कलकोट रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ अतिक्रमणविरोधी दुसरी कारवाई करण्यात आली. या वेळी तीन चारचाकी हात गाड्या तसेच रस्त्यावर ठेवलेले इतर साहित्य जप्त करण्यात आले. अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी व अपघाताची शक्यता वाढत असल्याने महापालिकेने ही कारवाई केल्याचे अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले.

शहरात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि सार्वजनिक रस्ते मोकळे करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. नागरिकांनी नियमांचे पालन करून रस्त्यावर अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

# दोन महिन्यानंतर आगामी राजकीय वाटचालीविषयी निर्णय घेणार

### माजी नगरसेवक रियाज खरादी यांची भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत प्रभाग १४मधून समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवून पराभूत झालेले रियाज खरादी यांनी आगामी राजकीय वाटचालीबाबत दोन महिन्यात निर्णय घेणार असल्याचे सांगितले.


पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे असलेले खरादी हे सन २०१७ मध्ये प्रभाग १४मधून एमआयएमच्या तिकिटावर निवडून आले होते. त्यांना महापालिकेत या पक्षाचे गटनेते म्हणून काम करण्याची संधी लाभली होती. या पदावर काम करताना त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवण्याबरोबरच छापदेखील पाडली होती. गत काही वर्षात एमआयएममधून अनेक नगरसेवक बाहेर पडले, मात्र खरादी हे पक्षातच होते. पक्षांतर्गत राजकारणाचा फटका त्यांना बसला होता. या पार्श्वभूमीवर ते महापालिका निवडणुकीत एमआयएमतर्फे उभे राहणार की अन्य पक्षातर्फे असा प्रश्न निर्माण झाला होता. एमआयएमकडून त्यांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षामध्ये प्रवेश केला होता. मात्र या पक्षाने शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाशी युती केल्याने खरादी हे नाराज झाले होते. शिवसेनेची युती झाल्याने ते राष्ट्रवादीमधून बाहेर पडत समाजवादी पक्षाच्यावतीने प्रभाग क्रमांक १४ मधून निवडणूक लढविली होती.

### इंचगिरी मठात आज विविध धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर :** नेहरूनगर येथे श्री क्षेत्र इंचगिरी मठ श्री. स.स. भाऊसाहेब महाराज, श्री गिरीमल्लेश्वर महाराज यांच्या सप्ताहनिमित्त बुधवार २१ जानेवारी सकाळी ९ वा. विष्णुसहस्त्रनाम पठण व १० वा. श्रींची पालखी मिरवणूक होऊन ११ वा. दासबोध पूजनाने विविध धार्मिक कार्यक्रम होतील. यावेळी संत महंताचे व मातोश्रींचे आर्शिवचन नेमाचे, रमा भजनी मंडळकडून भजन व आरती होईल त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल. या कार्यक्रमास प्रवचनकार मातोश्री पुष्पलताजी पाटील महाराज, प.पू. तानाजी महाराज, यादगिरी महाराज, आनंदसिध्द महाराज (असुरले), ह.भ.प. लक्ष्मण महाराज, आ.सुभाष देशमुख, महादेव बसन्ना कोगणुरे, ओबीसी युवा अध्यक्षा प्रतीक्षा चव्हाण आदींची उपस्थिती आहे.

### जुळे सोलापूर संतोष नगरच्या गणेश मंदिरात उद्या धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**



जुळे सोलापूरातील संतोष नगर येथील गणेश मंदिरात गणेश जयंतीनिमित्त विविध धार्मक कार्यक्रम २२ व २३ जानेवारी रोजी आयोजित केले आहेत. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन गणेश मंदीर समितीचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील यांनी केले आहे. कार्यक्रम : २२ जानेवारी : स. ८ : गणेश याग होमहवन, पुजा. दु. १२: महाआरती, दु. ४ : संतोष महिला भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम. सायं.६ वा. : दीपोत्सव. २३ जानेवारी महाआरतीनंतर महाप्रसाद (शुभांगी व नवनाथ चव्हाण कुंटुबीयांकडून), प्रभागातील नूतन नगरसेवकांचा सत्कार.

### उभ्या ट्रॅक्टर ट्रेलरला मोटरसायकलची धडक, एकाचा मृत्यू

**अकलूज, दि. २० जानेवारी-**



रस्त्याच्या कडेला ऊसाने भरलेल्या उभ्या ट्रॅक्टर ट्रेलरला मोटरसायकलची धडक बसून एकाचा मृत्यू झाला. येथील युवक अरबाज नजीर तांबोळी (वय २१) असे त्याचे नाव आहे. सोमवारी रात्री तो कराड गावावरून १६ पीर या देवस्थानवरून अकलूज कडे येताना माळशिरस जवळ गारवाड पाटी जवळ उभा असलेल्या ट्रॅक्टर ट्रेलर ला धडकून मुर्त्यू झाला. त्याच्या पश्चात वडील नजीर गुलाब तांबोळी, आई जरीना नजीर तांबोळी आणि विवाहित बहीण महेक अल्ताफ तांबोळी असा परिवार आहे. माळशिरस पोलीस ठाण्यामध्ये याबाबत अपघाती नोंद झाली आहे


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे चिंचगाव, ता. माढा, जि. सोलापूर येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे चिंचगाव, ता. माढा, जि. सोलापूर येथील शेतीजमीन, क.ग. नंबर ११६ पैको क्षेत्र ०१ हे २९ आर. पो.ख. ०० हे ३२ आर, ही मिळकत विरकुमार पवनकुमार मेहता आणि शीतल पवनकुमार मेहता यांचे मालकी हक्क व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. तर क.ग. नंबर ११५/४ पैकी क्षेत्र ०० हे १३ आर ही मिळकत विरकुमार पवनकुमार मेहता यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. वर नमूद मिळकती विरकुमार पवनकुमार मेहता आणि शीतल पवनकुमार मेहता यांनी त्यांचे कौटुंबिक आर्थिक अडचणीसाठी व कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेल्या असून, त्याची माहिती आमचे अशिलांना झाल्यानंतर उभयतांचे दरम्यान चर्चा होवून आमचे अशिलांनी वर नमूद मिळकती खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर जमीन मालकांनी आमचे अशिलांकडून प्रस्तुत व्यवहारापोटी काही इसारा रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकती निबंध, निजोखमी व निष्कर्जा असल्याची खात्री आणि भरवसा आमचे अशिलांना सदर जमीन मालकांनी दिलेला आहे. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार असेल अथवा बँक, पतसंस्था, फायनान्स, सोसायटी बोजा, टाच, गहाण, लीज, साठेखत, खरेदीखत, पोटगी हक्क, नोटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, हितसंबंध अथवा दावा असल्यास, संबंधितांनी प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकत / तक्रार द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध, निजोखमी व निष्कर्जी असल्याचे समजण्यात येईल. तसेच कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास तो त्याने जाणीवपूर्वक कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार व हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. उगाच प्रस्तुत व्यवहाराची माहिती नव्हती केवळ या तक्रारीस वाव राहू नये, म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.
दि.२०/०१/२०२६

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
विजयसिंह विलास व्यवहारे
(BA, LL.B.)
रा. तडवळे, म. ता. माढा, जि. सोलापूर
मो.नं. ९०२१२२७१२५



### जाहीर प्रसिध्दीकरण

९७/२०२६
नि. ५
अर्ज वारस दाखला मिळणेबाबत
दि. कि. अर्ज नं. १३५/२०२५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात**

१) सुनिता शिवानंद काळे, वय ३६ वर्षे,
धंदा - घरकाम, रा. सहयाद्रीनगर,
वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) श्रावणी शिवानंद काळे, वय - १४ वर्षे,
धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई
अर्जदार नं. १ **अर्जदार**
३) साईराज शिवानंद काळे, वय १३ वर्षे,
धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई
अर्जदार नं. १
४) स्वरांजली शिवानंद काळे, वय १० वर्षे
धंदा- शिक्षण, अ.पा.क. आई
अर्जदार नं. १
५) सुशाला उर्फ सुशिलाबाई आप्पासाहेब काळे,
वय - ७८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर

**विरूध्द**

**कोणी नाही** .......... **सा.वाला**

अर्ज - Bombay Regulation Act
Section II प्रमाणे -

ज्या अर्थी,

अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल आणि अर्जदार नं. ५ यांचा मुलगा शिवानंद आप्पासाहेब काळे हे दि. ०३/०४/२०२० रोजी मौजे वैराग, ता. बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदार नं. १ ते ५ यांचे शिवाय मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ यांना शासकीय सवलती व इतर लाभ मिळणेसाठी अर्जदारांना वारस दाखला मिळणे जरुरीचे आहे. त्यासाठी शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे व कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांचे जवळचे व कायदेशीर वारस ठरवून वारस दाखला मिळणे न्यायाचे दृष्टीने जरूरीचे झाले आहे. सबब मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे कायदेशीर वारस ठरवून त्यांना वारस दाखला मिळणेसाठी अर्जदारांनी सदरचा दाखल केलेला आहे.

त्या अर्थी

सदर अर्जदार नं. १ ते ५ यांचे व्यतिरिक्त मयत शिवानंद आप्पासाहेब काळे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २७/०२/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्कयानिशी दिले असे.
ता. १७/०१/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दि. न्या. क. स्तर बार्शी, ता. बार्शी



### CHANGE OF NAME

I, Varsha Rohan Kota, wife of Rohan Kota, residing at C-26/47, Vinkar Society, MIDC, Solapur, 413006, Maharashtra, India, hereby declare that I am changing my name from "Shravani Rohan Kota" to "Varsha Rohan Kota" for passport issuance
Date : 20.01.2026
Place: Solapur



### मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
यांत्रिक काम

निविदा सूचना क्रमांक GEM/2026/B/7117378 दिनांक-19.01.2026 डीआरएम (एम) यांचे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. 1 कामाचे नाव आणि त्याचे ठिकाण:- सोलापूर विभागातील प्राथमिक देखभाल केलेल्या गाड्यांमध्ये ऑन बोर्ड हाऊस कीपिंग सर्व्हिस (ओबीएचएस) चे कंत्राट काम 28 महिन्यांच्या कालावधीसाठी जीईएम द्वारे मनुष्यबळ आधारावर. 2. निविदा प्रणाली:- दोन पॅकेट प्रणाली. 3. कामाची अंदाजे किंमत:- रु. 9,08,47,596.19/-, 4. निविदा फॉर्मची किंमत:- शून्य, 5. निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता:- डीआरएम(एम) चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, 6. जमा करावयाची बक्षिसे:- रुपये 6,04,240.00/-, 7. काम पूर्ण करण्याचा कालावधी:- काम सुरू झाल्यापासून अठ्ठावीस महिने. 8. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:- 11.02.2026 सकाळी 11.00 वाजता, 9. निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:- 11.02.2026 सकाळी 11.30 वाजता, 10. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक जेथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल:- WWW.GeM.gov.in.

26 Sr. DME.Sur

तुमच्या प्राण्यांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा



### जाहीर प्रसिध्दीकरण

**भारत सहकारी गारमेंट्स मर्या. सोलापूर या संस्थेचा, गट नं.१२, होटगी, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गारमेंट प्रकल्प भाडेतत्वावर देण्याचे ठरविले असून, त्याकरीता इच्छुक व पात्र असलेल्या व्यक्तीकडून, निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकानी ७(सात) दिवसाचे आत संस्थेकडे तपशिलवार माहितीसह निविदा सादर करणेचे आहे. त्याकरीता पुढील माहिती व कागदपत्रासह निविदा सोबत पूर्तता करण्यात यावी. गारमेंट प्रकल्प भाडेतत्वावर देण्याकरीता प्रामुख्याने पुढील अटी राहतील.**

१) भाडेतत्वावर रेडीमेड गारमेंट उत्पादन करीता मर्यादित राहील.
२) सदरहू प्रकल्प चालविण्याकरीता, संस्थेकडून ठरविलेल्या व असलेल्या जागेत गारमेंटचे उत्पादन करणे बंधनकारक राहील.
३) गारमेंट प्रकल्प किमान ५ वर्षाकरीता भाडेतत्वावर मर्यादित राहील.
४) उपलब्ध असलेल्या मशिनरी उपयोगात आणणेकरीता देणेत येतील.
५) वरील सर्व वस्तूस्थितीचा विचार करुन किमान भाडे ठरविणे करीता निविदा सादर करावी.
६) निविदे सोबत EMD रक्कम रुपये १०,००,०००/- (दहा लाख रुपये) डिमांड ड्राफ्ट अथवा ऑनलाईन भरणेचे आहे.
७) कोरी निविदा फॉर्मची किंमत रु.१०,०००/-(दहा हजार रुपये) राहील.
८) निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार संस्थेस राहील.

आर्यन क्रिएशन

दिनांक : २१/०१/२०२६
ठिकाण : सोलापूर

प्रभारी व्यवस्थापक
भारत सहकारी गारमेंट्स मर्या. सोलापूर
मो.: ७७०९६७८९८७



भा.कृ.अनु.प.– राष्ट्रीय अनार अनुसंधान केन्द्र, सोलापुर
ICAR - National Research Centre on Pomegranate
(Indian Council of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255 (M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263,F-(0217) 2353533
E mail- nrcpomegranate@gmail.com, Website- nrcpomegranate.icar.gov.in
(ISO 9001:2015 Certified Institute)

**WALK-IN-INTERVIEW**

A Walk in interview will be held on 23.02.2026 11:00 AM at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of workers under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | Scientific Validation of an AI-Enabled Crop Growth Tracking Platform for Precision Management of Pomegranate | Young Professional - 1 | 01 |
| 2. | | Project Assistant/ Field Assistant | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.icar.gov.in.

Sd/-
DIRECTOR




### सोमपातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनचे निवेदन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांच्या सूचनेनुसार ट्रेड युनियनचे मार्गदर्शक इकबाल तडकल यांनी सोमपा अतिरिक्त आयुक्त पवार यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

निवेदनात घनकचरा व्यवस्थापन विभागातील बडतर्फ करण्यात आलेल्या १५ कर्मचाऱ्यांना तात्काळ सेवेत रुजू करून घ्यावे, तसेच आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्वातंत्र्यदिनी दिलेल्या आश्वासनानुसार कायम, बदली रोजंदारी, मानधनावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मेडिकल कॅशलेस विमा योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.यासह पदोन्नतीवर जमादारपदी नियुक्त झालेल्या महिला व बिगारी कर्मचाऱ्यांना पदोन्नती नको असल्यास कोणतेही नुकसान न करता मूळ पदावरच कायम ठेवावे, या मागण्यांचा समावेश आहे. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त पवार यांनी सर्व मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी खजिनदार अरुण मेहेत्रे, राम चंदनशिवे, दिनेश बनसोडे, सुनील शिंदे, संतोष गायकवाड, महेश खोडके, राहुल गायकवाड, अतुल जाधव उपस्थित होते.


रजि. नं. बी.पी.टी.ओ.-१५४० लातूर



### श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर

### श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर
### देणगी प्रस्ताव

लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाची ७३ वी महाशिवरात्री यात्रा रविवार दि. १५.०२.२०२६ ते सोमवार दि. ०२.०३.२०२६ या महापर्वाच्या कालावधीत साजरा केली जाणार आहे.

या यात्रा महोत्सव कालावधीसाठी देवालयाच्या परिसरातील आनंद मेळावा व विविध पाळण्यांसाठीच्या मोकळया जागेसाठी देणगी प्रस्ताव बुधवार दि. २८.०१.२०२६ रोजी सकाळी ११.३० वा. पासून सुरु होणार आहे. देणगी प्रस्तावासंबंधीची माहिती यावेळी देण्यात येईल.

तरी इच्छुकांनी देणगी प्रस्ताव बुधवार दि. २८.०१.२०२६ रोजी सकाळी ११.३० ते दुपारी २.३० पर्यंत सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयात सादर करावेत. याबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार प्रशासक व विश्वस्त मंडळ यांना राहतील. देवालयाच्या सर्व नियम व अटी देणगी प्रस्ताव धारकांवर बंधनकारक राहतील. तसेच सदरच्या देणगी प्रस्तावाच्या बाबतीत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या अटी व शर्ती लागू राहतील.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालयाच्या परिसरातील आनंद मेळ्यासाठीची मोकळी जागा (रिकामी) महाशिवरात्री यात्रा कालावधीपर्यंत देणगी प्रस्ताव स्वरुपात देण्यात येणार आहे. तरी इच्छुक आनंद मेळाधारकांनी यामध्ये सहभाग घेवून सहकार्य करावे.

अधिक माहितीसाठी खालील मोबाईल नंबर्स वर संपर्क करावे.

**१. श्री अशोकरावजी भोसले** मो. ९४२२४७०२४९
**२. श्री सुरेशजी गोजमगुंडे** मो. ९८९००४३४२३
**३. श्री दत्तात्रय सुरवसे** मो. ९६६५३४२४३४

स्वाक्षरित/-
श्री सचिन सु. जांबुतकर
प्रशासक
श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवालय, लातूर



बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे बँक ऑफ महाराष्ट्रचा अधिकृत अधिकारी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करणारी मागणी सूचना दिनांक ०४/१०/२०२३ रोजी जारी केली होती.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, मी, सदर कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १९/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | शाखा- वाडिया हॉस्पिटल<br>कर्जदार -<br>१.श्री कपिल राजू जाधव.<br>२. श्रीमती प्रिती राजू जाधव.<br>३.सौ.रेणुका कपिल जाधव.<br>४. श्रीमती मीनाक्षी दीपक गायकवाड<br>५. श्रीमती भारती राजू जाधव<br>६. राजू मोहन जाधव<br><br>पत्ता : सर्व आर/ओ, प्लॉट क्रमांक १३२ आणि १३३ रामवाडी अंबाबाई मंदिर सोलापूर ४१३००१ | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन<br>श्री. कपिल राजू जाधव, श्रीमती प्रीती राजू जाधव. श्रीमती रेणुका कपिल जाधव, श्रीमती मीनाक्षी दीपक गायकवाड आणि भारती राजू जाधव- नोंदणीकृत गहाण या सर्व जमिनीच्या तुकड्या आणि तुकड्यांचे गहाण रामवाडी, तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर येथे आहेत. मालमत्ता आयडी: २०००५६८५७५१३.<br><br>फायनल प्लॉट क्रमांक २२८, सीटीएस क्रमांक ४१३ मधील प्लॉट क्रमांक १३३/१ येथे एक निवासी घर, रामवाडी येथे १२५.०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे, अंबाबाई मंदिराजवळ, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर<br>पूर्व- कपिल जाधव यांचे घर.<br>दक्षिण-जालिंदर खेडचे घर.<br>पश्चिम-रस्ता<br>उत्तर-रस्ता | मागणी सूचना:<br>दिनांक: ०४/१०/२०२३.<br><br>खाते शिल्लक: रु.९०,९०,४९७.००+ लागू न केलेले व्याज.<br><br>एकूण: रु. ९०,९०,४९७.००/- (नव्वद लाख नव्वद हजार चारशे सत्याण्णव रुपये फक्त)<br><br>भौतिक ताबा दिनांक : १९/०१/२०२६ |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - 19/01/2026

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### यूपी डोमिनेटर्सकडून दिल्ली दंगलचा पराभव

**नोएडा :** मंगळवारी येथे प्रो रेसलिंग लीग (पीडब्ल्यूएल) सामन्यात यूपी डोमिनेटर्सने उल्लेखनीय पुनरागमन केले आणि दिल्ली दंगल वॉरियर्सचा ५-४ असा पराभव केला. पुरुषांच्या ८६ किलो गटात, दिल्ली दंगल वॉरियर्सच्या वफाईपूर हादी बख्तियारने मिखाइलोव्ह वासिलचा ७-४ असा पराभव केला. त्यानंतर, महिलांच्या ७६ किलो गटात दिल्लीच्या अनास्तासिया अल्पिएवाने ओजो दामोला हन्नावर ११-२ असा विजय मिळवला. पुरुषांच्या ७४ किलो गटातही दिल्लीने चांगली कामगिरी केली. अझरबैजानच्या तुरान बायरामोव्हने अभिमन्यू मांडवालचा ३-० असा पराभव करून दिल्लीला ३-० अशी आघाडी मिळवून दिली. महिलांच्या ५७ किलो गटात तपस्या गहलावतने कार्ला गोंझालेझचा ८-२ असा पराभव करून अखेर यूपीने पुनरागमन विजय मिळवला. दिल्लीचा कर्णधार आणि २३ वर्षांखालील विश्वविजेता सुजीत कालकलने पुरुषांच्या ६५ किलो गटात विशाल कालीरमणचा पराभव करून संघाची आघाडी ४-१ अशी वाढवली.

### लेहमध्ये सहाव्या खेलो इंडिया स्पर्धेचे उद्घाटन

**लेह :** नायब राज्यपाल कविंद्र गुप्ता यांनी मंगळवारी अत्याधुनिक एनडीएस आईस हॉकी स्टेडियममध्ये ६व्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धा २०२६ चे उद्घाटन केले. ही स्पर्धा सात दिवस चालणार असून, २६ जानेवारी रोजी संपतील. १९ राज्यांमधील १,०६० स्पर्धक यामध्ये सहभागी होतील. यात भारतीय सैन्य आणि इंडो-तिबेटी सीमा पोलिसांसह खेळाडू, तांत्रिक अधिकारी, सहायक कर्मचारी आणि स्वयंसेवक यांचा समावेश आहे. आईस हॉकी आणि स्पीड स्केटिंग व्यतिरिक्त, फिगर स्केटिंग स्पर्धा देखील पहिल्यांदाच आयोजित केल्या जातील. क्रीडा विकासासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित कविंद्र गुप्ता म्हणाले, एनडीएस आईस हॉकी रिंक, गुपुक तलाव आणि लडाख स्काउट्स रेजिमेंटल सेंटर रिंक खेळांसाठी पूर्णपणे सज्ज आहेत. एनडीएस स्टेडियममधील ५३.५८ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला आईस हॉकी रिंक ही एक मोठी कामगिरी आहे.

### भारतीय महिला खेळाडूंसाठी 'द नेक्स्ट सेट' लाँच

**हैदराबाद :** सहा वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती सानिया मिर्झाने मंगळवारी 'द नेक्स्ट सेट' नावाच्या उपक्रमाची घोषणा केली. याचा उद्देश टेनिससह भारतातील आघाडीच्या आणि उदयोन्मुख महिला खेळाडूंना मार्गदर्शन करणे आणि त्यांना पाठिंबा देणे हा आहे. सानियाने उच्चस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना पाठिंबा देऊन क्रीडा जगताला परत देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला. हा कार्यक्रम प्रामुख्याने प्रशिक्षक आणि फिजिओथेरपिस्टसह समर्पित समर्थन प्रणालीची सोपी प्रवेश प्रदान करेल, जे सातत्यपूर्ण तयारी आणि समन्वय सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण हंगामात खेळाडूंसोबत स्पर्धांमध्ये प्रवास करू शकतात. याव्यतिरिक्त, या कार्यक्रमात सानियाच्या अकादमीमध्ये विशेष टेनिस शिबिरे आणि प्रशिक्षण कार्यशाळा समाविष्ट असतील.

### आसाममध्ये सातव्यांदा होणार संतोष ट्रॉफी

**नवी दिल्ली :** ७९ वी राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा संतोष ट्रॉफी बुधवारपासून आसाममध्ये सुरू होत आहे. सातव्यांदा येथे हे आयोजन केले जात आहे. संतोष ट्रॉफी पहिल्यांदा १९५९-६० मध्ये आसाममध्ये खेळवण्यात आली होती. स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी, सर्व राज्यांमधील संघांना नऊ गटांमध्ये विभागण्यात आले आहे. प्रत्येक गटातील अव्वल संघ अंतिम फेरीत पोहोचेल. यजमान आणि गेल्या हंगामातील उपविजेते, आसाम, पश्चिम बंगाल आणि केरळ थेट अंतिम फेरीत पोहोचतील. बाद फेरीचे उपांत्य फेरीचे सामने २ आणि ३ फेब्रुवारी रोजी, उपांत्य फेरीचे सामने ५ फेब्रुवारी रोजी आणि अंतिम सामना ८ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# न्यूझीलंडचा विजयरथ रोखणार भारत

### सूर्यकुमार यादवकडे सर्वांचे लक्ष

### आज पहिला टी-२० सामना

**नागपूर, २० जानेवारी**

अनेक दिवसांपासून प्रत्यक्ष आंतरराष्ट्रीय क्रिकेट पाहण्यास उत्सुक असलेल्या नागपूरकरांची प्रतीक्षा आज संपणार आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात बुधवारी टी-२० सामना होणार आहे. नुकत्याच संपलेल्या एकदिवसीय मालिकेत न्यूझीलंडने भारताचा २-१ असा पराभव केल्यामुळे पाहुण्या संघाचा आत्मविश्वास बळावला आहे, तर नागपूरकर नेहमीच भारतीय संघाचे प्रोत्साहन वाढवतात, त्यामुळे भारतीय संघही दमदार खेळ सादर करेल, अशी येथील क्रिकेट चाहत्यांना आशा आहे.



बुधवारच्या सामन्यापूर्वी व्हीसीए मैदानावर सराव करताना न्यूझीलंडचे काईल जेमिसन, ईश सोढी आणि इतर खेळाडू.

काही काळापासून धावा काढण्यास संघर्ष करणारा कर्णधार सूर्यकुमार यादव बुधवारपासून न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत फॉर्ममध्ये परतण्यास उत्सुक असेल. भारत एकदिवसीय मालिकेतील पराभवाचा बदला घेण्याचा आणि पुढील महिन्यात घरच्या मैदानावर होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी तयारी मजबूत करण्याचा प्रयत्न करेल.

२०२४ मध्ये सूर्यकुमारने टी-२० संघाचे नेतृत्व स्वीकारल्यापासून, भारताने चांगली कामगिरी केली आहे, विजयाची टक्केवारी ७२ हून अधिक आहे. यामुळे कर्णधाराच्या निराशाजनक फलंदाजी कामगिरीकडे दुर्लक्ष करण्यात आले, परंतु आता तसे राहिलेले नाही.

गेल्या दोन वर्षांपासून, भारतीय टी-२० संघ स्वयंचलित मोडवर आहे, फक्त काही पराभवांना तोंड देत आहे. आयपीएलमुळे त्यांच्याकडे असे खेळाडू आहेत जे त्यांच्या भूमिका चांगल्या प्रकारे जाणतात.

तथापि, भारतीय संघावर विश्वचषक विजेतेपदाचे रक्षण करण्यासाठी आणि घरच्या मैदानावर खेळण्यासाठी दबाव असेल आणि सूर्यकुमार न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी या घटकांचा विचार नक्कीच करेल.

न्यूझीलंड हा एक मजबूत संघ आहे आणि गेल्या वर्षभरात त्यांनी चांगल्या खेळी केल्या आहेत. ज्यात भारताविरुद्ध कसोटी मालिकेचा क्लीन स्वीप आणि एकदिवसीय मालिका जिंकणे यांचा समावेश आहे. पहिल्यांदाच भारतीय भूमीवर द्विपक्षीय एकदिवसीय मालिका जिंकल्याने त्यांच्या खेळाडूंचे मनोबल निश्चितच वाढले आहे.

परंतु जेव्हा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा विचार केला जातो तेव्हा सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील भारताने गेल्या २५ पैकी १८ सामने जिंकून एक वेगळा संघ असल्याचे सिद्ध केले आहे. हे मुख्यत्वे अभिषेक शर्माच्या स्फोटक सुरुवातीमुळे आणि मधल्या षटकांमध्ये वरुण चक्रवर्तीच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे आहे.

२०२४ च्या टी-२० विश्वचषकापासून खेळल्या गेलेल्या २१ पैकी १३ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने न्यूझीलंडने जिंकले आहेत. आक्रमक सलामीवीर डेव्हॉन कॉन्वे, कर्णधार मिशेल सँटनर, वेगवान गोलंदाज जेकब डफी आणि फॉर्ममध्ये असलेल्या डॅरिल मिशेल, ग्लेन फिलिप्स यांच्यासह, न्यूझीलंड एक मजबूत प्रतिस्पर्धी ठरू शकतो.

तिलक वर्माला खेळण्यासाठी अधिक वेळ देण्यासाठी, त्याने फलंदाजीच्या क्रमात तिसऱ्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे. सूर्यकुमारला हे चांगलेच माहिती आहे की त्याच्या खराब कामगिरीचे ड्रेसिंग रूममध्ये परिणाम होऊ शकतात आणि त्याला आता कोणत्याही परिस्थितीत कामगिरी करावी लागेल. भारतीय संघातील फिरकीपटूंविरुद्ध सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेल्या अय्यरला तिलक वर्माच्या दुखापतीमुळे संघात समाविष्ट करण्यात आले आहे. न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज आणि अष्टपैलू ख्रिश्चन क्लार्क टी-२० मालिकेसाठी संघात राहील कारण मायकल ब्रेसवेल आणि ॲडम मिल्ने दोघेही किरकोळ दुखापतींमधून बरे होत आहेत. (तभा वृत्तसेवा)

**आजचा सामना**

**भारत विरुद्ध न्यूझीलंड**
**स्थळ :** व्हीसीए स्टेडियम जामठा, नागपूर
**वेळ :** संध्याकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# दुखापतग्रस्त ब्रेसवेलच्या तंदुरुस्तीवर लक्ष

### प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांची माहिती

**नवी दिल्ली, २० जानेवारी**

भारताविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत अष्टपैलू मायकेल ब्रेसवेलचा सहभाग इंदूरमधील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यादरम्यान झालेल्या डाव्या पायाच्या दुखापतीतून तो बरा होतो



की नाही यावर अवलंबून असेल, असे न्यूझीलंडचे प्रशिक्षक रॉब वॉल्टर म्हणाले.

न्यूझीलंडने होळकर स्टेडियमवर भारताचा ४१ धावांनी पराभव करून एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली, परंतु क्षेत्ररक्षण करताना झालेल्या पायाच्या दुखापतीमुळे ब्रेसवेल गोलंदाजी करू शकला नाही.

न्यूझीलंड क्रिकेटच्या प्रसिद्धी पत्रकात वॉल्टर म्हणाले की, ब्रेसवेलवर उपचार सुरू राहतील आणि त्याच्या फिटनेसवर लक्ष ठेवले जाईल. त्यानंतरच दौऱ्यात त्याच्या पुढील सहभागाबाबत निर्णय घेतला जाईल.

वॉल्टर म्हणाले की, एकदिवसीय मालिका जिंकणे आणि इतिहास रचणे खूप खास होते. संघाच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे आम्ही यापूर्वी कधीही न पाहिलेले काहीतरी साध्य केले.

ब्रेसवेल संघासोबत राहील, परंतु त्याला लवकरच पूर्ण फिटनेस मिळवण्याची आवश्यकता असेल. मायकल संघासोबत नागपूरला गेला आहे, पण टी-२० मालिकेपूर्वी फारसा वेळ शिल्लक नाही, त्यामुळे आम्हाला लवकरच त्याच्या तंदुरुस्तीचे मूल्यांकन करावे लागेल, असे ते म्हणाले. वेगवान गोलंदाज ख्रिश्चन क्लार्क संघासोबत राहील, असेही त्यांनी सांगितले.

या मालिकेतील पहिल्या तीन सामन्यांसाठी आमच्याकडे पुरेसे जलद गोलंदाजीचे पर्याय असतील याची आम्हाला खात्री करायची आहे आणि ख्रिश्चनसाठी त्याच्या पहिल्या भारत दौऱ्यात संघासोबत आणखी काही वेळ घालवण्याची ही एक उत्तम संधी आहे. त्याने एकदिवसीय मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केल्याचे वॉल्टर म्हणाले. (वृत्तसंस्था)

# टी-२० मालिका विश्वचषकाची उत्तम संधी

### लॉकी फर्ग्युसनचे मत

**क्राइस्टचर्च, २० जानेवारी**

आजपासून सुरू होणारी भारताविरुद्धची पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका न्यूझीलंड संघाला पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीसाठी एक उत्तम व्यासपीठ प्रदान करेल, असे मत न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज लॉकी फर्ग्युसनने व्यक्त केले.

भारताविरुद्धच्या अलिकडेच झालेल्या २-१ एकदिवसीय मालिकेतील विजयामुळे उत्साहित झालेला न्यूझीलंड नागपूरमध्ये होणाऱ्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात विश्वचषकाच्या सह-यजमान भारताचा सामना करेल.

भारतात किवी संघात सामील झालेल्या फर्ग्युसनने रवाना होण्यापूर्वी पत्रकारांना सांगितले की, ही खरोखर चांगली तयारी असेल. मला माहीत आहे की ही मैदाने आपण विश्वचषकात ज्या मैदानांवर खेळू तेच मैदाने नसतील, परंतु तेथे खेळण्याचा अनुभव, परिणाम आणि जमिनीच्या परिस्थितीचे मूल्यांकन करणे ही विश्वचषकाची उत्तम तयारी असेल. तो म्हणाला, भारत हा जगातील अव्वल संघांपैकी एक आहे आणि घरच्या परिस्थितीत तो अतुलनीय आहे.

आयपीएल २०२६ साठी पंजाब किंग्ज संघाचा भाग असलेल्या फर्ग्युसनने सांगितले की, या महिन्याच्या सुरुवातीला यूएईमध्ये झालेल्या आयएलटी २० सामन्यादरम्यान झालेल्या पायाच्या दुखापतीतून तो बरा झाला आहे आणि गेल्या आठवड्यापासून तो पूर्ण ताकदीने गोलंदाजी करत आहे. तथापि, पहिल्या सामन्यासाठी न्यूझीलंडच्या संघात फर्ग्युसनचे नाव समाविष्ट नाही.

टी-२० विवचषकादरम्यान तो काही दिवसांसाठी पितृत्व रजा देखील घेऊ शकतो, कारण त्याच्या मुलाचा जन्म फेब्रुवारीत होण्याची अपेक्षा आहे. वेगवान गोलंदाजाने सांगितले की सध्या निवृत्त होण्याचा त्याचा कोणताही हेतू नाही. फर्ग्युसन म्हणाला, मी अजूनही तंदुरुस्त आहे. मला अजूनही वाटते की मी संघासाठी योगदान देऊ शकतो.

२०२३ च्या एकदिवसीय विश्वचषक उपांत्य सामन्यात भारताविरुद्ध शेवटचा एकदिवसीय सामना खेळणारा ३४ वर्षीय खेळाडू म्हणाला की मी अजूनही ५० षटकांचा क्रिकेट खेळण्याची आकांक्षा बाळगतो. मला ५० षटकांचे क्रिकेट आवडते. त्यामुळे मला टी-२० पेक्षा थोडी जास्त ओळख मिळाली आहे. (वृत्तसंस्था)

# बॅडमिंटनपटू सायना नेहवाल निवृत्त

**नवी दिल्ली, २० जानेवारी -**

ऑलिम्पिक पदक विजेती आणि भारतीय बॅडमिंटन खेळाडू सायना नेहवालने स्पर्धात्मक खेळांधून निवृत्ती जाहीर केली आहे.

गुडघ्याच्या गंभीर आणि दीर्घकालीन समस्येुळे ती जवळजवळ दोन वर्षे कोर्टपासून दूर होती. लंडन २०१२ ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती सायना शेवटची २०२३ मध्ये सिंगापूर ओपनमध्ये खेळली होती. तथापि, तिने सोवारी औपचारिकपणे निवृत्तीची घोषणा केली. सायना म्हणाली, मी दोन वर्षांपूर्वी खेळणे थांबवले. मला वाटले की मी स्वतःहून हा खेळ सुरू केला आणि माझ्या स्वतःच्या निर्णयाने तो सोडला, म्हणून वेगळी घोषणा करण्याची गरज नव्हती. सायना नेहवाल मार्चध्ये ३६ वर्षांची होणार आहे. तिने स्पष्ट केले की, माझी गुडघेदुखी वाढली आहे आणि मला संधिवात झाला होता. ज्यामुळे उच्च- तीव्रतेचे प्रशिक्षण सुरू ठेवणे अशक्य झाले होते.

ती म्हणाली, डॉक्टरांनी मला स्पष्टपणे सांगितले होते की कार्टिलेज पूर्णपणे निघून गेला आहे. मी माझ्या पालकांना आणि प्रशिक्षकांना सांगितले होते की मी कदाचित आता हे करू शकणार नाही, ते खूप कठीण झाले आहे. माझे शरीर आता उच्चस्तरीय बॅडमिंटनच्या मागण्या पूर्ण करण्यास सक्षम राहिले नाही. सायना म्हणाली, जगातील सर्वोत्तम होण्यासाठी, तुम्हाला दिवसातून आठ ते नऊ तास सराव करावा लागेल. पण माझा गुडघा फक्त एक-दोन तासांतच दुखतो. मला वाटते आता थांबले पाहिजे.

# सोलापुरच्या मुलांचा उपांत्य फेरीत प्रवेश

### ज्युनियर राज्य अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धा : लातूरचीही उपांत्य फेरीत धडक

**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

३१व्या ज्युनियर राज्य अजिंक्यपद सॉफ्टबॉल स्पर्धेत मुलांच्या गटात यजमान सोलापर मनपासह लातूर जिल्ह्याने उपांत्य फेरीत प्रवेश केला. मुलींच्या गटात जळगाव मनपा, पीसीएमसी, कोल्हापूर व सांगली हे चार संघांनी उपांत्य फेरी गाठली.

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर मनपा जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा येथे सुरू आहे. मुलांच्या गटात सोलापूरने नाशिकचा ५-४ तर लातरने अहिल्यानगरचा ७-२ होम रनने पराभव केला. मुलींच्या गटात जळगावने सांगली मनपाचा ९-० तर दुसऱ्या सामन्यात पिंपरी चिंचवड मनपाने नवी मुंबईचा ८-० असा धुव्वा उडविला.



या स्पर्धेचे आयोजन समितीचे अध्यक्ष नगराध्यक्ष महेशजी इंगळे, सॉफ्टबॉलचे सचिव स्पर्धा सचिव प्रा.संतोष खेंडे, मारुती घोडके खजिनदार गंगाराम घोडके, मारुती घोडके, परमेश्वर व्हसुरे संचालक श्रीधर गायकवाड, रवींद्र चव्हाण, प्रशांत राणे, प्रबुद्ध चिंचोलीकर, संतोष पाटील, प्रशांत कदम, सिताराम भांड सागर जगझाप, महादेव वाघमारे, समर्थ आहेरवाडी अनिकेत कांबळे हे करीत आहेत.



# विद्यापीठ हॉकी व फुटबॉल संघात सोशलचे ९ खेळाडू

### रेहान मुल्ला फुटबॉल संघाचा कर्णधार

**सोलापूर, दि. २१ जानेवारी-**

पारुल विद्यापीठ, बडोदा व एल.एन.सी.टी. विद्यापीठ, भोपाल येथे होणाऱ्या अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल व हॉकी स्पर्धेकरिता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघामध्ये सोलापूर सोशल असोसिएशन्स आटर्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयाच्या ९ खेळाडूंची निवड करण्यात आली.

त्यांना शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. मुश्ताक शेख व तलहा शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्रभारी प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी आदींनी अभिनंदन केले. **निवड झालेले खेळाडू : फुटबॉल :** रेहान मुल्ला (कर्णधार), अल्तमश वळसंकर, अबू-हुरेरा सालार, समीउल्ला आरेवाले, दानियाल दिवान व अयान काखंडीकर. **हॉकी :** शमशोद्दीन पाटील, रहमान बच्चेभाई व इल्हान कुरेशी.



# सुर्यनमस्कार स्पर्धेत शिवाजी प्रशालेच्या १० विद्यार्थ्यांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

येथील छत्रपती शिवाज प्रशालेच्या १० विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय सुर्यनमस्कार स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना प्रशिक्षक सोमनाथ मगर, योगशिक्षक राजेश कोमुलवार, क्रीडा विभाग प्रमुख मारुती घोडके, नितीन गोरे, नेहा स्वामी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापीका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपदराव जगदाळे, पर्यवेक्षक सुरेश जगताप व किरण देशमुख यांनी अभिनंदन केले.

कामगिरी केलेले विद्यार्थी : मुले : गंगाधर यल्लप्पा बसरगी, यश राम चव्हाण, नेहान मोसिण शेख, मनोज आदर्श कवचाळे, ओम बसवेश्वर पाटील.

मुली : मयुरी मिसाळ, श्रेया वाघमारे, योगिता कडचे, श्रेणिका मोरे, शिवगंगा मोगे.

# डी बाटु तंत्रशिक्षण विद्यापीठाचा विभागीय क्रिकेट संघ जाहीर

### ऑर्किड महाविद्यालयात झालेल्या चाचणीतून निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

आर सी पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय शिरपूर धुळे येथे २२ जानेवारी रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी डी बाटु तंत्रशिक्षण विद्यापीठाचा सोलापूर विभागीय क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला आहे.

सोलापूर विभागातील खेळाडूंची निवड चाचणी एन के ऑर्किड महाविद्यालय तळे हिप्परगा सोलापूर येथे घेण्यात आली. या निवड चाचणीचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांच्या प्रमुख पस्थितीत झाले. यावेळी निवड समिती सदस्य सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे कोच निलेश गायकवाड, राहुल म्हेत्रे (बागलकोट), पात्रता समिती सदस्य प्रा अमित वाडवेराव, तेरणाचे प्रा खोचरे, शिवाजी अभियंत्रिकी परभणीचे प्रा वाघमारे हे उपस्थित होते.



**निवड झालेल्या संघातील खेळाडूंची नावे**

पृथ्वीराज चव्हाण, रोहित सोनटक्के (श्री शिवाजी,परभणी), अनिकेत मदुरे, जीशान शेख, प्रतीक दोरगे, यश पवार (एन.के. ऑर्किड, सोलापूर), राम मारेकर, धनराज भडंगे, प्रदीप बनसोडे (तेरणा, धाराशिव), अभय यादव, किरण चव्हाण, किरण चव्हाण (कर्मयोगी, पंढरपूर), यश दिंडोरी, शुभम जाधव, पृथ्वीराज गवळी (ए. जी. पाटील, सोलापूर), रविराज महमाने (फॅबटेक, सांगोला), नितीन मुंडे. मार्गदर्शक- प्रा विश्वजीत खोचरे

या निवडचाचणीसाठी सोलापूर, परभणी, धाराशिव, लातूर या जिल्ह्यातील अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. यातून आंतरविभागीय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड झाली आहे. त्यांचे सोलापूर विभागाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ बी के सोनगे, उपप्राचार्य डॉ विनायक पत्की, प्लेसमेंट सेलचे डॉ आर आर पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. ही निवड चाचणी पार पाडण्यासाठी वामन पवार, अनुप देशपांडे, महेश गोटे, प्रमोद लिगाडे स्पोर्ट्स सेक्रेटरी गुंजाळ, गणेश कचरे यांचे सहकार्य लाभले.



# कोर्ट प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेस सुरुवात

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सोलापूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी व अधिकारी यांच्या सोलापूर डिस्ट्रिक्ट कोर्ट प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेस जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर सुरवात झाली.

याचे उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा याच्या हस्ते व ज्येष्ठ वकील मिलिंदजी थोबडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या प्रसंगी राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष दिगंबर दादा निकम, सौ. शर्मा, सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष रियाज शेख, प्रबंधक हरिदास पोटाबत्ती व मुकुंद ढोबळे, विविध कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शकील शेख, शाम राजेपांढरे, सुकृत कुलकर्णी, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पतसंस्था चेअरमन संजय मॅकलवार, संयोजक ज्ञानेश्वर लिंबोळे, नबीलाल शेख, पवन गायकवाड, इरेश बिराजदार, रफीक पठाण आदी उपस्थित होते. या स्पर्धेचे हे १४ वे वर्ष आहे. यात शहर व सर्व तालुक्यातील १६ पुरुष संघ व ४ महिला संघानी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेचा समारोप २६ जानेवारी रोजी होणार आहे. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सहकार्य लाभत आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : नरसिंग मेंगजी यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना भवन खोडे, भूपाल भूमकर, संजय मेंगजी, नरेश मेंगजे, रोहित मेंगजी.

# पंढरपुरात चंद्रभागा प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर

## उच्च न्यायालयाच्या निर्देशाचे उल्लंघन

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

येथील चंद्रभागा नदीचे पावित्र्य अबाधित रहावे यासाठी चंद्रभागा नदीच्या प्रदूषणा संदर्भात दाखल असलेल्या उच्च न्यायालयातील याचिकांच्या सुनावणीच्या वेळी न्यायलयाकडून शासनाला तसेच प्रशासनाला काही कडक निर्देश देण्यात आलेले आहेत. न्यायालयाकडून देण्यात आलेल्या निर्देशांची शासनस्तरावर किंवा येथील प्रशासनाकडून तंतोतंत अंमलबजावणी होणे अपेक्षीत असताना इथे मात्र प्रशासनाकडून न्यायालयाच्या निर्णयाला अक्षरश: केराची टोपली दाखविली जात आहे. त्यामुळे चंद्रभागेचे प्रदूषण रोखण्याऐवजी वाढत चालल्याचे दिसत आहे.



चंद्रभागा नदीच्या प्रदूषणा संदर्भात उच्च न्यायलयात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने चंद्रभागेचे पावित्र अबाधित रहावे यासाठी प्रशासनाला काही निर्देश दिलेले आहेत. न्यायालयाकडून काही निर्बंध देखील घालण्यात आलेले आहेत. जेणे करुन न्यायालयाच्या निर्देशांची येथील प्रशासनाकडून कडक अंमलबजावणी करुन चंद्रभागेचे पावित्र्य जपणे अपेक्षीत आहे. मात्र इथे प्रशासनाकडून केवळ चंद्रभागेच्या विविध घाटांवर न्यायालयाच्या निर्देशांची केवळ फलकावर माहिती छापण्या पलिकडे प्रत्यक्ष निर्देशाच्या अंमलबजावणीच्या नावाने चांगभले दिसून येते आहे.

कारण इथे पाहिले तर चंद्रभागा नदी मध्ये दररोज जनावरे तसेच वाहने धुतली जातात. सर्रास वाळू उपसा सुरु असल्याचे दिसून येते. पात्रात अनेक अतिक्रमणे दिसून येतात. चंद्रभागा नदीत निर्माल्य तसेच इतर साहित्य फेकलेले दिसून येते. वाळवंटात अनेक घाटांवर झोपड्या तसेच काही ठिकाणी अतिक्रमण करुन पक्की बांधकामे देखील केल्याचे आढळून येते. मात्र इथले प्रशासन धिम्म आहे. न्यायालयाच्या निर्देशांची कुठेही काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात नसल्याचे पहावयास मिळत आहे. त्यामुळे न्यायलयाने दिलेल्या निर्देशाचे पालन प्रशासनाकडून होणार नसेल तर माते समान मानल्या जाणाऱ्या पवित्र चंद्रभागेचे प्रदूषण कोण रोखणार ? असा गंभीर सवाल नागरिकांकडूनच उपस्थित केला जात आहे.

### एकमेकांवर टोलवा-टोलवी पलीकडे काही नाही

येथील चंद्रभागा नदी तसेच वाळवंट वेगवेगळ्या सरकारी विभागांच्या अखत्यारित आडकलेली आहे. कारण चंद्रभागा नदीच्या स्वच्छतेची जबाबदारी येथील नगरपालिकेवर (सध्या काही प्रमाणात मंदिर समितीने घेतलेली) आहे. चंद्रभागेच्या पात्रातील तसेच वाळवंटातील वाळू संदर्भातील निर्णय हे महसुल प्रशासनाकडून घेतले जातात. या बरोबरच चंद्रभागेच्या पाण्या संदर्भात पाटबंधारे विभागाकडून कार्यवाही केली जाते. त्यामुळे प्रदूषण रोखण्याच्या वेळी प्रत्येक शासकीय विभाग आपआपल्या सोयीनुसार नियम दाखवित बोटचेपे धोरण स्विकारताना दिसुन येते. यासाठी चंद्रभागा नदी संदर्भात एक स्वतंत्र शासकीय मंडळ किंवा विभाग सुरु करुन त्यांनाच सर्व अधिकार देण्यात यावेत असा मतप्रवाह देखील काही सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केला जातो.

### नमामी चंद्रभागेचा पत्ताच नाही

केंद्राच्या नमामी गंगेच्या धर्तीवर राज्य शासनाकडून मध्यंतरी नमामी चंद्रभागा अभियानाची घोषणा करण्यात आलेली होती. त्यासाठी चंद्रभागेच्या उगमा पासून ते राज्यातील शेवटच्या टोका पर्यंत चंद्रभागा निर्मळ, अविरत वाहणारी राहिल यासाठी पाऊले उचलण्यात आलेली होती. त्यासाठी शासनाकडून काही प्रमाणात निधीची देखील घोषणा करुन अनेक ठिकाणी सांडपाणी प्रकल्प देखील राबविले जात असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे जी कामे या प्रकल्पा अंतर्गत सुरु आहेत त्याचा वेग देखील मुंगीच्या गतीने आहे. सांडपाणी प्रकल्पा व्यतरिक्त या अभियनाच्या अन्य काही संकल्पना नुसत्या कागदावरच दिसून येत आहेत.

## महत्वाचे...



### समरसता साहित्य परिषद समाजजागृतीचे प्रभावी माध्यम : दिनेश मडके

**जेऊर, दि. २० जानेवारी-**

समरसता साहित्य परिषदेच्या माध्यमातून समाजजागृतीचे कार्य प्रभावीपणे सुरू असून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम परिषद सातत्याने करीत आहे, असे प्रतिपादन समरसता साहित्य परिषदेचे सोलापूर जिल्हा सहकार्यवाह तसेच करमाळा तालुका डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश मडके यांनी केले. ते वडशिवणे (ता. करमाळा) येथे समरसता साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. गणेश पवार हे होते. यावेळी व्यासपीठावर मकाई सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक गोरख आप्पा जगदाळे, समरसता साहित्य परिषदेचे करमाळा तालुका प्रतिनिधी, कवी व लेखक सोमनाथ टकले उपस्थित होते. या कार्यक्रमात डॉ. भगवंत पवार यांनी यूपीएससी परीक्षेत संपूर्ण भारतातून २३ वा क्रमांक मिळवून वैद्यकीय क्लास वन अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. समरसता साहित्य परिषदेच्या वतीने त्यांना गौरविण्यात आले. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरातील तरुणांना नक्कीच प्रेरणा मिळेल, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेमध्ये करमाळा तालुक्यात प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी पराडे व द्वितीय क्रमांक हर्षाली व्हरे यांनी मिळविला. यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषण हभप गणेश पवार यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन समरसता साहित्य परिषदेचे प्रतिनिधी सोमनाथ टकले यांनी केले. या कार्यक्रमास शिवाजी पराडे, जनार्दन राऊत उपस्थित होते.



### कर्णबधिर विद्यार्थिनीला वाढदिवसानिमित्त अनोखी भेट

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयात सर्व शिक्षा अभियानांतर्गत सर्व समावेशित शिक्षण या उपक्रमांतर्गत कर्णबधिर विद्यार्थिनी भक्ती सगरे हिला तिच्या वाढदिवसा दिवशी एक अनोखी भेट मिळाली. विशेष गरजा परिपूर्तीसाठी विशेषतज्ञ शिक्षक मनोज जगदाळे व केंद्रप्रमुख सोनवणे यांच्याकडून विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, वर्गशिक्षक रेवणसिद्ध दुलंगे यांच्या उपस्थितीत श्रळाले या कंपनीचे हेरिंग एड किट वाढदिवसानिमित्त प्रदान करण्यात आले. त्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रियेला निश्चितच गती मिळाली आहे. उपक्रमाचे पालक व विद्यालयाकडून सर्व शिक्षा अभियानाचे आभार मानले.

## निधन वृत्त...

### काशीबाई बिराजदार



**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथील काशीबाई शांतप्पा बिराजदार (वय ८१) वर्षे यांचा वृद्धापकाळाने निधन झाला असून त्यांच्या पश्चात दोन मुली, तीन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार असून त्यांच्यावर काल मंगळवार दिनांक २० जानेवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आला. एसटी महामंडळ सेवा निवृत बसचालक शांतप्पा बिराजदार यांच्या त्या पत्नी होत.

### युगल किशोर



**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय कोषाध्यक्ष युगल किशोर यांचे लखनऊ येथे दि. १४ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भागलपूर येथील देवरियास्थित शरयू घाटावर अंतिमसंस्कार करण्यात आले.

### सुदर्शन हंबीरे



**अकलूज, दि. २० जानेवारी-**

विठ्ठलवाडी (ता. माळशिरस) येथील सुदर्शन दादासाहेब हंबीरे (वय ४९) यांचे हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी सून, जावई असा परिवार आहे. सध्या ते सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वेळापूर शाखेत बँक इन्स्पेक्टर पदावर कार्यरत होते. त्यांनी विठ्ठलवाडी येथे विजय प्रताप युवा मंचाच्या माध्यमातून समाजसेवेला सुरवात केली होती. ते मराठा सेवा संघाचे तालुका उपाध्यक्ष होते.

# माढा तालुक्यातील जि.प., पंचायत समिती निवडणुकीसाठी ७०५ अर्जांची विक्री

## ३५ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२० जानेवारी-**

माढा तालुक्यातील ७ जिल्हा परिषद - व १४ पंचायत समिती गणासाठी १६ जानेवारी पासून अर्ज विक्री सुरू झाली असून २० जानेवारी पर्यंत ७०५ अर्ज विक्री झाले असून त्यातील ३५ मंगळवारी दाखल झाले आहेत. बड्या नेत्यांनी स्वतः किंवा आपल्या हस्तकांच्या वतीने अर्ज घेतले आहे.

**उमेदवारी अर्ज दाखल केलेले उमेदवाराचे नाव गट व गण - ✻ भोसरे गट -** मिनाक्षी महेश पाटणे, सुनिल बापूराव रावडे, संदीप राजाराम भोसले (सर्व अपक्ष) **✻ मानेगाव गट -** पंडित शंकर साळुंके ( प्रहार जनशक्ती पक्ष). **✻ कुर्डू गट -** विजयसिंह शिरीषकुमार पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व अपक्ष) **✻ उपळाई बुद्रुक गट -** माधुरी तानाजी मोरे ( भारतीय जनता पक्ष) **✻ बेंबळे गट -** वंदना विष्णू हुंबे ( भाजप), सुप्रिया नितीन भोगे ✻ (अपक्ष व भाजप), सुनिता बिभिषण डांगे(अपक्ष व भाजप) **✻ टेंभूर्णी गट -** सुनिता संजय पाटील ( भाजप) **✻ अकोले खुर्द गण -** संभाजी बबनराव पाटील ( नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व अपक्ष), आकाश बबनराव पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरद पवार) रोपळे (क) गण - सोनाली भालचंद्र पाटील (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी व भारतीय जनता पार्टी. मानेगाव गण - भारत शंकर गायकवाड, अमोल काशिनाथ लटके (अपक्ष) दारफळ गण - सोनाली मनोज साठे (अपक्ष), **✻ उपळाई बुद्रुक गण -** नितीन मदन झाडबुके (अपक्ष) **✻ भुताष्टे गण -** संतोष दत्तु दळवी (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी -शरदचंद्र पवार ), स्वाती हनुमंत गिड्डे(अपक्ष व भारतीय जनता पक्ष), रेश्मा बालाजी गिड्डे (अपक्ष) **✻ रांझणी गण -** सुनिता संजय पाटील, सोनाली आण्णासाहेब पाटील ( दोन्ही भाजप) ✻ बेंबळे गण - विष्णू महादेव हुंबे ( भारतीय जनता पक्ष) **✻ पिंपळनेर गण -** दीपक पांडुरंग लोंढे (अपक्ष) , नितीन विठ्ठल भोगे (अपक्ष व भाजप) , बिभिषण भागवत डांगे (अपक्ष व भाजप),

# अल्पवयीन निर्भयावर बलात्कार प्रकरण; आरोपीस १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**



आरोपी शिवम भारत मगर वय २७ वर्षे याने दि. २८ एप्रिल २०२४ रोजी निर्भया मुलगी राहत असलेल्या घरी अल्पवयीन निर्भया ही एकटी असताना घरात येवून तिचे हाताला धरुन तिला दिवाणावर पाडून मिठीत घेवून चुंबन घेवू लागला. त्यावेळी पिडीता नकार देत असताना आरोपीने जबरदस्तीने पिडीतेवर शारीरीक अत्याचार केला, त्यानंतर दि २९ एप्रिल २०२४ रोजी तिला लग्नाचे अमिष दाखवून फिरायला म्हणून उरळी कांचन पुणे येथे आरोपीचे बहिणीचे घरी नेले. तिथे बहिणीने निर्भया हिस तु आमच्या बाजूने जबाब नाही दिला तर तुला जिवे मारीन अशी धमकी दिली. याप्रकरणी आरोपीविरुध्द करमाळा पोलीस ठाणेस गु.र.नं २८२/२०२४ भा.दं.वि. कलम ३६३,३७६(१),५०६ व बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ४,१७ अन्वये दि. ३० एप्रिल २०२४ रोजी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आरोपीस अटक करुन सबळ पुरावा गोळा करुन आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.



सरकार पक्षाच्यावतीने सदर गुन्हा शाबितीसाठी महत्वाचे ८ साक्षीदार तपासण्यात आले. यातील निर्भया हिने आरोपीविरुध्द दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण ठरली आहे. निर्भया हिचे साक्षीस अनुसरुन वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता बंडगर यांनी निर्भया हिची वैदयकीय तपासणी केली. सदर वैदयकीय अधिकारी यांनी दिलेली साक्ष महत्त्वपूर्ण होती. सदर प्रकरणात तपासिक अंमलदार सहायक पोलीस निरीक्षक रोहित शिंदे यांनी सदर गुन्हाचा तपास करताना अतिशय महत्त्वपूर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा केला होता.

निर्भया हिचे बरोबर झालेल्या अत्याचाराच्या अनुषंगाने कोर्टासमोर आलेला पुरावा या सर्व बाबी कोर्टासमोर सहा. सरकारी वकील दिनेश देशमुख यांनी सर्वोच न्यायालयाचे न्यायनिर्णय मे. कोर्टासमोर मांडल्या व संपूर्णबाब रेकॉर्डवर आणली. तसेच कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार नितीन ताकभाते यांनी साक्षीदारांना योग्य मार्गदर्शन करून वेळोवेळी कोर्टात हजर ठेवले. सरकार पक्षाचे वतीने करण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरुन, आरोपीने अल्पवयीन निर्भया हिचेवर बलात्कार केला आहे. ही बाब निदर्शनास आणून देण्यात आली. सरकारी पक्षाचा युक्तीवाद व आरोपीविरुध्द आलेला पुरावा याचा विचार करता मा. विशेष जिल्हा न्यायाधीश श्री. विक्रमादित्य मांडे यांनी आरोपी शिवम भारत मगर वय २७ वर्षे, रा. नेर्ले. ता करमाळा, जि. सोलापूर यास भादंविक ३७६ (ए) अन्वये दोषी धरुन १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने कारावास, भादविक ३६३ अन्वये दोषी धरुन ७ वर्षे सश्रम कारावास व २०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास २ महिने कारावास, बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ कलम ४ अन्वये १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने कारावास ठोठावण्यात आला. सरकार पक्षातर्फे ॲड. दिनेश देशमुख यांनी काम पाहिले. सदर गुन्हयाचा तपास सपोनि श्री. रोहित शिंदे यांनी काम केलेला होता. तसेच कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोहेकॉ/१२९० नितीन ताकभाते यांनी काम पाहिले.

# आ. अभिजीत पाटील यांचे सीना-माढा योजनेतून पाणी सोडण्याच्या सूचना

**टेंभुर्णी, दि. २० जानेवारी-**

उजनी जलाशयातून सीना-माढा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्याचे आदेश आमदार अभिजीत पाटील यांनी कार्यकारी अभियंता सुचित्रा डुंबरे यांना दिले आहेत. या योजनेतून पाणी सोडण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

पावसाळा संपून तीन महिने उलटून गेल्याने सीना-माढा सिंचन योजनेच्या ४० हजार एकर लाभ क्षेत्रातील तलाव, विहिरी व बोरवेल्समधील पाणी मोठ्या प्रमाणात आटले आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील ज्वारी, गहू, हरभरा, मका, बाजरी, कडधान्ये, भुईमूग, चारा, वैरण, ऊस तसेच फळबागांना पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. याशिवाय या परिसरातील नागरिक व पशुधनासाठीही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे सीना-माढा सिंचन योजना तातडीने सुरू करून ४० हजार एकर क्षेत्रातील कोट्यवधी रुपयांच्या उभ्या पिकांचे नुकसान टाळणे आवश्यक आहे, असे आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी सांगितले.

# इंग्रजी ही देश-विदेशातील माणसे जोडणारी भाषा : डॉ. ननवरे



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

आधुनिक जगात प्रभावी आणि व्यापक संवादाची भाषा म्हणून इंग्रजी भाषा ओळखली जाते विविध देशांतील लोकांना एकमेकांशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्रजी भाषेने केले आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा ही जागतिक एकात्मतेचे प्रतीक बनली आहे. असे प्रतिपादन दयानंद महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ दीपक ननवरे यांनी केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या इंग्रजी भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रा डॉ. अनिलकुमार वावरे, संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे, प्रा. डॉ. विरभद्र दंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख प्रा राजशेखर पवार यांनी केले, आभार समर्थ पवार यांनी मानले. भित्तिपत्रकामध्ये संदर्भ ग्रंथांचा आधार घेऊन जगप्रसिद्ध इंग्रजी लेखकांचे कार्य संकेत पुजारी, रविराज कुलकर्णी, समर्थ पवार, पंचप्पा जाधव, पवन अंबुरे, आकाश कोकरे, शकुंतला कोरे, पायल कांबळे यांनी अधोरेखित केले.

# निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शीतील छात्राध्यापकांचे शिक्षक पात्रता परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथील छात्राध्यापकांनी, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी शिक्षक पात्रता परीक्षा दि. २३ नोव्हेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल दि. १७ जानेवारी रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये अध्यापक विद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केलेले आहे

सर्वश्री. भापकर रवींद्र शहाजी (पेपर क्रमांक - १), पवार नितीन बजरंग (पेपर क्र.१ व २), घिगे विठ्ठल रवींद्र (पेपर क्र. -१), गव्हाणे दत्तात्रेय जालिंदर (पेपर क्र. १), गोसावी संभाजी उत्तरेश्वर (पेपर क्र. -१), देवकर गणेश जगन्नाथ (पेपर क्र. १), मांजरे जयराम शंकर (पेपर क्र. १), शिंदे प्रविण भिमराव ( पेपर क्र. १), माने गणेश अरुण (पेपर क्र. १), मोकाशी अजय अज्ञान (पेपर क्र. १), कु.चौधरी ऐश्वर्या रवींद्र (पेपर क्र. १ व क्र. २), कु. मोमीन अफरोज आयुब (पेपर क्र. १), इंगोले श्वेता दत्तात्रेय (पेपर क्र. १)

वरील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय.यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जे.सी.शितोळे व संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य व शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी. एम. पाटील, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य.डी.पी गुंड यांनी अभिनंदन केले.

# ग्रामविकास अधिकारी, अंगणवाडी सेविकेच्या प्रसंगावधानमुळे विद्यार्थिनीचे वाचले प्राण



## गोरमाळे येथील कौतुकास्पद घटना

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २० जानेवारी-**

कर्तव्याच्या पलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जपल्यास एखाद्याचे प्राण कसे वाचवता येतात, याचा प्रत्यय सोलापूर जिल्ह्यातील गोरमाळे येथे आला आहे. शाळेतून घरी जात असताना अचानक चक्कर येऊन पडलेल्या पाचवीतील विद्यार्थिनीला वेळेवर मदत मिळवून दिल्याने तिचे प्राण वाचले आहेत. या कामगिरीबद्दल ग्रामविकास अधिकारी विजयलक्ष्मी पवार आणि अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे गोरमाळे येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता ५ वी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी अदिती गोपीनाथ भुसारे ही दुपारी सुट्टीच्या वेळी घरी जात होती. 'पोस्ट चौकात' पोहचली असता, तिचा रक्तदाब (BP) अचानक कमी झाल्याने तिला अंधारी आली आणि ती जागीच बेशुद्ध पडली. त्याचवेळी तेथून जात असलेल्या गोरमाळे ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास अधिकारी पवार यांनी प्रसंगावधान राखले. मुलगी बेशुद्ध असल्याचे लक्षात येताच ग्रामसेविका विजयालक्ष्मी पवार आणि उपस्थित अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांनी धाव घेतली. त्यांनी वेळ न घालवता तात्काळ १०८ रुग्णवाहिकेला फोन करून पाचारण केले. रुग्णवाहिका येईपर्यंत त्यांनी मुलीला धीर दिला आणि प्रथमोपचार मिळवून दिले. रुग्णवाहिका आल्यानंतर मुलीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलीचा रक्तदाब खूपच कमी झाला होता. जर तिला वेळेवर रुग्णालयात पोहोचवले नसते, तर तिच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. ग्रामविकास अधिकारी पवार आणि अंगणवाडी सेविका सुशीला सोनवणे यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अदितीचे प्राण वाचले आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# पालकमंत्री गोरे, खा.शिंदे यांच्यात रंगले वाकयुध्द



**पालकमंत्री जयाभाऊंची खोचक टीका**

**प्रणितीताई म्हणाल्या, मी लक्ष देत नाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्यात महापालिका निवडणुकीच्या पराभवानंतर वाक्युध्द सुरू झालेले दिसत आहे. पालकमंत्र्यांच्या खोचक टीकेला खासदार प्रणिती शिंदे यांनी देखील जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीत विरोधकांचा धुवा उडवत भाजपने सोलापूर महापालिकेत ७५ पार करत ८७ जागा मिळवत घवघवीत यश प्राप्त केले.

काँग्रेसचा दारुण पराभव झाला. काँग्रेसच्या वाट्याला केवळ दोन जागा आल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांना उभारी देण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी पत्र लिहिले. हे पत्र सोशल मीडियावर व्हायरस झाल्यानंतर पालकमंत्र्यांनी त्याचा खरपूस समाचार घेताना, पन्नास फूट खाली पडले तरी पाय वरतीच आहेत, असे खोचक टीका पालकमंत्री गोरे यांनी केली. यावर खासदार प्रणिती शिंदे यांनी उत्तर देताना म्हणाल्या, पालकमंत्री हे पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे होते. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मी पत्र लिहिले होते. त्यामुळे त्यांनी ते वाचले असावे. परंतु त्यातून पालकमंत्र्यांनी वेगळा अर्थ काढला असावा. म्हणून त्यांच्या बोलण्याकडे मी फारसे लक्ष देत नाही. सत्ता पहिल्यांदाच पाहत असल्यामुळे त्यांच्या तोंडून असे वाक्य निघत आहेत.

## माळशिरस
### ७ गटातून ११ अर्ज

**माळशिरस :** जिल्हा परिषदसाठी ७ गटामधून ११ तर पंचायत समितीसाठी सात गणामधून १० असे २१ अर्ज दाखल झाले आहेत. एकूण ४५२ अर्जांची विक्री झाली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली. मांडवे गटातून १, संग्राम नगर १, माळीनगर २, बोरगाव १,वेळापूर १, निमगाव २, पिलीव ३ असे ११ अर्ज दाखल झाले. पंचायत समितीसाठी गुरसाळे गणातून काल १ व आज २ असे तीन, कान्हेर २, फोंडशिरस १, मेडद १, यशवंतनगर १, गोरडवाडी १, पिलीव १ सात गणातून १० असे आज अखेर २१ अर्ज दाखल झाले. अर्ज दाखल करण्याचा उद्या अंतिम दिवस आहे.

# श्री मश्रुम गणपती मंदिरात बुधवारी रात्री अभिषेक

**कसबा गणपतीकडून मूर्तीची पालखीतून मिरवणूक**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पांची जयंती गुरुवारी सर्वत्र साजरी करण्यात येणार आहे. शहरातील विविध गणेश मंदिरात श्रीगणेश जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम आणि विधींचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजापूर रोडवरील नवसाला पावणारा मश्रुम गणपती मंदिरात पहाटे अडीचपासून अभिषेक सोहळा सुरू होणार आहे. पहाटे साडेपाचला आरती दुपारी बारा वाजून पाच मिनिटांनी गुलाल आरती संपन्न केली जाणार आहे.



१५ ते १८ हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केल्याची माहिती, मंदिर प्रमुख संजय पतंगे यांनी दिली. पहाटे साडेपाचला आरती होईल. तुळजापूर व सोलापूर परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. गणेश जयंती निमित्त शहरातील अनेक मंदिरांत धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. कसबा गणपतीकडून मूर्तीची पालखीतून मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्री गणेशांच्या चांदीच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. दीड ते दोन हजार भाविकांना पुरीभाजी, शिरा, मसाला भात असा महाप्रसाद आहे. ता. २२ रोजी सकाळी साडेसातला मल्लिकार्जुन मंदिराजवळून मिरवणूक निघणार आहे. सकाळी सहापासून अभिषेक, सात ते अकरा गणेश याग, दुपारी पाळणा, गुलाल. दुपारी एकनंतर महाप्रसाद. पौरोहित्य गिरी स्वामी, सिध्दू स्वामी करणार आहेत. भाविकांनी या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष सोमानाथ भोगडे, उत्सव अध्यक्ष बाळासाहेब मुस्तारे यांनी केले आहे.

## महत्वाचे...

### स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने सोलापुरात आज पहिले संगीतमय स्नेहमिलन

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

मुंबई येथील स्वर अलंकार म्युझिक अकॅडमीच्या वतीने सोलापुरात बुधवार, २१ जानेवारी रोजी डफरीन चौक येथील आयएमए हॉल येथे पहिले संगीतमय स्नेहमिलन आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती श्रीकांत कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. स्वरा अलंकार अकॅडमीच्या वतीने सोलापुरातील हौशी गायकांना गायनाचे प्रशिक्षण आणि संधी देण्यात येत आहे. हा कार्यक्रम केवळ आमंत्रितांसाठीच आहे. यावेळी सुनील मदान, श्रीकांत कुलकर्णी, अरविंद देशमुख, डॉ.पाटणकर, डॉ.श्रध्दा रोडगे हे विविध गीते सादर करणार आहेत. श्रीकांत कुलकर्णी हे गायक मुकेश यांची गाणी सादर करणार आहेत. इच्छुक गायकांनी या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी सुनील मदान (कुकरेजा स्पोर्टस) येथे संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस सुनील मदान, अरविंद देशमुख उपस्थित होते.



### शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत मेहता शाळेचे यश

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ मध्ये कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेतर्फे एकूण ९८ विदयार्थी प्रविष्ट झाले होते. एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट दोनही परीक्षांचा निकाल १०० टक्के लागला. श्रेणीत ५३ विद्यार्थी, इ श्रेणीत ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी, परीक्षा नियंत्रक नागेश वाघमोडे, पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर यांनी अभिनंदन केले.



### भावी पदाधिकाऱ्यांच्या दालनाची सीईओ जंगम यांच्याकडून पाहणी

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

तब्बल नऊ वर्षानंतर सोलापूर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्यासह विषय समितीचे सदस्य निवडले जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि.२० जानेवारी रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आगामी जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांच्या दालनाची पाहणी केली. याप्रसंगी कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समितीच्या सभापतींची दालने अद्ययावत करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाला दिल्या.



### तडीपार आरोपीकडून १४ लाखांचे १११ मोबाईल जप्त

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

तडीपार आरोपीनी चोरी केलेले एकुण १३ लाख ९२ हजार ९९८ रुपये किंमतीचे १११ मोबाईल जेलरोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास जप्त करण्यात यश आले. जेलरोड पोलीस ठाणेकडील पोकॉ संतोष वायदंडे, कल्लप्पा देकाणे यांना गुप्त बातमीदारमार्फत १७ जानेवारी २०२६ रोजी एक इसम चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी इक्बाल मैदान येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्यावरुन जेलरोड पोलीस ठाणेकडील गुन्हे प्रकटीकरण पथक प्रमुख सपोनि संदीप पाटील व पथकातील अंमलदार हे त्याठिकाणी जावुन सापळा लावला असता त्याठिकाणी एक इसम मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव फारुक महमद हनिफ पठाण असे सांगितले. या इसमास अधिक विश्वासात घेवुन चौकशी केली असता शहरातुन तडीपार आरोपी गणेश उर्फ आप्पा तुकाराम बैरुणगी, लखन तुकाराम वैरुणगी (रा. दोघे राहुल गांधी नगर झोपडपटटी सोलापुर) यांनी शहरातुन विविध ठिकाणाहुन चोरी करुन विक्री करिता आणुन दिले असल्याची कबुली दिली.



# कलेतून भारतीय संस्कृती जोपासा : प्रशांत देशपांडे

**'युवा स्पंदन' सांस्कृतिक महोत्सवाचा प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

ओवी, अभंग, अंगाई गीत, लोकनृत्य आणि लोककलेच्या माध्यमातूनच भारतीय संस्कृती शतकानुशतके जिवंत राहिली आहे. या कलांमुळेच आपली सांस्कृतिक ओळख टिकून आहे. आजच्या नव्या पिढीने या लोककलांची उपासना करून भारतीय संस्कृती जपावी, असे आवाहन ज्येष्ठ गायक व संगीतकार प्रशांत देशपांडे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित 'युवा स्पंदन सांस्कृतिक महोत्सव २०२५२६' या दोन दिवसीय महोत्सवाचा शुभारंभ विद्यापीठ परिसरात देशपांडे यांच्या हस्ते झाला. उद्घाटनप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते.

यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.

उद्घाटन समारंभा नंतर संकल्पना नृत्य, हिंदी व मराठी वक्तृत्व स्पर्धा, सुगमगायन, मेहंदी, समूहनृत्य, फोटोग्राफीच्या स्पर्धा झाल्या सूत्रसंचालन डॉ. ममता बोल्ली व प्रा.श्रुती देवळे यांनी केले, तर आभार डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.

# महानगरपालिकेचे महापौर पद धनगर समाजाला मिळावे

**सोलापूर, दि.२१ जानेवारी-**

महानगरपालिकेचे गेल्या वीस वर्षाच्या कालावधीत एकदाही धनगर समाजाचा महापौर झाला नसल्याची खंत धनगर समाजात असून यावेळी सोलापूर महानगर पालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाच्या नऊ उमेदवारांना उमेदवारी देऊन निवडून आणले आहेत. भारतीय जनता पक्षाने धनगर समाजाला न्याय दिल्याची भावना धनगर समाजाची झाली. महापौर पद धनगर समाजाला मिळावे, अशी मागणी करण्यात आली.




सोलापूर शहरातील धनगर समाजातील ज्येष्ठ नेते मंडळी आणि कार्यकर्ते यांची महत्त्वाची बैठक झाली. तीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, शहरध्यक्षा रोहिणी तडवळकर, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. विजयकुमार देशमुख,आ. सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे यांचे आभार व्यक्त करताना धनगर समाजाला महापौर पद देण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी शिवलाल काळे, प्रशांत फत्तेपूरकर, प्रा.देवेंद्र मदने, अमोल कारंडे, समीर सलगर, श्रीमंत हाके, प्रभाकर पडवळकर, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेंडगे, सदाशिव होनमाने, प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य सिध्दारुढ बेडगनूर, श्रीराम पाटील, विलास पाटील, प्रा.दत्त डांगे, प्रा.धनाजी भानवसे, प्रा.शंभूदेव गावडे, शहाजी ठोंबरे, अविनाश आलदर, रामभाऊ वाकसे, मुख्याध्यापक अण्णाप्पा सत्तूबर, संतोष पैकेकरी, डॉ. तानाजी कोळेकर, सूर्यकांत होनमाने, राजकुमार देवकते, उज्वलकुमार माने, बिसलसिध्द काळे उपस्थित होते.

# फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

गुप्तधन काढून देतो म्हणून फसवणूक केलेल्या गुन्ह्यातील आरोपीचा जामीन मंजूर करण्यात आला. राजू विनायक आडम यांनी दि. ५/१०/२०२५ रोजी एमआयडीसी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ८३७/२०२५ प्रमाणे दिलेल्या फिर्यादीवरून दि.०५/०९/२०२३ ते मार्च-२०२४ मोहम्मद कादर शेख व त्याचे साथीदार इम्रान, तमीम कुरेशी, आयुब रचभरे, सचिन गायकवाड, दाउद प्रठाण, वाघमारे यांनी फिर्यादीची फसवणुक केली.



गुप्त धनाचा हंडा काढून देण्याचे अमिष दाखवून, काहीतरी द्रव्य पिण्यास देवून जादुटोणा केला व त्याकरीता त्यांच्याकडून वेळोवेळी रक्कम रुपये १,२६,३४,६००/-रू घेतले. काहीएक चिजवस्तू न देता फसवणूक केलेली आहे. वगैरे मजकुराच्या फिर्यादवरुन भारतीय दंड संहिताचे कलम ४२०, ४१७, ४०६ व महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ (२) प्रमाणे दाखल केला होता. सर्व आरोपीं विरुद्ध जेल रोड पोलीस ठाणे येथे सुद्धा गु.र.नं.५१५/२०२५ अन्वये वरील कलमाप्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यानंतर आरोपींना तारीख १७/१०/२०२५ रोजी अटक करण्यात आली व कोर्टासमोर हजर करण्यात आले होते तेंव्हापासून सदरचे आरोपी हे न्यायालयीन कोठडीत होते. त्यानंतर आरोपी सचिन गायकवाड यांच्या वतीने ॲड.डी.एन. भडंगे व ॲड. एन.एन. भडंगे यांच्यामार्फत जामीन अर्ज ठेवण्यात आला होता. जामीन हा नियम आहे. तुरुंग हा अपवाद आहे व केवळ आरोप गंभीर आहेत म्हणून जामीन नाकारणे योग्य नाही. आरोपी दोषी ठरेपर्यंत तो निर्दोष मानला जातो. तपास पूर्ण झाल्यानंतर कोठडी आवश्यक राहत नाही अशा प्रकारचे सुप्रीम कोर्ट दिल्ली यांचे निवाडे आरोपींना जामीन मिळावा, असा युक्तिवाद करण्यात आला.

# मार्कंडेय जन्मोत्सव; आज पालखी प्रदक्षिणा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी**

पद्मशाली समाज कुलदैवत श्री मार्कंडेय जन्मोत्सवानिमित्त आज पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या वतीने मंदिरात पाळणा आणि पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या समाजातील १७ नगरसेवकांचा सन्मानही होईल, अशी माहिती ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांनी दिली.

१४ जानेवारीपासून श्री मार्कंडेयरचित दुर्गासप्तशती ग्रंथाच्या सामूहिक पारायणाला सुरुवात झाली. तसेच समाजातील काही युवकांनी ११ जानेवारीपासून मार्कंडेय दीक्षा घेतली. त्यांचे व्रतही सुरू झाले. या दोन्ही उपक्रमांची सांगता बुधवारी होईल. सकाळी साडेसातला अध्यक्ष फलमारी यांच्या हस्ते मंदिरावर पद्मपताका चढवण्यात येणार आहे. त्यानंतर मूळमूर्तीला उद्योजक सिद्धेश्वर गड्डम यांच्या हस्ते महारूद्राभिषेक होईल. प्रभाकर बुरा आणि जयश्री बुरा यांच्या हस्ते होमहवन होणार आहे. मंदिर प्रदक्षिणा घातल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम आहे. पद्मशाली समाज बंधू, भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे उपाध्यक्ष महांकाळी येलदी, सरचिटणीस संतोष सोमा यांनी केले आहे.

**पद्मशाली समाजातील नगरसेवकांचा सन्मान**

महापालिका निवडणुकीत सर्वाधिक पद्मशाली समाजातील नगरसेवक निवडून आले. हातून शहराचा विकास व्हावा, वस्त्रोद्योगाची भरभराट होण्यास मदत व्हावी, या अपेक्षेने गौरव करण्याचे ठरले आहे.

**- सुरेश फलमारी, अध्यक्ष, पद्मशाली ज्ञाती संस्था**

**पद्मशाली शिक्षण संस्थेतर्फे रक्तदान शिबिर**

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने रक्तदान शिबिरायोजन आहे. कुचन प्रशालेच्या प्रांगणात सकाळी नऊला त्यास प्रारंभ होईल. यंदा एक हजार दाते रक्तदान करतील, असे नियोजन केले आहे.

**- दशरथ गोप, सचिव, पद्मशाली शिक्षण संस्था**

# सुरेल संगीत संध्यातून कै.सिद्धा पाटील यांना कृतज्ञतेचे भावपूर्ण अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० जानेवारी-**

पित्याच्या स्मृती जतन करणे हे केवळ कौटुंबिक कर्तव्य नसून, तो एक सांस्कृतिक वारसा जिवंत ठेवण्याचा उदात्त प्रयत्न आहे. कै. सिद्धा पाटील स्मृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेली संगीत संध्या ही केवळ एक मैफल न राहता, ती कृतज्ञता आणि स्मरणाचा एक अनोखा सोहळा ठरली. या स्वरमयी अभिवादनातून सोलापूरच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर पडली आहे.

कै. सिद्धा पाटील स्मृती समिती आणि नाट्य आराधना, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कै. सिद्धा पाटील यांच्या २८ व्या स्मृतिदिनानिमित्त लोकमान्य टिळक सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला ज्येष्ठ रंगकर्मी प्रफुल्लचंद्र आहेरकर यांचे प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नाट्यकलाकार विजय साळुंखे व ज्येष्ठ प्रकाश योजनाकार शशिकांत बटणे यांना स्मृतीगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ इरेश स्वामी म्हणाले की, ''एखाद्या व्यक्तीच्या पश्चात त्यांच्या स्मृती संगीताच्या माध्यमातून जागवणे, ही त्यांना वाहिलेली सर्वात मोठी श्रद्धांजली आहे. सिद्धा पाटील यांचे कलाप्रेम त्यांच्या वारसांनी अशा पद्धतीने जिवंत ठेवले आहे, हे कौतुकास्पद आहे. आजच्या धावपळीच्या युगात अशा शास्त्रीय आणि निखळ सांगीतिक कार्यक्रमांची समाजाला मोठी गरज आहे. कलाकारांचा सन्मान करणे म्हणजे संस्कृतीचे संवर्धन करणे होय.''



कार्यक्रमाची सुरुवात राग मारुबिहागने झाली. छोटा ख्याल, तीनताल आणि तराना सादर करत कलाकारांनी शास्त्रीय संगीताचा कस दाखवला. त्यानंतर नाट्यसंगीताने रसिकांना मंत्रमुग्ध केले. सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा या कानडी भजनाने आणि पावलो पंढरी वैकुंठ भुवन या राग तिलंगमधील रचनेने आध्यात्मिक वातावरण निर्मिती केली. कार्यक्रमाचा कळस विठ्ठल विठ्ठल गजरीने झाला, ज्याने संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले.

तबल्यावर नितीन दिवाकर तर संवादिनीवर ओंकार पाठक यांनी आपल्या बहारदार साथीने रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन मंजुषा गाडगीळ यांनी केले. याप्रसंगी मल्लिनाथ पाटील, अँड. आर. एस. तथा बाबू पाटील आणि पाटील परिवारातील सदस्यांनी सर्व कलाकार व पाहुण्यांचे स्वागत केले.



# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना ताकतीने सज्ज : भुसे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, या पार्श्वभूमीवर राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दादा भुसे यांनी सोलापूर दौऱ्यावर आले होते. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना संपूर्ण ताकतीने सज्ज आहे. स्नमानपूर्वक जागा मिळाल्यास युती बाबत आज दी.२१ जानेवारी दुपारी १२ पर्यंत ठरणार असल्याची माहिती दादा भुसे यांनी दिली.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी तयारीला लागण्याच्या स्पष्ट सूचना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील यांना दिल्या. संघटन बळकट करून तळागाळापर्यंत पोहोचण्यावर भर देण्याचे निर्देशही देण्यात आले. महानगरपालिकेनंतर आता जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या भेटीमुळे सोलापूरच्या राजकारणात शिवसेनेच्या हालचाली अधिक वेगवान झाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असून, आगामी निवडणुकीत शिवसेना आक्रमक भूमिकेत उतरण्याचे संकेत मिळत आहेत. या दौऱ्यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी मंत्री दादा भुसे यांचे सोलापुरात श्री स्वामी समर्थांची मूर्ती भेट देऊन स्वागत केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# ग्रामीणमध्ये दिग्गज नेते; पालकमंत्र्यांचा लागणार कस!

## ● ११ तालुक्यांपैकी बहुतांश ठिकाणी प्रस्थापित, मुरब्बी राजकारणी; शहरांच्या निवडणुकीत नव्हता खमक्या विरोधक

## ● जिथे ज्याची ताकद तिथे पालकमंत्र्यांना घ्यावे लागणार जुळवून; दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्याने बदलणार का भाजपाची रणनीती?

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २० जानेवारी-**

**नगरपालिकांच्या निवडणुका निमशहरी तर महापालिकांच्या निवडणुका शहरी भागातून झालेल्या असून निकालानंतर या भागात भाजपाच शक्तीमान असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका या संपूर्णपणे ग्रामीणभागाशी नाळ जोडलेल्या आहेत. सोलापूरच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्राचं ग्रामीण भागाचे राजकारण हे इरसाल असल्याचे आजवरच्या राजकारणातून दिसून आलेले आहे. देशाच्या आर्थिक राजधानीत म्हणजेच मुंबई मंत्रालयावर मुख्यमंत्रीपदावर बसून राज्य केलेले जवळपास बहुतांश राज्यकर्ते हे ग्रामीण भागातून आलेले होते–आहेत, हा इतिहास आहे. सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागावर राष्ट्रवादी काँग्रेसची मजबूत पकड होती तर काही प्रमाणात काँग्रेसचे प्राबल्य होता. दरम्यान, मोदी लाटेनंतर राजकारण बदलले. महाराष्ट्रात मोठ्या राजकीय नाट्यमय घडामोडी होवून राज्याचे संपूर्ण राजकारणच वेगळ्या वाटेवर गेल्याचे चित्र आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राजकीय ताकदवर असलेली राष्ट्रवादी फुटली अन् त्यांच्याकडील अनेक सत्तास्थाने गेली. राष्ट्रवादीच्या ताब्यातील संपूर्ण सहकार त्यांच्यापासून लांब आहे. राष्ट्रवादीचे अनेक दिग्गज नेते पवारांपासून फारकत घेत इतर पक्षात गेलेले आहेत. महापालिकेच्या निवडणूक निकालानंतर हवेत गेलेल्या 'भाजपा'ला ग्रामीणमधील दिग्गज राजकारण्यांशी दोन हात करावे लागणार आहेत. अनेक ठिकाणी पालकमंत्र्यांना जुळवून घ्यावे लागणार असून त्यांची रणनीती काय असणार? याची उत्सुकता सर्वांना आहे. मिनी मंत्रालय निवडणुकीत पालकमंत्र्यांचा कस लागणार हे मात्र नक्की!**




सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागावर एकत्र राष्ट्रवादीची मोठी ताकद होती. पण राष्ट्रवादी फुटली अन् त्यांची राजकीय ताकद विखुरली गेली. जिल्हा परिषद, जिल्हा दूध संघ, जिल्हा लेबर फेडरेशनसह जिल्ह्यातील पंचायत समित्या, ग्रामपंचायती 'राष्ट्रवादी'च्या ताब्यात होत्या. राष्ट्रवादीमधील पक्षांतर्गत वादाकडे पक्षाच्या श्रेष्ठ नेतृत्वाकडून दुर्लक्षिले गेले तर किंबहुना या वादाला खतपाणीदेखील घातल्याने पक्षाची राजकीय दुरवस्था झाली. राष्ट्रवादी फुटल्यानंतर तर अजित राष्ट्रवादीची जिल्ह्यातील अवस्था दयनीय झालेली आहे. जिल्ह्यात त्यांचा एकही आमदार नाही. महापालिका, नगरपालिकांच्या निवडणुकीत शरद राष्ट्रवादी आणि अजित राष्ट्रवादीची झालेली पिछेहाट पाहून काका-पुतण्याची पुन्हा एकत्र येण्याचे संकेत दिले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका एकत्र लढण्याचा निर्णय राष्ट्रवादीच्या नेत्यांनी घेतला आहे. राष्ट्रवादीकडे माळशिरस, करमाळा, माढा, मोहोळ या तालुक्यांची आमदारकी आहे. तर उर्वरित तालुक्यांमध्ये त्यांची रणनीती काय असणार? हे पहावे लागणार आहे. शरद पवार-अजित पवार यांची सोलापूरच्या राजकारणावर मजबूत पकड होती. त्याच पार्श्वभूमीवर पवार काका-पुतण्या या निवडणुकीत ताकदीने उतरतात का? यावर राष्ट्रवादीची अनेक राजकीय गणितं आणि राजकीय यशापयश अवलंबून असणार आहे. या निवडणुकीत जिल्ह्यात राष्ट्रवादीची राजकीय मदार ही बहुतांशी मोहिते-पाटील यांच्यावर असणार असून माढा लोकसभा मतदारसंघातील जिल्ह्यातील चार तालुक्याची सूत्रे त्यांच्याच हातात असणार आहेत. बार्शीत शिवसेना उबाठाचे आमदार दिलीप सोपल आणि मोहिते-पाटील यांच्यात सख्य आहे.आ.सोपलांचेही नगरपालिका निवडणुकीत पालकमंत्र्यांशी बिनसल्याचे सर्वश्रुत आहे. मोहोळ तालुक्यातील राजन पाटील भाजपात गेल्याने तेथे भाजपाची ताकद वाढली असली तरी आ.राजू खरे, जिल्हाध्यक्ष उमेश पाटील, नुकतेच भाजपामधून राष्ट्रवादीत आलेले विजयराज डोंगरे, काकाकडून पुतण्याकडे गेलेले वयस्कर नेते बळीरामकाका साठे हे मोहोळ आणि उत्तर सोलापूर तालुक्यात राष्ट्रवादीचा गड सांभाळणार आहेत. या तालुक्यात राष्ट्रवादीच्या या चमूबरोबर पालकमंत्री गोरे आणि राजन पाटील कुटुंबियांमध्ये सामना रंगणार आहे. माढा तालुक्यात आ.अभिजित पाटील, साठे परिवार, संजयबाबा कोकाटे यांच्याकडे या निवडणुकीचे नेतृत्व असणार असून माजी आमदार बबनदादा शिंदे, रणजितसिंह शिंदे यांच्यात हा सामना रंगणार आहे. सांगोल्यात राष्ट्रवादी काही प्रमाणात कुमकुवत आहे. शेकापचे आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपक साळुंखे यांच्यात सख्य आहे. मात्र, आ.बाबासाहेब देशमुख यांचा ओढा भाजपाकडे दिसून येतो आहे. शिवसेनेचे माजी आमदार शहाजीबापू पाटील यांची भूमिका महत्वाची असणार आहे. करमाळ्यात आ. नारायण पाटील व मित्रपक्ष यांच्यासह मोहिते-पाटलांच्या करमाळ्याशी निगडीत राजकारणावर राष्ट्रवादीची मदार असणार आहे. करमाळ्यात पालकमंत्री गोरे आणि माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्यात एकत्र येण्याबाबत खलबतं सुरु आहेत. बागल गट, जगपात गटासह सावंत गटाची भूमिका करमाळ्याच्या राजकारणात महत्वाची असणार आहे.

माळशिरसमध्ये उत्तम जानकर हे आमदार आहेत. मूळ म्हणजे मोहिते-पाटलांचा अकलूज गड महत्वाचा आहे. खा.धैर्यशिलभैय्या यांच्याकडे राष्ट्रवादीचे नेतृत्व आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, नेते बाळदादा, भाजपाचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या भूमिकेवर राजकीय यशाची गणिते ठरणार आहेत. माजी आमदार राम सातपुते, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्यामागे पालकमंत्री गोरे यांची ताकद असणार आहे. माळशिरस आणि अकलूजच्या राजकारणाचे रंग या निवडणुकीत वेगळ्याच वळणार गेल्यास आश्चर्य वाटायला नको. कारण मोहिते-पाटील पिता-पुत्रांनी नुकतेच मुख्यमंत्र्याची घेतलेली भेट बोलकी व चर्चेची ठरली आहे.

पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यात भाजपाचे आ.समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यात सख्य नाही. भगिरथ भालके, कल्याणराव काळे, दिलीप धोत्रे यांच्यासह स्थानिक नेते आणि माढ्याचे आमदार अभिजित पाटील यांची राजकीय भूमिका या तालुक्यात महत्वाची आहे. याठिकाणी पालकमंत्री ऐनवेळी कोणाला सोबत घेतील आणि कोणाला दूर ठेवतील? यावर येथील राजकीय गणितं अवलंबून असणार आहेत. दक्षिण सोलापूर तालुक्यात भाजपाचे आमदार सुभाष देशमुख हे तर तैनात आहेतच. पण नुकतेच भाजपामध्ये आलेले काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांच्यामुळे भाजपा वरचढ आहे. येथील विरोधक एकत्र येवून मैदानात उतरणार का? यावर सर्वकाही अवलंबून असणार आहे. अक्कलकोटमध्ये भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी हे फुल्ल जोमात असून तालुक्यातील दोन नगरपरिषदा त्यांनी एकहाती जिंकल्या आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी माजी गृहराज्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते सिध्दाराम म्हेत्रे यांच्यासह राष्ट्रवादीत गेलेले शिवानंद पाटील यांच्याशी त्यांची लढत असणार आहे. अक्कलकोटमध्ये काँग्रेसचे मल्लिकार्जन पाटील हे देखील मैदानात असणार आहेत. बार्शीत नेहमीप्रमाणे आ.दिलीप सोपल विरुध्द माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यात पारंपारिक लढत असणार आहे. नगरपरिषद राऊतांनी ताब्यात घेतली असून जिल्हा परिषदेसाठी या दोघांमध्ये कोण बाजी मारणार? याची उत्सुकता आहे.




महापालिका व नगरपालिकांच्या निवडणुकीनंतर सोलापूर जिल्ह्याचे राजकारण वेगळ्या वाटेवर आहे. भाजपाचा यशाचा वारु उधळला आहे. भाजपाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या आक्रमक राजकारणासह गनिमी कावा राजकारणालाही पवारांसह उबाठा, काँग्रेस यांना तोंड द्यावे लागणार आहे. पालकमंत्री गोरे यांनाही पवार काका-पुतण्याच्या मुरब्बी राजकारणाशी दोन हात करावे लागणार आहे. आ.दिलीप सोपल यांच्यासह राष्ट्रवादीच्या आमदारांनाही दुर्लक्षित करता येणार नाही. भाजपाचे पालकमंत्री निवडणुकांमध्ये ठाण मांडून बसतात आणि स्थानिक पातळीवरील राजकारण हातात घेवून रणनीती आखतात, त्यांच्या रणनीतीसह विजयाचा स्ट्राईक रेट चांगला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका हे संपूर्णपणे ग्रामीण भागातील असल्याने पालकमंत्री गोरे आणि भाजपाचे आमदार तसेच पवार काका-पुतणे, मोहिते-पाटील यांच्यासह संबंधित तालुक्याचे प्रस्थापित राजकीय नेते यांच्यातील लढत चुरशीची ठरणार आहे. दरम्यान, पालकमंत्र्यांनी घोषणा दिलीय की, अब की बार जिल्हा परिषदेवर भाजपा सरकार. त्यामुळे मिनी मंत्रालय जिल्हा परिषदेवर कोणाचा झेंडा फडकणार? हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

### अब की बार जिल्हा परिषदेवर भाजपा सरकार...पालकमंत्र्यांची घोषणा


महापालिका निवडणुकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भाजपा ७५ पार असा नारा दिला होता. पण जिल्हा परिषद निवडणुकीसाठी मात्र गोरे यांनी कोणताही विजयी आकडा सांगण्यापेक्षा मिनी मंत्रालयावर भाजपाची सत्ता असेल असे घोषित केले आहे. याचा अर्थ पाकमंत्र्यांनी काही तरी रणणिती आखली असणार आहे. याचाच एक भाग म्हणजे करमाळा तालुक्यात भाजपाची ताकत कमी असल्याचे ओळखून त्यांनी तेथील माजी आमदार संजयमामा शिंदे (अजित राष्ट्रवादी) यांच्यासोबत जाण्याचे संकेत दिले आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असतील तर संजयमामांची भूमिका काय हे पहावे लागणार आहे. सोलापूर शहरात भाजपाचे तीन आमदार होते पण ग्रामीणमध्ये तसे नसल्याने जिल्हा परिषद निवडणुकीसाठी पालकमंत्री गोरे यांना काही राजकीय चमत्कार करावे लागणार आहेत. कारण तेच राज्याचे ग्रामविकास मंत्रीदेखील आहेत. त्यांच्या भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आयटी असोसिएशन ऑफ सोलापूरचा १३ कंपन्यासोबत करार

### ५ हजार जणांना रोजगाराची संधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

आयटी असोसिएशन ऑफ सोलापूर या व्यवसायिक उद्योग संघटनेने सोलापुरात काम करण्यासाठी विविध १३ कंपन्यासोबत करार केला आहे. यामुळे सोलापुरात सुमारे ५ हजार जणांना रोजगार मिळणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष अपूर्व जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.



आयटी असोसिएशन ऑफ सोलापूर ही उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेली एक व्यवसायिक उद्योग संघटना आहे. ही संघटना प्लेसमेंट, कार्यशाळा, भरती संबंधी सहाय्य तसेच सातत्यपूर्ण उद्योग सहभाग यांना पाठबळ देणारी आहे. या संघटनेचे सध्या स्थानिक एकूण ३३ कंपन्या सदस्य आहेत. सोलापुरात आयटी क्षेत्राचा अधिक विस्तार करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. याच अनुषंगाने विविध १३ कंपन्यासोबत त्यांचा करार झाला आहे. लवकरच १०० पेक्षा अधिक कंपन्यांपर्यंत विस्तार करण्याचा आराखडा आहे.या असोसिएशनच्या वतीने विविध धोरणात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नव्या उद्योग सहभाग कार्यक्रमाची मालिकाही राबविण्यात येणार आहे. ११९ अभियांत्रिकी महाविद्यालयाशी सहकार्य करण्याच्या दृष्टीने इंडस्ट्री अॅकॅडमी कनेक्टचा विस्तार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माऊली झांबरे, जयंत होले-पाटील आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेसाठी १५७ तर पंचायत समित्यांसाठी २६८ नामनिर्देशन प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नगरपालिका, सोलापूर महापालिका निवडणुकीनंतर आता सोलापूर जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी (गटासाठी) चुरसीचे मतदान होणार आहे. दरम्यान, या निवडणुकीसाठी जिल्हा परिषदेसाठी १५७ अर्ज तर पंचायत समित्यांसाठी २६८ अर्ज दाखल झाले आहेत.

आज एकाच दिवशी १३९६ अर्ज विक्री झाले असून, बुधवार, दि.२१ शेवटचा अर्ज भरायचा दिवस असल्याने या दिवशी सर्वच तालुका कार्यालयात अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे. या निवडणुकीसाठी गेल्या २ महिन्यापासून काही राजकीय मल्ल लंगोट लावून बसले आहेत. त्यांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-२ राऊंडही झाल्या आहेत. ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती राहणार आहेत. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून एकट्याच्या जीवावर सोलापूर जिल्हा परिषदेत सत्ता आणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता भाजपाचीच मोठी भीती राहणार आहे. पूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्याने आणि केंद्रात अन् राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असल्याने जिल्हा परिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. आताही नव्याने हा प्रयोग दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येत करीत आहेत. यंदा मात्र भाजपाने नगरपालिका, महापालिकेच्या धर्तीवर फिल्डिंग लावली तर मात्र राष्ट्रवादीचे किती सदस्य येतील? हे सध्यातरी सांगणे कठीण आहे. यासाठी भाजप विरोधी सर्व पक्ष एकत्र येवून झेडपी निवडणूक लढण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

गेल्या निवडणुकीत सत्ता राखताना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसची दमछाक झाली. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी-२५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते.

### दाखल झालेले तालुकानिहाय अर्ज

आजतागायत सांगोला तालुक्यातून जि. प. २७ आणि पंचायत समितीसाठी २३ असे ५० अर्ज दाखल झाले आहेत. उत्तर सोलापूर जि. प. ८, पं. स. ८ असे १६ अर्ज दाखल आहेत. द. सोलापूर २३-४६ असे ६९ अर्ज दाखल आहेत. पंढरपूर ३०-४२ असे एकूण ७२, मंगळवेढा १३-२९ असे एकूण ४२, बार्शी १२-१४ असे २६ आणि माळशिरस ११-१० असे २१ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली आहेत. तर इतर तालुक्यातील आकडेवारी एकत्रित करून जिल्हा परिषदेसाठी १५७ तर पंचायत समित्यांसाठी २६८ नामनिर्देशन प्राप्त झाले आहेत.

# सोलापूरच्या खासदारापेक्षा दहापट अधिक वेळ मी दिला : पालकमंत्री

### आता इंदोरलाही विमानसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

विमानसेवेसंदर्भात आपण निवडणुकीत शब्द दिला होता. याची अनेकांनी खिल्ली उडवली. बाहेरचा पालकमंत्री म्हणून माझ्यावर टीका झाली. सोलापूरच्या खासदारांपेक्षा दहापट अधिक वेळ मी सोलापूरकरांना दिला. मी परका नाही हे महापालिकेच्या निवडणुकीच्या निकालाने दाखवून दिले, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले. दरम्यान, सोलापुरातून गोवा, मुंबईपाठोपाठ लवकरच इंदोरला विमानसेवा सुरू होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. अबकी बार ७५ पार असा नारा महापालिका निवडणुकीच्या काळात मी दिला होता. एका ठिकाणी चहापान केले, यावरुन विरोधकांनी माझ्यावर टीका केली. पण विरोधक गाफील राहिले आणि भाजपची प्रत्येक स्ट्रॅटेजी यशस्वी ठरली. भाजपाला एवढा मोठा विजय कधी मिळाला नाही. कमळाची ताकद आणि जनतेचा आशीर्वाद होता म्हणून तुम्ही निवडून आलात. याची जाणीव नूतन नगरसेवकांनी ठेवावी, असे सांगायलाही ते विसरले नाहीत. या निवडणुकीबाबत मी खूप अस्वस्थ होतो. ही निवडणूक आम्ही अंधारात नव्हे तर डोळे उघडे ठेवून लढविली, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. याप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.





# ३८व्या महापौरपदासाठीची स्पर्धा अधिक तीव्र होण्याची चिन्हे

### आ.देवेंद्र कोठे यांची भूमिका निर्णायक ठरणार?

### डॉ.किरण देशमुख, रंजिता चाकोते, विनायक कोंड्याल, शिवानंद पाटील यांच्यासह अन्य नावांची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

महापालिका निवडणूक निकालानंतर सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या महापौर पदाच्या आरक्षणाची घोषणा गुरुवार, दि.२२ जानेवारी रोजी होणार आहे. आरक्षण जाहीर होताच सोलापूरच्या ३८ व्या महापौरपदासाठीची स्पर्धा अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. महापौर निवडीसंदर्भात आ.देवेंद्र कोठे यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, महापौरपदासाठी डॉ.किरण देशमुख, रंजिता चाकोते, विनायक कोंड्याल, शिवानंद पाटील यांच्यासह अन्य नावांची चर्चा आहे.

सोलापूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. एकूण १०२ जागांपैकी तब्बल ८७ जागांवर भाजपाचा विजय झाल्याने महापौरपद भाजपाच होणार आहे. मात्र, आरक्षण कोणते पडते? यावरच अंतिम उमेदवार ठरणार आहे. या निवडणुकीत आमदार देवेंद्र कोठे यांनी पुढाकार घेत मोठ्या प्रमाणात नगरसेवक निवडून आणले. काही प्रभागांत अन्य पक्षांतील मातब्बर माजी नगरसेवकांना भाजपात आणून विजयी करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.



चार वेळा वेगवेगळ्या पक्षांतून निवडून आलेले विनायक कोंड्याल यांचा अनुभव लक्षात घेता त्यांना पसंदी मिळू शकते, अशी चर्चा आहे. नरेंद्र काळे दोन वेळा निवडून आले असून त्यांनी यापूर्वी विरोधी पक्षनेतेपद भूषविले आहे. अभ्यासू नगरसेवक आणि प्रभावी वक्ता अशी त्यांची ओळख आहे. यावेळी ते खुल्या गटातून निवडून आले आहेत. आरक्षणामुळे कायदेशीर अडचण निर्माण झाल्यास त्यांच्याकडे सभागृह नेतेपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. माजी महापौर स्व.महेश कोठे यांचे चिरंजीव प्रथमेश कोठे दुसऱ्यांदा निवडून आले आहेत. रंजिता चाकोते काँग्रेसमधून भाजपात आलेल्या असून त्या पहिल्यांदाच नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. शिवानंद पाटील यांनी यापूर्वी सभागृह नेतेपदाची जबाबदारी सांभाळली आहे. आरक्षण जाहीर होताच महापौरपदाच्या स्पर्धेला अधिकृत सुरुवात होणार असून, भाजपाच्या गोटात हालचालींना वेग येणार आहे.

### महापौरपदी कोण ठरु शकतो 'फिट'?

आरक्षण कोणते? गुरुवारी स्पष्ट होणार. भाजपाचे संख्याबळ १०२ पैकी ८७. अनुभवाचा मुद्दा विनायक कोंड्याल, नरेंद्र काळे, शिवानंद पाटील. पर्यायी भूमिका सभागृह नेतेपदाची शक्यता.

### मताधिक्याने विजयी झालेल्या नगरसेवकाला मिळणार १० कोटी निधी

ज्या प्रभागात सर्वाधिक मताधिक्याने भाजपचा विजय झाला अशा प्रभागासाठी दहा कोटींचा निधी देणार असल्याचे सांगितले होते. विनायक कोंड्याल यांनी सर्वाधिक मताधिक्याने निवडून आले आहेत. त्यामुळे हा निधी त्यांना दिले जाईल. या निधीच्या माध्यमातून त्यांच्या प्रभागातील अनेक विकासकामे मार्गी लागतील, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३३३

**मांडियेला खेळ कौतुकें बहुरुप ।**
**आपुले स्वरुप जाणतसें ।।**

संसार हा एक न संपणारा खेळ आहे. या खेळाचा निकाल लागलाच तर तो हार असाच असतो. कारण या खेळातील सवंगडीच हारवणारे असतात. हे सवंगडी म्हणजे माया, मोह, काम, क्रोध, मत्सर, अहंकार, मी, माझा, माझी, माझे आदि असतात. हे सवंगडीच यशातील खरा अडसर असतात. आपल्या सवंगड्यावर मात करणे व संसाराच्या माया जाळाचा हा खेळ जिंकणे खरोखर अवघड आहे. हे सत्य असले तरी या खेळात अनेकांना विजयही प्राप्त झाल्याचे आपण पाहतो. या खेळात विजयी तोच होऊ शकतो जो स्वत:च्या खऱ्या अस्तित्वाची जाण ठेवतो. या सवंगड्याच्या संगतीत रमणारा माणूस स्वत:च्या खऱ्या अस्तित्वाची जाण ठेवू शकत नाही. या सवंगड्याशी रमणे म्हणजे त्यांच्याप्रमाणे होणे होय. संसार हा केवळ एक प्रकारचा खेळ नाही, तर तो प्रसंगानुरुप विविध रुपे धारण करणारा खेळ आहे. प्रत्येक खेळातील सवंगडी आपणाला त्यांच्याप्रमाणे खेळायला लावणारे आहेत. संत महात्म्यांना या खेळाच्या अस्तित्वाची व सवंगड्याची खरी ओळख झाल्याने ते त्यांच्यात असूनही वेगळे होण्यात यशस्वी झाले. मायाजाळाच्या या संसाराच्या खेळात ते खेळत असलेले दिसत असले तरी त्यांनी स्वत:चे खरे अस्तित्व ओळखल्याने ते या खेळात राहूनही खेळापेक्षा वेगळे असतात. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, मांडियेला खेळ कौतुके बहुरुप । आपुले स्वरुप जाणतसे ।।



गोड असणारी नदी जेव्हा समुद्रास मिळते तेव्हा ती समुद्राशी एकरूप होऊन आपल्या गोडत्वाच्या ठिकाणी खारटपणा धारण करते. त्याप्रमाणे स्वत:चे अस्तित्व जोपासावे म्हणून धडपडणारा पण मनाने कमजोर असणारा व्यक्ती माया, मोहाच्या जाळ्यात अडकतो तेव्हा स्वत:च्या अस्तित्वाला माया, मोहाशी एकरूप करून टाकतो. एखादा व्यक्ती माया मोहाच्या समुद्राशी एकरूप होऊ इच्छित नसेल तेव्हा माया मोहाचा समुद्रच त्याच्याजवळ जातो आणि त्याला आपल्याशी एकरूप करून घेण्यात यशस्वी होतो. पण जो व्यक्ती मनाने स्वच्छ आहे, आत्मविश्वासू आहे आणि दृढनिश्चयी आहे, त्याला माया मोहाचा समुद्र कांही करू शकत नाही. आपल्या आत्मविश्वासाचा, दृढनिश्चयाचा आणि स्वअस्तित्वाचा प्रावाह तो माया, मोहाच्या समुद्राच्या एका टोकातून दुसऱ्या टोकाबाहेर नेण्यात यशस्वी होतो. त्याच्या प्रवाहाला माया, मोहाच्या खारटपणचा स्पर्शही होत नाही. उलट त्याच्या सहवासात येणारे माया, मोह हेच त्याच्या जवळ जाण्यास भिऊ लागतात. हे सर्व कांही केवळ दृढनिश्चयाने होऊ शकते. दिवसातून दहा वेळा निश्चय करायचा आणि दहा वेळा बदलायचा, असा स्वभाव असणाऱ्याला हे जमणे शक्य नाही. मनाची स्थिरता हा या निश्चयाचा आधारस्तंभ असल्याने हा आधारस्तंभ ज्याला मजबूत करता येईल तो आपल्या अस्तित्वाचा प्रवाह या मायाजाळाच्या संसारात निश्चित टिकवू शकेल. जय जय राम कृष्ण हरी।

जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. २१ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ द्वितीया**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (१३.५७)**
**योग - व्यतिपात (१८.५७)**
**करण - तैतिल (१४.४७)**
**राहू काल : मंगळवार :**
**दु. ३.०० ते ४.३०**

**दिनविशेष : जन्म :**
**१९८६: सुशांतसिंग राजपूत : सुप्रसिद्ध अभिनेते**
**१९७१: सफीना हुसैन : भारतीय समाजसेविका, रॅमॉन मॅगसेसे पुरस्कार**
**१८९४: माधव ज्युलियन : मराठी भाषेतील कवी**
**निधन**
**१९९८: सुरेन्द्रनाथ कोहली : भारताचे ९ वे नौदल प्रमुख**
**१९६५ : गीता बाली : अभिनेत्री हरिकीर्तन कौर**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आधुनिक विकासाचे प्रेरणास्त्रोत : डॉ. कोळेकर

### एच.एन.कॉलेजमध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे प्र. कुलगुरू डॉ. दामा यांच्या हस्ते उद्‌घाटन




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

संपूर्ण जीवनात वैयक्तिक संपत्तीचा उपयोग लोकविकासासाठी करून आदर्श राज्यकारभाराचा वस्तुपाठ घालून देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील अद्वितीय व्यक्तिमत्त्व असल्याचे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आर्थिक व्यवस्था आधुनिक उद्योग शैक्षणिक समन्वयाचा प्रेरणास्त्रोत या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आर्थिक व्यवस्था :आधुनिक उद्योग-समन्वयाचा प्रेरणास्त्रोत' या विषयावर ते बोलत होते. डॉ. कोळेकर पुढे म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांनी विविध विकासकाम ांमध्ये स्थानिक कारागिरांना रोजगार देऊन आत्म विश्वास निर्माण केला. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांनी महिला सबलीकरणाची भक्कम पायाभरणी केली. महसुली वाटपात त्यांनी ६० टक्के हिस्सा राज्याकडे आणि ४० टक्के लोकांकडे असा समतोल बदल घडवून आणला. व्यापार, शहरे व तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. इंदूर येथून राजधानी माहेश्वरला हलवून त्यांनी प्रशासन अधिक लोकाभिमुख केले. महिलांना घोडेस्वारी व शस्त्रप्रशिक्षण देऊन स्वसंरक्षणासाठी सक्षम केले. न्यायप्रिय आणि लोककल्याणकारी राजकारणासाठी त्या आजही स्मरणात आहेत.

राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. एल. बी. दामा यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमबीए विभागप्रमुख डॉ. प्रीतम कोठारी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राध्यापिका किरण गुप्ता व संगीता माळी यांनी करून दिला. व्यासपीठावर वालचंद आर्ट्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, कस्तुरबाई अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, डॉ.रोहिणी मिसाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्राध्यापिका डॉ. रोहिणी मिसाळ यांनी आभार मानले. प्राध्यापिका ग्रीष्मा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या पहिल्या दिवशी ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक डॉ. घनश्याम होळकर (भरतपूर, राजस्थान) यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची आर्थिक प्रणाली' या विषयावर विचार मांडले. तर मौलाना आझाद नॅशनल उर्दू युनिव्हर्सिटी, हैदराबाद येथील स्कूल ऑफ कॉमर्स अँड बिझनेस मॅनेजमेंटचे डॉ. बदिउद्दीन अहमद यांनी 'महिला सक्षमीकरण आणि आर्थिक सहभाग: ऐतिहासिक उदाहरणे व सद्यस्थितीतील परिणाम' या विषयावर सखोल विश्लेषण केले. ही राष्ट्रीय परिषद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोकाभिमुख आर्थिक धोरणांचा आणि आधुनिक विकासाशी असलेल्या सुसंगततेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.



## नगरसेवक चेतन नरोटे यांचा आनंद चंदनशिवे यांनी केला सत्कार

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

प्रबुद्ध भारत तरुण मंडळ, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी नवनियुक्त नगरसेवक चेतन नरोटे यांचा सत्कार केला.

यावेळी गौतम चंदनशिवे, बाबा गायकवाड, चंद्रकांत सोनवणे, श्रीमंत जाधव, किरण साळवे, उमेश रणदिवे, अमित माने, संदीप कापुरे, गुड्डू शिंदे, आदित्य दुपारगुडे, आदित्य चंदनशिवे, विकी माळाळे, गौतम शिंदे, भीमा मस्के, प्रथमेश सुरवसे, सुमित चंदनशिवे, प्रसन्न तळभंडारे आदी उपस्थित होते.

## तरुणावर हल्ला; काठीने मारहाण

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

शहरातील कल्याणनगर परिसरात अज्ञात कारणावरून एका तरुणावर काठीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी विजापूर नाका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. रावसाहेब प्रकाश नरुटे वय २८, रा. कल्याणनगर भाग-२, जिल्हा परिषद शाळेजवळ, सोलापूर हे स्वर्ग हॉटेलच्या बाजूला, जिल्हा परिषद शाळेजवळ बसले असताना आरोपी सोमनाथ फुलारी (वय २५, रा. कल्याणनगर) याने अज्ञात कारणावरून हल्ला केला.

आरोपीने त्याच्याकडील गाठवड्यातील काठी काढून रावसाहेब नरुटे यांच्या डोक्यात मारहाण केल्याने ते जखमी झाले. ही घटना दि. १९ जानेवारी रोजी रात्री सुमारे १.०० वाजण्याच्या सुमारास घडली. घटनेनंतर जखमी रावसाहेब नरुटे यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास हवालदार फुलारी करत आहे.

## मेव्हण्याच्या खूनप्रकरणी उच्च न्यायालयातून जामीन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

नागेश संतोष विटकर वय २०, रा. सोलापूर यांच्या खूनप्रकरणी आरोपी अभिषेक अंबादास बंदपट्टे वय २३, रा. सोलापूर यास कोल्हापूर उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी यांनी १५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन देण्याचे आदेश दिले.



या प्रकरणातील मयत नागेश हा आरोपी अभिषेकचा मेव्हणा होता. नागेश याने अभिषेकच्या सासू अनिता हिस यांच्याकडे अभिषेक दारूचे व्यसन करतो, जुगार व मटका खेळतो तसेच अनैतिक संबंध ठेवतो, असे खोटे आरोप केल्याने अभिषेक व त्याच्या पत्नीमध्ये वाद निर्माण झाला होता, अशी माहिती न्यायालयात मांडण्यात आली.

फिर्यादीनुसार, दि. १२ मार्च २०२५ रोजी सायंकाळी सुमारे आठ वाजता नागेश घरी असताना एका फोन कॉलनंतर तो बाहेर गेला. साडेआठ वाजण्याच्या सुमारास फिर्यादीची सून प्रियंका विटकर हिने सांगितले की, त्यांच्या घरासमोर अभिषेक बंदपट्टे व अविनाश बंदपट्टे हे नागेश यास लाकडी दांडक्याने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होते. ही माहिती मिळताच मयताची आई लिंबूबाई संतोष विटकर तेथे गेल्या असता, नागेश रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आढळून आला. आरोपी दोघेही त्याठिकाणाहून वाहनावरून पळून गेले. जखमी अवस्थेत नागेश यास उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी मयताची आई लिंबूबाई विटकर यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार आरोपीस अटक करण्यात आली होती.

आरोपीने सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता; मात्र तो फेटाळण्यात आला. त्यानंतर आरोपी अभिषेक याने ॲड. रितेश थोबडे यांच्यामार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला.

सुनावणी दरम्यान बचाव पक्षाने सकृतदर्शनी खुनाचा गुन्हा सिद्ध होत नसल्याचा युक्तिवाद मांडला. तो ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी, तर सरकारतर्फे ॲड. एस. एच. यादव यांनी काम पाहिले.

## श्री प्रतिष्ठानच्यावतीने श्री मार्कंडेय जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**



श्री प्रतिष्ठानच्या वतीने पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांची जयंती साजरी करण्यात आली. अखिल भारतीय पद्मशाली युवजन संघम्चे अध्यक्ष श्रीनिवास संगा यांच्या हस्ते आणि प्रभाकर दिकोंडा, गोवर्धन बोगा, सुरेश कोकटनूर, ॲड.संदीप संगा यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी संतोष संगा, किसन पासकंटी अजय आडम विजय जटला, प्रकाश सामल, व्यंकटेश अंदाल, राजू पुट्टा, वैजनाथ उघडे, संतोष चोळ्ळे, महेश कल्याणम, बालाजी श्रीचिप्पा, अमोल पराळकर, अक्षय मंगळारम, राजू गाडी, बालाजी जोरीगल, श्रीपाद राजुल, महेश शेराल, अशोक कुरापाटी, अंबरिष पुठ्ठा, अक्षय वाघमारे, विनायक नल्ला, राहुल पसलादी, शेखर भोसले, स्वप्निल पवार यांच्यासह पद्मशाली समाजबांधव उपस्थित होते.



## जैन समाजाला स्वीकृत सदस्यांमध्ये स्थान मिळावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेत जैन समाजाला स्वीकृत सदस्यामध्ये स्थान मिळण्यासाठी जैन समाजाच्या शिष्टमंडळाने सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे भारतीय जनता पार्टीच्या शहर अध्यक्षा रोहिणीताई तडवळकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी कुमठे चंद्रप्रभू जैन मंदिराचे अध्यक्ष श्याम पाटील, भारतीय जनता पार्टीच्या शहर उपाध्यक्ष साधना संगवे, भारतीय जैन संघटनेचे अभिनंदन विभूते, वालचंद पाटील, ज्ञानदीप कासार, महामंडळाच्या स्नेहा वनकुद्रे, भारतीय जैन संघटनेच्या मंगल पांढरे, ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँकेच्या संचालिका प्रिया पाटील, हिराचंद कासार, उद्योजक संकेत मेहता, राम पाटील, विक्रांत बशेट्टी, ओम पाटील आदींची उपस्थिती होती.

## दुचाकी चोरी; अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकी चोरीची घटना घडली असून याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


फिर्यादी सोहेल शहिद जहागिरदार वय ३० वर्षे, रा. नुतन नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांनी आपली होंडा कंपनीची लिव्हो मोटारसायकल क्रमांक एमएच १३ सीएन ३८०४ चॉकलेटी व काळ्या रंगाची, दि. ११ जनेवरी रोजी रात्री १०.०० वाजता घरासमोर हँडल लॉक करून लावली होती. त्यांनतर दि. १२ जानेवारी रोजी सकाळी ०७.०० वाजता उठून पाहिले असता सदर मोटारसायकल त्या ठिकाणी दिसून आली नाही.



कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे निदर्शनास आले असून या प्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, दि. १८ जानेवारी रोजी सायंकाळी ४.०९ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार भांगे करीत आहेत.

## ४१ वर्षीय व्यक्तीची तणावामुळे आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**



दक्षिण सोलापुरातील भंडारकवठा येथे कर्जबाजारीपणा व गंभीर आजारपणाच्या तणावातून एका ४१ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी १९ जानेवारीला दुपारी उघडकीस आली.

विक्रम महासिद्ध व्हनकोरे (वय ४१, रा. भंडारकवठा, ता. दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. १९ जानेवारी रोजी दुपारी ३.४० वाजण्याच्या पूर्वी त्यांनी आपल्या राहत्या घरामध्ये लोखंडी पाईपला ओढणीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याबाबत मयताचा भाऊ सुधाकर महासिद्ध व्हनकोरे (वय ३६, रा. भंडारकवठा) यांनी मंद्रुप पोलीस ठाण्यात खबर दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विक्रम व्हनकोरे यांच्यावर बँकेचे कर्ज होते. तसेच त्यांना पॅरालिसिस व एचआयव्ही यांसारखे गंभीर आजार असल्याने ते दीर्घकाळ मानसिक तणावाखाली होते. या तणावातूनच त्यांनी आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेची नोंद मंद्रुप पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल मुलाणी हे करीत आहेत. दाखल अंमलदार म्हणून पोलिस नामदार मसलखांब यांनी कामकाज पाहिले. आत्महत्येमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू आहे.

# प्रजासत्ताक दिनी तब्बल ८ लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक कवायत संचलन

### सोलापूर जिल्ह्यातील ४७०२ शाळांचा सहभाग

### शिक्षणाधिकारी कादर शेख यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना, शिस्त, आरोग्य जागृती व देशभक्तीचा संस्कार रुजवण्यासाठी एक ऐतिहासिक व प्रेरणादायी निर्णय घेण्यात आला आहे. येत्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये देशभक्तीपर गीतावर आधारित सामूहिक कवायत संचलन कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम राज्यस्तरीय असून, सोलापूर जिल्ह्यातील



४७०२ शाळांतील तब्बल ८ लाख विद्यार्थी यामध्ये सहभाग नोंदविणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कादर शेख यांनी आज (दि. २०) दिली.

स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शासकीय व खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अशाच प्रकारचा कवायत संचलन कार्यक्रम आयोजित करण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. त्याच धर्तीवर हा उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना अधिक बळकट करण्याचा उद्देश आहे. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, व्यायामाची आवड, शिस्त, एकोप्याची भावना व देशभक्तीची जाणीव निर्माण करणे हा आहे.

प्रत्येक तालुक्यात सामूहिक कवायतीसाठी ३ शाळांची नियुक्ती करण्यात आली असून, गाव व शहरातील मैदानाच्या क्षमतेनुसार विद्यार्थी एका मैदानावर एकत्र करून कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. मैदानावर पांढऱ्या रंगाचे पट्टे, हिरवी चटई तसेच देशभक्तीमय सजावट करण्यात येणार असून वातावरण पूर्णपणे राष्ट्रप्रेमाने भारलेले असेल.

हा उपक्रम जिल्ह्यातील शालेय इतिहासातील एक अभूतपूर्व व आदर्श उपक्रम ठरणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी (शिक्षण) तसेच सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा यांचे काटेकोर नियोजन सुरू असून, विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त व आरोग्याची जाणीव निर्माण करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी व्यक्त केला आहे.



## नवनिर्वाचित नगरसेवकांचा महामंडळाकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

धनगर समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी महानगरपालिकाचे नूतन नगरसेवक चेतन नरोटे, नरेंद्र काळे, राजकुमार पाटील, राजश्री कणके, अलका भंवर, अनिकेत पिसे, सुनिल खटके, आरती वाकसे, विजया खरात, शिवाजी वाघमोडे, स्वेता खरात यांची उपस्थिती होती. या सर्व नूतन नगरसेवकांचा राजमाता अहिल्यादेवी होळकर पुतळ्याजवळ भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारत बन्ने यांनी भूषवले. यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाचे अध्यक्ष बाबा निशानदार यांच्यासह महेश गाडेकर, किशोर खरात, सुधीर सलगर, सुरज देवकते, मनोज सलगर, सिद्धेश्वर धायगुडे, अनिल दुधाळ, सचिन हाके, डीडी पांढरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचलन सुजित खुर्द यांनी केले तर आभार महेश गाडेकर यांनी मानले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### राष्ट्रीय सेवा योजना ही शास्वत विकासाची चळवळ : डॉ. वडजे

**बोरामणी, दि. २० जानेवारी-**

राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ योजना नसून ती शास्वत विकासाची एक युवा चळवळ आहे, विकसित भारत घडविण्यासाठी युवकांची भूमिका महत्वाची आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालय, बोरामणीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने बक्षी हिप्परगा येथे आयोजित केलेल्या शास्वत विकासासाठी युवक या विशेष वार्षिक शिबिराच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. वडजे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. याप्रसंगी गावचे सरपंच भाऊराव जाधव, माजी सरपंच शंकर यादव, माजी पं. स. सदस्य तुकाराम कोळेकर, प्रा. अनिकेत चनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रदीप राठोड व प्रा. राहुल काळे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. यावेळी माजी सरपंच शंकर यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. सोमनाथ स्वामी यांनी केले तर आभार प्रा. प्रदीप राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. राहुल काळे, प्रा. पंढरीनाथ हरिदास, महेश भासगी, क्रीडाविभागाचे दोडमनी, सागर खंडाळकर, व्होलीबॉल संघांचे सोवीत राठोड, सुजल राठोड, यशराज राठोड आदींनी परिश्रम घेतले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बालाजी यादव, गोविंद निकम, राजेश फडतरे, बापूसाहेब माने, चंद्रकांत मेटे, हरिदास जाधव, शिवराम महाडिक, हुसेन शेख, उमाकांत पवार, नेताजी पवार, खांडेकर उपस्थित होते.



### लोकमान्य टिळक शाळेत महाराणा प्रताप पुण्यतिथी साजरी

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

येथील लोकमान्य टिळक नगरपालिका शाळा क्रमांक ५ येथे महान योद्धा व स्वातंत्र्यप्रेमी राजा महाराणा प्रताप यांची पुण्यतिथी त्यांच्या शौर्य, त्याग व देशभक्तीच्या स्मरणार्थ साजरी करण्यात आली. कार्यक्रम ासाठी सौख्यदाता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी गणेश साळुंखे, महेश पवार, अक्षय साळुंखे, निलेश पवार, सहशिक्षिका मंजुषा मिरगणे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली. विराम करमाळकर, श्रावणी गायकवाड, शौर्य परदेशी व जय नेटके यांनी भाषण केले. यावेळी सौख्यदाता गणेश प्रतिष्ठानच्यावतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सोनटक्के यांनी आभार मानले.



### 'सोशल'मध्ये एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर तसेच सोलापूर सोशल असोसिएशन्स् आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम वर्ष कलाचे दोन सत्रात नव्याने पुनर्रचित हिंदी अभ्यासक्रमावर एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभास विद्यापीठाचे प्रो-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सोलापूर सोशल असोसिएशन्स् आर्ट्स ॲण्ड कॉमर्स कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ.इ.जा. तांबोळी होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्राचे अध्यक्षपद प्रा.डॉ. गंगाधर बिराजदार यांनी भूषविले. या सत्रात प्रा. डॉ. गिरीश काशीद यांनी विषय विश्लेषण केले. प्रा. डॉ. सुचिता गायकवाड यांनी आधुनिक हिंदी काव्य एवं व्याकरण या विषयावर तर प्रा. डॉ. किशोर पवार यांनी आधुनिक हिंदी कहानी एवं व्याकरण या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारनंतर झालेल्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ.दादासाहेब खांडकर होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संगिता यादव तर आभार समन्वयक प्रा. रईसा मिर्झा यांनी मानले.

### बार्शी तालुक्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण; अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने फूस लावून अपहरण केल्याची घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १६ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास त्यांची मुलगी वय १७ वर्षे ११ महिने हिला त्यांच्या शेतातील घरातून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी कशाचे तरी आमिष दाखवून फूस लावून पळवून नेले आहे. फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी घराबाहेर गेल्यानंतर बराच वेळ होऊनही मुलगी परत न आल्याने कुटुंबीयांनी गावात, आजूबाजूच्या परिसरात तसेच नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला. मात्र ती मिळून न आल्याने अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या घटनेची दखल घेत पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवून मुलीचा शोध घेण्यासाठी तपास व शोधमोहीम सुरु केली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणे, नातेवाईक व परिचितांची चौकशी तसेच संभाव्य ठिकाणी पथके पाठवण्यात आली आहेत.

# नव्या नगराध्यक्षांसमोर अक्कलकोटच्या विकासाचे आव्हान

**वाढलेल्या अपेक्षांकडे सर्वांचे लक्ष**

**तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीच्या विकासाच्या नव्या कारभाऱ्यांकडून अपेक्षा वाढल्या**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जानेवारी-**

अक्कलकोट नगरीच्या नगराध्यक्ष पदाची सूत्रे भारतीय जनता पार्टीचे युवा नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी स्वीकारली आहेत. तसेच उपनगराध्यक्षपदी ऋतुराज राठोड यांची निवड करण्यात आली. अक्कलकोटमधील वाढते अरुंद रस्ते, भाविक तीर्थ क्षेत्रअक्कलकोट नगरीच्या विकासाचे नव्या नगराध्यक्षांसमोर आव्हान आहे. वाढलेल्या अपेक्षांकडे सर्व अक्कलकोट वासियांचे लक्ष लागून राहिले आहे.

अक्कलकोट नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासह २२ सदस्य भारतीय जनता पार्टीचे निवडून आले आहेत. थेट नगराध्यक्ष म्हणून युवा नेते मिलन कल्याणशेट्टी हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिनांक १२ जानेवारी रोजी पदभार स्वीकारला. तसेच उपनगराध्यक्षपदी युवा नेते ऋतुराज उर्फ बंटी राठोड यांची निवड करण्यात आली. अक्कलकोट नगर परिषदेच्या निवडणुकीत मतदारानी भाजपाला बहुमताने सत्ता दिली आहे. अक्कलकोटकरांच्या नव्या कारभाऱ्यांकडून विकासाच्या अपेक्षा वाढल्या असून अक्कलकोट शहराच्या विकासाचे नव्या कारभाऱ्यांसमोर आव्हान असणार आहे. अक्कलकोट शहराचा पाणी प्रश्न, स्वच्छता, रस्त्यांची दुरावस्था, मूलभूत सुविधांचा उडालेला बोजवारा, तीर्थक्षेत्र आराखडा विकास, मंदिर परिसर व समाधी मठ परिसराचा विकास, शहरातील रस्ते रुंदीकरण ,परगावच्या भाविकांना सुविधा पुरविणे अशा अनेक समस्या शहराला भेडसावीत आहेत. अक्कलकोट शहरात विकासाची कामे सुरू आहेत. पण ही कामे अत्यंत संथगतीने सुरू आहेत. या कामांमुळे नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू आहे. शहरात अनेक कामांसाठी रस्ते खोदण्यात आले आहेत. यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे. धुळीमुळे अबालवद्धांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरात श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दररोज हजारो परगावचे भाविक भक्त हे येत असतात. शहरात आल्यानंतर परगावच्या भाविकांना वाहन पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावीत आहे. गर्दीच्या वेळी शहरातील वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे.



अक्कलकोट शहराचा पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर आहे. अक्कलकोट शहरात कुरनूर धरणातून पाणीपुरवठा सुरू आहे. आजच्या वेळी कुरनूर धरणात मुबलक पाणी असूनही अक्कलकोट शहरात आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. म्हणजे महिन्यातून केवळ तीन ते चार वेळाच पाणीपुरवठा सुरू आहे. अक्कलकोट शहरातील रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली आहे. अक्कलकोट शहरातील स्वच्छतेबाबत नागरिकात तक्रारी वाढले आहेत. अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट शहराच्या विकासासाठी शासनाकडून कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. अक्कलकोट शहरात तीर्थक्षेत्र विकास निधीतून कामे सुरू आहेत. अक्कलकोट शहराच्या विकासासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. आता शहराच्या नव्या कारभाऱ्यांना शहरात जी कामे सुरू आहेत त्यांचा दर्जा पाहणे तसेच सदरची कामेही मुदतीत होण्यासाठी प्रशासनावर दबाव टाकण्याचे काम करावे लागणार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व त्यांच्या सहकाऱ्यांना अक्कलकोट शहर विकासाचे आव्हान पेलावे लागणार आहे.अक्कलकोट नगर परिषदेत सर्वपक्षीय सदस्य तसेच नगराध्यक्ष हे उच्चशिक्षित असून या सर्वच लोकनियुक्त सदस्यांकडून अक्कलकोटकरांच्या विकासा संदर्भात अपेक्षा वाढल्या आहेत.

> वटवृक्ष मंदिर परिसरात मोठया प्रमाणात अतिक्रमण अरुंद रस्ते वाहतुकीची कोंडी परिसरातून शहरवासीयांना जाणे-येणे जिकरीचे यावर त्वरीत उपायोजना या समस्याकडे होणारे दुर्लक्ष भाविकाना होणारा त्रास यामुळे अक्कलकोट ची प्रतिमा बदलणे मोठे आव्हान असणार आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखेतर्फे हार्वेस्टिंग मशीनसाठी अर्थसहाय्य



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २० जानेवारी-**

बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखा ही पंढरपूर आणि परिक्षेत्रातील गावांची अर्थवाहिनी म्हणून ओळखली जाते.चालू आर्थिक वर्षात शासनाच्या विविध योजना बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर संबंधित विविध शाखांमध्ये पोहचवत असल्याने ही शाखा ग्राहकांसाठी वरदान ठरत आहे.

शासनाच्या विविध योजना ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या बँकेचे पदाधिकारी व कर्मचाऱ्यांचा नेहमीच प्रयत्न असतो देगाव ता.पंढरपूर येथील शेतकरी अनिल घाडगे यांना शाखेने एआयएफ आणि महा डीबीटी योजनेअंतर्गत अत्याधुनिक हार्वे स्टिंग ऊस तोडणी मशीनसाठी अर्थसहाय्य केले. याप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखेचे शाखा अधिकारी चंद्रकांत मोरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना बँकेच्या विविध शेतीविषयक तसेच सरकारी अनुदानित योजनांविषयी माहिती देऊन त्याबद्दल मार्गदर्शन केले. पारंपरिक शेतीच्या वाढत्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कशी मात करता येईल यांविषयी त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा केली. तरुणांनी नोकरीसाठी शहरात जाण्याऐवजी आपल्याच परिसरात अत्याधुनिक शेती आणि शेतीपूरक व्यवसाय करून आपली आर्थिक प्रगती करण्याविषयी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शाखाधिकारी चंद्रकांत मोरे, बँक प्रतिनिधी अमोल नलवडे, प्रगतशील शेतकरी अनिल घाडगे, धर्मेंद्र घाडगे, संजय शिंदे, चेतन घाडगे, हर्षल पाटील उपस्थित होते.

## उद्यापासून कृषी तंत्रज्ञान महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

शबरी कृषी प्रतिष्ठान, सोलापूर संचलित कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर यावर्षी १८ व्या भव्य कृषी तंत्रज्ञान महोत्सव-२०२६ चे आयोजन दि. २२ व २३ जानेवारी २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर (सोलापूर-बार्शी रोड) येथे करण्यात आले आहे, अशी माहिती वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्घाटन २२ जानेवारी रोजी अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी व विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गावसाने यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून अध्यक्षस्थानी शबरी कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड राहणार आहेत. २३ जानेवारी रोजी समारोप समारंभात राष्ट्रीय व राज्यस्तरीय तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे तर विशेष उपस्थिती म्हणून विभागीय कृषी संशोधन केंद्र सोलापूरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीनकुमार रणशूर, भारतीय भरडधान्य संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बसवराज रायगोंड, नाबार्ड सोलापूरचे जिल्हा उप व्यवस्थापक नितीन शेळके आदी मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत भव्य शिवारफेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाअंतर्गत केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष पिक प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. ३६ पिकांतील ५४ वाण व २७ आधुनिक शिफारशींवर आधारित भव्य प्रात्यक्षिके या महोत्सवाचे वैशिष्ट्य ठरणार आहे. प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावर कृषी शास्त्रज्ञांच्या उपस्थितीत विविध कृषी निविष्ठांच्या वापराचे तुलनात्मक परिणाम प्रत्यक्ष पाहता येणार असून, क्यू.आर. कोड आधारित माहिती फलक व व्हिडीओद्वारे अद्ययावत तंत्रज्ञान माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जीजाई नॅनो किचन गार्डन, जैविक व नैसर्गिक शेती निविष्ठा, बीज प्रक्रिया युनिट, निंबोळी पावडर प्रकल्प, ट्रायकोडर्मा व मेटा-हायझियम उत्पादन, गांडूळखत तसेच ज्वारी, डाळिंब व सोयाबीन प्रक्रियायुक्त पदार्थांचे प्रदर्शन होणार आहे. शेतकरी, युवक व कृषी विस्तार कार्यकर्त्यांसाठी हा महोत्सव अत्यंत लाभदायक ठरणार असून, या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब तांबडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस प्रदीप गोंजारी आदी उपस्थित होते.

## वेळापूरच्या खो-खो खेळाडूंना सहकार्य करणार



**रामजी कश्यप यांच्या सत्काराप्रसंगी आ. जानकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० जानेवारी-**

वेळापूर नगरी ही खो खो खेळाडूंची पंढरी असून या नगरीमध्ये आज पर्यंत राष्ट्रीय अनेक मोठे खेळाडू निर्माण झाले आहेत, अनेक खेळाडूंनी भरत किताब मिळवला आहे अशा नगरी मधील उभरत्या खो खो खेळाडूंना त्यांच्या प्रगतीसाठी जे जे होईल ते सहकार्य माझ्याकडून केले जाईल असे प्रतिपादन माळशिरस आमदार उत्तमराव जानकर यांनी व्यक्त केले

वेळापूर पालखी मैदान येथे राष्ट्रीय खो-खो खेळाडू व वेळापूर नगरीचा सुपुत्र रामजी कश्यप यास मानाचा एकलव्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल व राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत सिल्वर मेडल मिळवल्याबद्दल श्रीकृष्ण मेटकरी व राष्ट्रीय प्रशिक्षक अक्षय राऊत आदींचा सत्कार समारंभाचे आयोजन अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते यावेळी आमदार उत्तमराव जानकर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, प्रतापराव पाटील, प्राचार्य आर.बी.पवार, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, राष्ट्रीय प्रशिक्षक अक्षय राऊत, राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, जावेद मुलाणी, सतीश कदम, शिवाजी जाधव उपस्थित होते. सूत्रसंचालन क्रीडा प्रमुख सतीश कदम यांनी केले.

## 'मराठी भाषा संवर्धन काळाची गरज' या विषयावर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

येथील उमा महाविद्यालया म ध्ये मराठी विभागांतर्गत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त' मराठी भाषा संवर्धन काळाची गरज'या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड हे होते. कार्यक्रम ाच्या प्रमुख व्याख्यात्या प्रा. डॉ. नीता भिसे-ढावरे या होत्या.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ.नीता भिसे-ढावरे यांनी, प्रत्येकाने आपल्या स्वतः पासून व घरातून मराठी भाषा बोलली पाहिजे. घरातील लहान मुलांवरही मराठी भाषेतूनच संस्कारमूल्ये रुजवली पाहिजेत आणि त्यांनाही मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे, असे सांगून आजच्या डिजिटल युगातही मराठी भाषेचा वापर करावा त्यामुळे मराठी भाषा प्रवाही राहील व ती राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरही समृद्ध होईल असे प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. बाड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रम ाप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.अनंत कुलकर्णी, आय क्यूएसी कॉर्डिनेटर प्रा. डॉ. अविनाश देशपांडे, ग्रंथपाल डॉ. अंजली चौरे, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा.सिंधू खिलारे हे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. नागिन सर्वगोड यांनी केले तर प्रा. डॉ. दत्ता सरगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वर्षा सरतापे यांनी आभार मानले.

## गणेश जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र पखालपूर गणपती दर्शनासाठी बसेस सोडण्यात येणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जानेवारी-**

श्री गणेश जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र पखालपूर येथे गणपतीच्या दर्शनासाठी बस सोडव्यात यावी या अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या मागणीनुसार गुरुवारी (दि. २२) दिवसभर पखालपूरसाठी बसेस सोडण्यात येणार आहेत अशी माहिती पंढरपूर आगार प्रम ुख योगेश लिंगायत व जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

श्री क्षेत्र पखालपूर येथे प्राचीन,जागृत असे गणपतीचे मंदिर आहे. नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांची श्रद्धा आहे.माघ शुद्ध चतुर्थी या दिवशी गणेश जयंती साजरी केली जाते. त्यामुळे त्याठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते हे विचारात घेऊन पंढरपूर आगाराने गणेश जयंती दिवशी बसफेऱ्या करण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे गुरुवारी (दि.२२) सकाळी सात पासून रात्रीपर्यंत श्रीक्षेत्र पखालपूर येथे जाण्या-येण्यासाठी जुन्या बस स्थानकापासून बससेवा सुरू करण्यात येत आहे. तरी जाण्या-येण्यासाठी जेष्ठ नागरिक,महिला प्रवाशी भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन आगार प्रमुख योगेश लिंगायत,स्थानक प्रमुख अंकुश सरगर, ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल, जिल्हा पालक विनोद भरते, सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, जिल्हा सदस्य पांडुरंग अल्लापूरकर, तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सचिव महेश भोसले, उपाध्यक्ष प्रशांत माळवदे, सदस्य सागर शिंदे, मंगेश देशपांडे, शशिकांत सुगंधी, सतिश निपाणकर यांनी केले आहे.



## 'लोकविकास'मध्ये हळदी-कुंकू समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.२० जानेवारी-**

वेळापूर येथील लोकविकास शिक्षण प्रसारक संस्थेच्या मराठी मिडियम व इंग्लिश मिडियम स्कूल, लोकविकास जुनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने हळदीकुंकू समारंभ पार पडला. यावेळी मोनाली माने-जाधव , शमा तांबोळी, सुर्वणा टिक, सोनाली नवले, रूपाली बनकर, सुरेखा कुदळे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध हस्तकला व वैज्ञानिक अविष्कारांचे आकर्षक प्रदर्शन भरविण्यात आले होते. तसेच मातापालकांसाठी संगीत खुर्ची व उखाणे स्पर्धा या मनोरंजक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. संगित खुर्चीमध्ये वैशाली कांबळे, रूपाली काटकर, रूपाली बनकर, उखाणे स्पर्धे मध्ये शैला पताळे, शमा तांबोळी, अनुराधा चंदनशिव, यांनी नंबर मिळवले. कार्यक्रमास मुख्याध्यापक अमोल पांढरे, अजित बनकर, सुनिल पताळे उपस्थित होते. सूत्रसंचालन विजया चापले प्रस्तावना अरुणा बनसोडे व आभार प्रियंका अनंतकवळस यांनी मानले.





# जिल्ह्यात अस्तित्वासाठी लढणारी राष्ट्रवादी काँग्रेस कुर्डू व भोसरे गटात सेफ झोनमध्ये

**तभा वृत्तसेवा । सोमनाथ शिंदे**
**कुर्डुवाडी, दि. २० जानेवारी -**

महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर संपूर्ण राज्यात अस्तित्वासाठी धडपडणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला माढा तालुक्यातील कुर्डू आणी भोसरे जिल्हा परिषद मतदारसंघ सेफ मानला जात आहे. या दोन्ही मतदारसंघात माजी आमदार यांचे कायम वर्चस्व राहिले आहे. दरम्यान, सध्याची राजकीय समिकरणे पाहता तालुक्यात शिंदे विरुध्द मोहिते-पाटील असा सामना रंगणार आहे.

माढा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात गटासाठी तर पंचायत समितीच्या चौदा गणासाठी निवडणूक होणार आहे. या तालुक्यातील कुर्डू व भोसरे जिल्हा परिषद गट हे दोन मतदासंघ चार पंचायत समिती गणासह करमाळा विधानसभा मतदारसंघात येतात. यात छत्तीस गावे सामाविष्ट आहेत.




याठिकाणी माजी आमदार संजयमामा शिंदे यांचे वर्चस्व आहे. याकडे लक्ष वेधले जात आहे. मानेगाव, उपळाई, टेंभूर्णी, मोडनिंब व बेंबळे हे जिल्हा परिषद मतदारसंघ माढा विधानसभा मतदासंघात येतात. या मतदारसंघात माजी आमदार बबनराव शिंदे यांचे वर्चस्व असून भाजपाचे नेते रणजितसिंह शिंदे यांच्याकडे निवडणूकीचे सर्व सुत्रे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून कुर्डू जि.प.मतदार संघातून आण्णासाहेब ढाणे तर पं.स.गणातून संदीप पाटील व पवन पाटील इच्छूक आहेत.

आमदार नारायण पाटील यांच्याकडून अमोल गायकवाड यांना उमेदवारी मिळाल्याचे बोलले जात आहे. कुर्डू गाव हे सात हजार मतदारसंख्येचे गाव आहे. येथील ग्रामपंचायतवर आण्णा ढाणे यांची सत्ता आहे. अकोले पं.स.गणातून अमोल पाटील, गोटू पाटील, धनराज शिंदे हे इच्छूक आहेत. कुर्डू जि.प.मधून विक्रम शिंदे इच्छूक असल्याने या मतदासंघातील समिकरणे बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. भोसरे जि.प. मतदासंघामध्ये आप्पासाहेब उबाळे, मधुकर बागल, हर्षल बागल, सुरेश बागल तर भोसरे पं.स.गणासाठी आशिष रजपूत, बंडू भोसले, बालाजी बोबडे इच्छूक आहेत. आशिष रजपूत यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली जात आहे. याठिकाणी आरपीआयचे बापूसाहेब जगताप यांची शिफारस कोणाला मिळते? यावर बरेच काही अवलंबून आहे. रोपळे पं.स.गणा मध्ये श्रीपाद दळवी यांनाही उमेदवारी मिळू शकते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची राजकीय गोची केल्याचे नगरपालिका आणि महापालिकेच्या निवडणुकांच्या निकालावरुन दिसून आले. यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची अवस्था बिकट झाली. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादीने सर्व निवडणूका एकत्र येत लढवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याने माढा तालुक्यातील राजकीय समिकरणे बदलली असल्याचे दिसून येते.

# माढा तालुक्याचे राजकीय समीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२० जानेवारी-**

राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निकालाचे पडसाद राज्याच्या राजकारणात उमटत असून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रितपणे जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीस सामोरे जाण्याची शक्यता वर्तवली जात असल्याने माढा तालुक्याच्या राजकारणात नवा ट्रिस्ट निर्माण झाला आहे. दरम्यान, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत माढा तालुक्यातील जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवाराला पसंती दर्शविली होती.



विधानसभा निवडणुकीत माजी आमदार अ‍ॅड.धनाजीराव साठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेश केला होता. त्यांच्या स्नुषा अ‍ॅड.मीनल साठे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून विधानसभेची निवडणूक लढवली होती. येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माढा तालुक्याच्या प्रभारी म्हणून पक्षाने अ‍ॅड.मीनल साठे यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. अकलूज येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या साठेंना सोबत घेण्यास आमदार अभिजित पाटील यांनी काहीसा विरोध केला असल्याचे सांगण्यात येते आहे. परंतु आता राजकीय परिस्थितीत मोठा उलटफेर झाला. ना.अजित पवारांच्या बारामतीमधील निवासस्थानी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीचे सोलापुरातील एक खासदार, चार आमदार आणि जिल्हाध्यक्षांसोबत झालेल्या बैठकीत सोलापूर जिल्ह्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक लढवणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे.

दरम्यान, साखर कारखानदारीच्या आर्थिक मदतीचा प्रश्न हा या एकत्रीकरण प्रक्रिये समोरचा मोठा अडथळा ठरु पहात असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. भाजप प्रवेशासाठी प्रयत्नशील असलेले माढा तालुक्यातील एक प्रमुख नेते राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात प्रवेश करण्याची शक्यता वर्तवली जात असताना महानगरपालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षास मोठ्या पराभवास सामोरे जावे लागले असल्याने त्यांनी आपला निर्णय तूर्तास राखून ठेवला असल्याचे समजते. माढा तालुक्यात भाजपा पाच जागांवर तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट माढा तालुक्यातील परंतु करमाळा विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या दोन जिल्हा परिषद गटातून लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे तालुक्यात महायुतीतून निवडणूक लढवली जाण्याची शक्यता समोर येत आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांनी नुकतीच मुख्यमंत्री यांची भेट घेतली असल्याने राजकीय निरीक्षकांच्या भूवया उंचावल्या आहेत.

## बार्शीत २६ अर्ज दाखल

**बार्शी, दि. २० जानेवारी-**

जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणासाठी मंगळवारी जिल्हा परिषद गटासाठी ८ उमेवारांचे १२ अर्ज तर पंचायत समिती गणासाठी ११ उमेदवारांचे १४ अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी अमोलसिंह भोसले यांच्याकडे दाखल करण्यात आले. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी एफ.आर. शेख, मुख्याधिकारी तैमुर मुलाणी उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्यासाठी दोनच दिवस उरले असल्याने तहसील कार्यालय परिसरात तालुक्यातील कार्यकर्त्यांची गर्दी होती. जिल्हा परिषद गटासाठी पुढीलप्रमाणे अर्ज दाखल करण्यात आले. उपळाई (ठों) १, पांगरी ६, उपळे दुमाला ३, पानगाव २ असे १२ अर्ज दाखल झाले. मालवंडी व शेळगाव (आर.) या दोन गटात एकही अर्ज दाखल करण्यात आला नाही. पंचायत समिती गणासाठी उपळाई (ठों)- ३, कारी- २, मालवंडी- १, सासुरे- ५, मानेगाव-२, शेळगाव (आर)- १ असे १४ अर्ज दाखल करण्यात आले. आगळगाव, पांगरी, उपळे दुमाला, गौडगाव, बावी (आ), पानगाव या गणात मंगळवारी एकही अर्ज दाखल झाला नाही. मंगळवारपर्यंत जिल्हा परिषदेसाठी १६९ तर पंचायत समिती गणासाठी २९१ असे आजपर्यंत ४६० अर्जांची विक्री झाली आहे. आज बुधवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे.

# माळशिरस तालुक्यात भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२० जानेवारी-**

माळशिरस तालुक्यात सध्या जिल्ह्य परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु सध्या भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातच उमेदवारीसाठी रस्सीखेच पाहावयास मिळत आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेचे ९ तर पंचायत समितीचे १८ पंचायत समितीचे गण आहेत. २१ जानेवारी हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिवस आहे. बऱ्याच गटातील, गणातील उमेदवारीबदल सस्पेन्स कायम आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर जो कालावधी आहे तो अतिशय कमी असल्यामुळेच पक्षांना उमेदवारी देताना अडचणीचा सामना करावा लागत आहे. २१ जानेवारी रोजी निश्चित कोणत्या पक्षाकडुन किती अर्ज दाखल झाले हे समजेल. मात्र अंतिम चित्र हे २७ तारखेला माघीरीनंतरच स्पष्ट होईल. तालुक्यात सध्या भाजपा व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट यामध्ये मोहिते पाटील व आमदार उत्तमराव जानकर गट एकत्रित निवडणूक लढणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी अजित पवार



गटाची भूमिका अद्यापपर्यंत समजु शकली नाही. शिवसेना शिंदे गट, मनसे, स्वाभिमानी शेतकरी संघटना, आरपीआय या छोट्या पक्षाची भुमिका काय आहे.

त्यांना सहयोगी घटक पक्ष समावुन घेणार का नाही हे उमेदवारी माघीरीनंतरच समजेल. भाजपा निवडणुकीत जोरदार तयारीने उतरत आहे. तालुक्यात भाजपमध्ये मोठे इनकमिंग सुरू आहे. तालुक्यात भाजपा महायुती व राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटातच मुख्य लढत होणार हे निश्चित आहे.

## सांगोल्यात महायुती म्हणून लढणार : शहाजीबापू

**सांगोला, दि. २० जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका सांगोला तालुक्यात महायुती म्हणून लढणार अशी प्रतिक्रिया माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी दै. तरुण भारतच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.



पुढे बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, शिवसेना पक्षाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रत्येक तालुक्यात स्थानिक पातळीवरच्या शिवसेना प्रमुखांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात वेगवेगळ्या पक्षाबरोबर चर्चा सर्वत्र सुरू आहेत. आदरणीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सध्याचे शिवसेनेचे निवडणूक प्रमुख शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी सर्वांना पहिल्यांदा भारतीय जनता पार्टी बरोबर चर्चा करा अशा सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे सांगोल्यात भारतीय जनता पार्टी, शिवसेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हे तीन पक्ष एकत्र येऊन महायुती म्हणून लढणार आहेत असे त्यांनी स्पष्ट केले.

## पंढरपुरात मंगळवारी ६० अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जानेवारी-**



जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकी साठी मंगळवारी २० जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद गटातून २३ तर पंचायत समिती गणातून ३७ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असून ६० नामनिर्देशन पत्र दाखल झाले आहेत.

**जिल्हा परिषद गट**

करकंब - ०१, भोसे - ०३, रोपळे -०२, गोपाळपूर - ०५, वाखरी- ०७, भाळवणी - ००, टाकळी- ०४, कासेगांव- ०१

**पंचायत समिती गण**

उंबरे - ०५, करकंब -०२, भोसे -००, गुरसाळे -०७, रोपळे -००, सुस्ते- ०३, पुळुज -०२, गोपाळपूर -००, वाखरी -०३, पटवर्धन कुरोली- ०४,भाळवणी- ०४,पळशी- ००, टाकळी -००, खर्डी -०४, कासेगांव -०२, सरकोली- ०१.

**आज पर्यंत एकूण दाखल नामनिर्देशन**

जिल्हा परिषद-३० आणि पंचायत समिती- ४२ असे एकूण आजपर्यंत ७२ नामनिर्देशन दाखल झाले आहेत.

**दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी अर्ज विक्री**

जिल्हा परिषद-७८ आणि पंचायत समिती-१३५ असे एकूण=२१३

**आज पर्यंत एकूण विक्री झालेले अर्ज**

जिल्हा परिषद -३२१ आणि पंचायत समिती-४२३ असे एकूण -७४४ अर्जांची झाली विक्री.

# ‘दक्षिण’ तालुक्यातील नेते निवडणुकीपासून अलिप्त

**काडादी, कोगनुरे, पवार, वैद्य निवडणूकी पासून अलिप्त**

## निवडणुकीत कार्यकर्त्यांची कसोटी

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**दक्षिण सोलापूर, दि.२० जानेवारी-**




सोलापूर दक्षिण मतदारसंघात २०२५ च्या विधानसभा निवडणुकी दरम्यान दक्षिण सोलापूर तालुक्यातील अनेक दिग्गज नेत्यांनी नशीब आजमावले. एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनूरे, मार्ग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार, स्वयं एज्युकेशनल शिक्षा फाउंडेशनचे सोमेश वैद्य, काँग्रेस पुरस्कृत उमेदवार व सिध्देश्वर साखर कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी दाखल करून भाजपच्या उमेदवाराला आव्हान दिले होते. एक वर्षानंतर दक्षिणमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका होत असून यावेळी दिग्गज नेते निवडणुकीपासून अलिप्त असलेले दिसून येतात. विधानसभा निवडणुकीत नेत्यांचा झेंडा घेऊन प्रचार करणारे कार्यकर्ते स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नशीब आजमावत असताना नेते मात्र प्रचारापासून अलिप्त असल्यामुळे कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे



महादेव कोगनूरे यांनी एमके फाउंडेशनच्या माध्यमातून दक्षिण सोलापूरमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले होते. जळीतग्रस्तापासून निराधारांना भोजन व शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यापर्यंत त्यांचे कार्य कौतुकास्पद होते. त्यांनी भाजपमधून उमेदवारी मागितली होती. मात्र त्यांची उमेदवारी नाकारल्यामुळे त्यांनी ऐनवेळी मनसेकडून विधानसभा निवडणूक लढविले. मात्र यावेळी त्यांना दारुण पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्यांची अपेक्षाभंग झाली. सामाजिक कार्यात केलेल्या कामाची पोहोचपावती मिळाली नसल्यामुळे ते राजकारणापासून अलिप्त राहून व्यवसायामध्ये व्यस्त दिसून येत आहेत. त्यामुळे महापालिका निवडणुकीतही त्यांचा सहभाग दिसला नाही. दि.१६ जानेवारीपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली असून यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत कार्यकर्ते निवडणूक लढवित आहेत. अशावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी निवडणुकीत सहभागी होणे गरजेचे आहे. मात्र सध्या ते व्यवसायात व्यस्त असल्यामुळे प्रचारामध्ये दिसणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. मार्ग फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संतोष पवार यांनीही विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवारी मिळवून १० हजार पर्यंत मते मिळविली होती. त्यांनी सामाजिक कार्यात अग्रेसर असल्यामुळे विधानसभा निवडणुकीत मतदारांच्या बळावर आमदार होण्याची स्वप्न पाहिली. मात्र भाजपच्या लाटेत त्यांचाही निभाव लागला नाही. त्यामुळे त्यांना पराभव पत्करावा लागल्याने त्यांनी 'व्हाईट हाऊस' येथील मार्ग फाउंडेशनचा कार्यालय बंद करून पुणे येथे रियल इस्टेट मध्ये स्वतःला व्यस्त ठेवला आहे. अद्यापपर्यंत त्यांनी निवडणुका संदर्भात कोणतीही भूमिका जाहीर न केल्यामुळे ते निवडणुकीपासून अलिप्त राहणार असल्याचे दिसून येते. सिध्देश्वर कारखान्याचे माजी चेअरमन धर्मराज काडादी यांनी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पुरस्कृत उमेदवारी मिळवून निवडणूक लढविली. महाविकास आघाडीतील दुफळीमुळे त्यांनाही पराभव पत्करावा लागला. त्यामुळे त्यांचीही घोर निराशा झाली. म्हणून त्यांनी एक वर्षापासून कोणत्याही राजकीय व सामाजिक कार्यात सहभाग नोंदविल्याचे दिसून येत नाही. मात्र त्यांचे अनेक समर्थक जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक लढवत असल्यामुळे काडादी यांनी प्रचारासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे. मात्र त्यांचा सक्रिय सहभाग कुठेही दिसून येत नाही. स्वयं एज्युकेशनल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सोमेश वैद्य यांनी विधानसभा निवडणूकीत मोठी रंगत आणली होती. मात्र भाजपच्या लाटेत त्यांचाही निभाव लागला नाही. त्यामुळे तेही सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत अलिप्त असल्याचे दिसून येत आहे.




सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत दक्षिण विधानसभा मतदारसंघात नशीब आजमावलेले अनेक दिग्गज निवडणुकीत अलिप्त असल्यामुळे कार्यकर्त्यांसाठी ही निवडणूक आर या पार ठरत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांसाठी नेत्यांनी निवडणुकीत प्रचारात सहभागी होणे गरजेचे आहे, अशी भावना दक्षिणच्या कार्यकर्त्यांमधून व्यक्त करण्यात येत आहे. बाबा मिस्त्री यांनी दोनवेळा विधानसभा निवडणूक लढविल्यामुळे त्यांचीही कार्यकर्त्यांची फळी दक्षिणमध्ये आहे. त्यापैकी बरेच कार्यकर्ते जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढवित आहेत. रुग्णसेवक असणाऱ्या बाबा मिस्त्री यांचे सामाजिक कार्य वाखणण्याजोगे असल्यामुळे त्यांनी प्रचारास वेळ देण्याची मागणी होत आहे.



## आचारसंहितेमुळे लोकशाही दिन रद्द

**सोलापूर, दि. २० जानेवारी-**

सामान्य प्रशासन विभागाच्या २६ सप्टेंबर २०१२ च्या परिपत्रकानुसार तालुका, जिल्हा/ महानगरपालिका, विभागीय, मंत्रालय स्तरांवरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश दिलेले आहेत. परिपत्रकातील कलम ५.७ नुसार लोकशाही दिन केव्हा होणार नाही. निवडणुकीकरीता आचारसंहिता लागू करण्यात आली आहे, अशा ठिकाणी त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येवू नये अशा सूचना दिलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु दि.१३ जानेवारी २०२६ पासून सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली असल्याने जिल्हास्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन उक्त नमूद परिपत्रकानुसार करता येणार नाही. दि.०२ फेब्रुवारी, २०२६ रोजी होणारा जिल्हा लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.




भाजपाकडून उमेदवारी दाखल करताना इंद्रजित पवार, संध्याराणी पवार तर दुसऱ्या छायाचित्रात उमेदवारी दाखल करताना बळीराम साठे, प्रल्हाद काशीद, सुवर्णा झाडे, नागेश पवार.

# बीबीदारफळ गटासाठी साठे, पवार तर नान्नजमधून माळी यांची उमेदवारी दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जानेवारी-**

संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या बीबीदारफळ जिल्हा परिषद गटासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पार्टीकडून जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे यांनी तर त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून भारतीय जनता पार्टीकडून भाजपाचे कोषाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी तर नान्नज गटातून राष्ट्रवादीकडून वडाळा गावचे उपसरपंच अनिल माळी यांनी अर्ज दाखल केले.

भव्य मोटारसायकल रॅली काढून, ढोल ताशांच्या गजरात इंद्रजित पवार, त्यांना पूरक म्हणून गणेश पवार, मार्डी गणातून तेजस्विनी बोराडे, बीबीदारफळ गणातून सुनिता बारस्कर या भाजपा उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. सोमवारी कोंडी गटातून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने यांचे चिरंजीव पृथ्वीराज माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दिलीप माने, पंचायत समितीच्या माजी सभापती संध्याराणी पवार, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अविनाश मार्तंडे, शिवाजी सोनार, बाबासाहेब पाटील, काशिनाथ कदम, भाजपा ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, तालुकाध्यक्ष संभाजी दडे, सुनील जाधव, गणेश पवार, अझर शेख उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्ष सुवर्णा झाडे, प्रल्हाद काशीद, नागेश पवार, अनिल माळी, रतिकांत पाटील, शशिकांत मार्तंडे, जितेंद्र शिलवंत, मनोज साठे, भुजंग लंबे, भैरवनाथ हावळे, बापूसाहेब शिंदे, तानाजी पवार, पिरसाहेब गायकवाड, प्रकाश चोरेकर, भाऊसाहेब लामकाने, सागर यादव, शंभू गायकवाड, विनोद पांढरे, सुभाष शिंदे, आजिनाथ कांबळे, बिपिन चवरे उपस्थित होते.

नान्नज गटासाठी वडाळा गावचे उपसरपंच अनिल माळी, बीबीदारफळ गणासाठी अकोलेकाटीचे माजी सरपंच लिंबाजी लामकाने, मार्डी गणासाठी काजल जगताप, नान्नज गणासाठी प्रकाश चोरेकर, वडाळा गणासाठी वैशाली शिलवंत यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

### जि.प.साठी ९५ तर पं.स.साठी १४१ अर्ज विक्री

जिल्हा परिषदेच्या तीन गटासाठी मंगळवारपर्यंत ९५ तर पंचायत समितीच्या सहा जागांसाठी १४१ अर्जांची विक्री झाली आहे.तर जि.प.साठी सहा व पंचायत समितीसाठी आठ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

### मोजक्या कार्यकर्त्यांना घेऊन साठे यांचा अर्ज दाखल

बळीराम साठे यांनी सकाळी साडेअकरा वाजता कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता मोजक्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी पडदुणे यांच्याकडे दाखल केला.